नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत


अनुक्रमणिका



कविभूषण अण्णासाहेब खापर्डे
संस्थापक, विदर्भ साहित्य संघ.


वि० सा० संघाचे मुखपत्र
युगवाणी • जून –जुलै १९

नागपुरातील वाङमयीन संस्थांचे प्रतिनिधी व साहित्यिक यांचा मेळावा



विदर्भ साहित्य संघाचे कार्यक्रम व धोरण ह्याबाबत त्यांनी आपापले मतप्रदर्शन केले व संघाबद्दल जिव्हाळा व्यक्त केला.

नागपुरातील साहित्यिकांशी बातचीत



(डावीकडून) : श्री. देहाडराय, श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल', श्री. श्रीपाद भालचन्द्र जोशी, श्री. वामन कृष्ण चोरघडे, प्रा. श्रीधर शनवारे.

'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

जून – जुलै १९७७
आषाढ – श्रावण १८९९
संपादक
वि० बा० प्रभुदेसाई
सहसंपादक
शिरीष गोपाळ देशपांडे

मूल्य तीन रुपये

वर्ष ३३ अंक ३–४

वि. सा. संघाचे पितृछत्र गेले !

कविभूषण प्राध्यापक बळवंत गणेश उपाख्य अण्णासाहेब खापर्डे यांचे दि. २५ जून १९७७ रोजी अमरावती येथे वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले आणि त्यामुळे वि. सा. संघ एका परीने पोरका झाला आहे. कै. अण्णासाहेब खापर्डे यांनी १९२३ साली विदर्भ साहित्य संघाची स्थापना करून विदर्भातील साहित्यविषयक चळवळींची मुहूर्तमेढ रोवली. सुरुवातीला अमरावतीला असलेले वि. सा. संघाचे कार्यालय पुढे श्री. भाऊसाहेब माडखोलकर व डॉ. भाऊसाहेब कोलते या दोन भाऊसाहेबांच्या पुढाकाराने नागपूरला आले. विदर्भातील या अग्रगण्य साहित्य संस्थेच्या कार्याचा आजचा विस्तार एखाद्या विशाल वटवृक्षासारखा असला तरी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्याचे बीजारोपण करण्याचे श्रेय कै. अण्णासाहेब खापर्डे यांनाच द्यायला हवे.

अण्णासाहेब खापर्डे हे बनारस हिंदू विश्वविद्यालयात मराठीचे प्राध्यापक होते. 'सर्वस्वाची गद्यगाणी', 'अनंताची हाक', आणि 'काव्यकांतार' इत्यादी त्यांचे काव्यसंग्रह सुप्रसिद्धच आहेत. मराठी गद्यकाव्याच्या आद्य प्रवर्तकत्वाचा मानही त्यांना देण्यात येतो. थिऑसॉफीचे आकर्षण असलेले व परतत्त्वाशी सतत संवाद साधणारे अण्णासाहेबांचे काव्य हे क्वचित सर्वसामान्य रसिकाला अनाकलनीय वाटत असले तरी ते अण्णासाहेबांच्या चित्ताचे यथार्थ दर्शन घडविण्यास पुरेपूर समर्थ आहे, यात मुळीच शंका नाही.

भारतभूमीचे आपण पुत्र असून विदर्भाचे देणेही लागतो ही आंतरिक तळमळ प्रभावीपणे व्यक्त करणारे त्यांचे विदर्भगीत सुपरिचितच आहे. मृत्यु ही जीवनातली अटळ आणि अपरिहार्य अशी घटना आहे ! तरीही मरणाचे भय प्रत्येकाला वाटतच असते. अण्णासाहेबांचे वैशिष्ट्य हे की त्यांनी मरणाची मिजास आणि मिरास हतप्रभ केली ! 'युगवाणी'च्या याच अंकातील त्यांची 'बोलावणारा दारीं उभा आहे' ही कविता प्रस्तुत संदर्भात रसिकांना विलक्षण बोलकी वाटेल !

काव्याव्यतिरिक्त, अण्णासाहेबांची बरीच मोठी ग्रंथसंपदा असून त्याची यादी आम्ही अन्यत्र दिली आहे (पृ. ७८). त्यांच्या संपूर्ण साहित्याचा व वेगवेगळ्या नियतकालिकांमधून वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या निरनिराळ्या विषयांवरील लेखांचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

नागपूर येथे १९६१ साली भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अण्णासाहेब हे अध्यक्ष होते. त्यांचे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व आदरणीय तसेच मोठे प्रसन्न होते. त्यांचे तेजस्वी नेत्र आणि तपःशुभ्र दाढी यांमुळे आपण एका भारतीय परंपरेतील तपस्व्याच्या सान्निध्यात वावरत आहोत, याचे समाधान अनेकांना लाभत असे.

अशा या विदर्भातील पुढच्या पिढ्यांना स्फूर्तिप्रद ठरलल्या थोर साहित्यिकाच्या स्मृती तेवढ्या आज शिल्लक राहिलेल्या आहेत.

विदर्भ साहित्य संघाचे संस्थापक कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांना आमची विनम्र आदरांजली !

संपादक – मंडळ :
सुरेश डोळके, श्रीधर शनवारे, सुनील सुभेदार, बजरंग सरोदे, यशवंत मनोहर, म. वा. कुंडले.

अं त रं ग

(मागील अंकावरील मुखपृष्ठ 'अरुण मेंदुले' ह्यांचे होते.)

बोलावणारा दारीं उभा आहे

बळवंत गणेश खापर्डे

१.

सामानाचा गोंधळ...पडलाच आहे
आवरासावरीचा...अभावच आहे
हिशेबाचा कागद...अपुराच आहे
दारीं बोलावणारा...उभाच आहे.

२.

तुझं निरोप घेणं...संपतच नाही !
कोणाचीही माया...तोडवतच नाही
कशाचीही आशा...सोडवतच नाही
बोलावणारा कांही...हलतच नाही
तो तर दारावर .उभाच आहे
बोलावणारा दारीं...उभाच आहे !

३.

तूं तोंड लपवलं ..तरी तो जात नाही !
विनवण्या करूनही. .मुळीच ऐकत नाही
रडलं भेकलं...तरी त्याला दया नाही
तुला घेतल्यावांचून...तो इथून हलत नाही
इथे "नाही" म्हणण्यांत...कांही अर्थ नाही
आढेवेढे घेण्यानं...कांही होत नाही
अता गेल्यावाचून .गतिच उरली नाही
तुला तो इथून...नेणारच आहे !
दारीं बोलावणारा...उभाच आहे !

४.

तूं डोळे मीट...पण तो पाहात आहे
तूं तोंड फिरव तो पाठिशीच आहे
मान खाली घाल. .मुरी मानेवरच आहे
कोठे आता जाशील ?...त्यानं घेरलं आहे
कां उगी घडपड ?...येथे गति नोहे
सृष्टीच्या क्रमांत हे...होणारच आहे
आता परम कल्याण.. एकच उरलं आहे--
धैर्यानं आनंदानं...तोंड द्यायचं आहे
येऊं दे येणाराला...तूंहि कोणी आहे !
भिणाराला तो सोडी...असं थोडंच आहे ?
मग भीती कशाला ?...त्याला येऊ दे
दारीं बोलावणारा...उभाच आहे !

५.

असं कधी झालं का...त्यानं होतं बोलावलं--
कोणी "नाही" म्हटलं.. आणि ह्यानं ऐकलं ?
असं कधी झालं का..की ह्यानं नेलं--
आणि परतून आलं. .कधीही कोणी ?
ह्याचं एकच बोलावणं !...तेंच पक्कं असतं
ह्याचं एकच बोलावणं !...तेंच शेवटलं असतं
ह्याचं एकच बोलावणं !...तेंच शेवटलं ठरतं
ह्यानं नाही नेलं...असा कोणी नाही
ह्यानं परत केला...असा कोणी नाही
तो न्यायलाच येतो !...परत करीत नाही
तो ठेवूनच घेतो !...पुन्हा देत नाही
तो हक्कानं नेतो !...उसनं मागत नाही
आपल्या तो धाकानं...कांपायला लावतो
आधीं कधी सांगत नाही...एकदम येतो !
गोड कडू बोलून...पण हमखास नेतो !
ह्याच्यापाशी तीन पांच...व्यर्थच आहे
दारीं बोलावणारा...उभाच आहे !

६.

कधी पाय दणदण...आपटीत येतो
चाहूलही न लागतां...चोरून कधी येतो
कधी कधी हाक हा...जोरानं मारी
कधी कानीं हळू बोले .जणूं आहे चोरी
त्याची हाक परंतु ही...हमखास येणार
आणि तूं असशील...तसा तुला नेणार
कितीही तूं कमाव...तें मागेच राहणार
तुझ्यासंगे इथून...कांही नाही येणार

तुझं खास अपूरं. . .कांही तरी राहणार
सर्व कांही तुझं. . .पूर्ण नाही होणार
केलंच जें पाहिजे. . .तेंच आधीं कर
सामान आणि विचार. . .दोन्ही नीट सावर
प्रहराच्या मागून. . .जात आहे प्रहर
कोणालाच नकळे. . केव्हा होईल कहर
भविष्याची कुंडली. . .मांडता नाही आली
त्याची कधी कुणाला. . .रास नाही सांपडली
तसं त्याचं जन्म नांव. . .अक्षांशाचं गांव
कोणालाच नाही तसा. . .नक्षत्राचा ठाव !
वाघ मागे लागे. . .अरण्य आहे घोर
पाऊल उचलण्याची. . .आता त्वरा कर
भिण्यानं भागत नाही ! . .धीर मनीं धर
त्यानंच तू तरशिल. .एवढीच आशा आहे
दारीं बोलावणारा. .उभाच आहे !

७.

गुर्मीतच बोलतो. . .ऐकतच नाही !
गरीबीनं बोलणं. . .जाणतच नाही !
स्वत:ची लहर तो. .आवरीतच नाही !
कोणाच्याही मनाकडे. . .पाहातच नाही !
कोणी हसो कोणी रडो. . .त्याला पर्वा नाही
वेळ किंवा अवेळही. .मुळी पाहात नाही
मर्जीपुढे आपल्या. . .तुच्छ सर्व कांही ! !
अरेराव ह्याच्यासम. . .दुसरा कोणी नाही !
बेगुमान बेमुर्वत. . .करी बादशाही
"ऊठ ! आणि चालू लाग !". . .त्याचा एकच हुकूम
बोलण्याला सवड नाही. . .नाही किंवा कां कूं
हुकूम म्हणजे हुकूम. . .इथे एकच न्याय आहे
दारीं बोलावणारा. . .उभाच आहे !

८.

वाघाला खातांना. . "नको" कोण म्हणणार ?
वाघाच्या तोंडचं. . .ओढून कोण घेणार ?
इथे तर प्रसंग. . .वाघाशीच आहे
गरीबीचा इथे. . .संबंधच नव्हे
वाघ, झडप घालून. . .कोकरू खातो
जनलोक भिऊन. . .दुरून पाहातो
किंवा लोक भेदरून. . पळून जातो
तोच न्याय पूरा. . .इथे लागूं आहे

कोकराचं कोकराला ! . . .दुसऱ्याला नव्हे
कोणाचंच कोणाला. . .इथे साह्य नव्हे
हळहळ कोणाची. . .इथे काय कामाची
अश्रूंची धारही. . .कामीं नाही यायची
कोकराच्या कळपाची. . .हीच गति आहे
भीती आणि अश्रू. . .मनांतच राहे
किंकाळिचा आवाजहि . .घशांतच राहे
असहाय जनलोक. . .टकमक पाहे
त्याच्याच मालकीचं. . .तो नेत आहे
इथे कोणाचाही. . .उपाय काय आहे ?
जगामधे साऱ्या. . .हाच न्याय आहे
कोकराच्या इच्छेचा. . .प्रश्नच कुठे आहे ?
वाघाचं कोकराचं. . .हेंच नातं आहे
दारीं बोलावणारा. उभाच आहे !

९.

सृष्टिच्याच बरोबर. . .जन्माला आला
सारी सृष्टी आहे. . .केवळ खेळ त्याला
सारं जग खातो. . .तरि भूक जात नाही
खाऊन खाऊन त्याला. . .कधी वीट येत नाही
रुची-पालट नको. . .सदा खात राही
अतिखादाडपणाला. . .त्याच्या अंत नाही
लीलेनं मोडतोड. . .वाटेल ती करी
समोर त्याच्या जाऊन. . .हात कोण धरी !
त्याची दृष्टि रातदीस. . .साऱ्यांवर आहे
घार जशी वरतुन. . .सगळीकडे पाहे
तूंच एक सुटशिल. . .आशा फोल आहे
दारीं बोलावणारा. . .उभाच आहे !

१०.

तुला तो भेडवतो. . .तूं कां भितोस !
दीनपणा आपल्याकडे. . असा कां घेतोस ?
दंड ठोक ! उभा राहा ! . . .काय बिशाद आहे
कोणिही तो असो. . तो काय करणार आहे ?
नेऊन कुठे नेईल ? . . .कायम मारणार आहे ?
त्याची ती ताकद नाही ! . . .तो कोण आहे ! !
देवाच्याही पलीकडे. . .त्याची शक्ति आहे ?
कोणाला तूं भितोस ? . . .जग अनाथ आहे ?
अनाथाचा नाथ. . तुझा पाठीराखा आहे
तो कोणी असेल. . .पण तूहि कोणी आहेस !

जाणं येणं भास आहे...मध्ये थोडा त्रास आहे
तूं अमर खास आहे...त्याची काय मिजास आहे !
आपलं मन जागं ठेव.. त्यांत सारं आहे
जरी बोलावणारा...दारीं उभा आहे

११.

डोळे आधी पूस...आणि कंबर बांध
विचाराचे धागे...सगळे नीट सांध
सुटणारच आहे...तें सोडून दे
भविष्यावर भरोसा...पूरा राहूं दे
पूर्ण शांत मनानं...पुढे पाऊल टाक
करून देवाची...मनीं आणभाक
मुळी भिऊ नको ..जगांत देव आहे !
ह्यानं आज नेल्यानं...काय होणार आहे ?
तुला पुढे आयुष्य...अनंत काळ आहे
आटप आता लवकर...त्याला 'ओ' दे
दारीं बोलावणारा...उभाच आहे !

१२.

राम, कृष्ण, संत, पंत,...ऋषी, मुनी, महंत
राव, रंक आणि जंतु...सर्वांचा एकच पंथ !
जन्म तुला पुढे पुन्हा...येणारच आहे
आज पण ह्याच्यासवें...जावयाचं आहे
तुझी त्याची लक्ष वेळ...पूर्वी भेट झाली
विस्मृतीनं मती आहे...तुझी गुंग झाली
जुनी ओळख आठव...नवा मानूं नको
गांगरून कांही तरी...उगाच करूं नको
उन्नतीसाठीच तो...तुझ्या येत आहे
उन्नतीचं स्वर्गद्वार...खुलं करीत आहे !
जन्मोजन्मीं झटून तूं...पैलतीर गाठ
फिरव्, फिरव्, फिरव्. .आता जगाकडे पाठ
आशेवीण उन्नतीच्या ..जीवन रुक्ष आहे
यत्नावीण उन्नतीच्या...जीवन फोल आहे
उन्नतीचा दाता आला...हर्ष होऊ दे
देवाचा हा दूत आला.. धन्य वाटू दे !!
जा हसत सामोरे...त्याला येऊ दे
उन्नतीच्या आनंदात...हातांत हात दे
दारीं बोलावणारा...उभाच आहे

१३.

उन्नतीच्या आनंदात.. विश्व नाचत आहे
उन्नतीच्या तंद्रीमधे...विश्व डुलत आहे
उन्नतीच्या उन्मादांत...विश्व घुमत आहे
उन्नतीच्या रंगामधे...विश्व रंगलं आहे !!
ह्या रंगामधे रंग...तुझा मिळूं दे
विश्वाच्या रंगामधे...एक होऊं दे
श्रीरंगाचा रंग...आणि मानवाचा रंग !
असे दोन्ही रंग हे...होऊं दे अभंग !!
अभंग अशा रंगांत ..भीती कुठे आहे ?
उन्नतीच्या उन्मादांत...दुःख कोठे आहे ?
बोलावणारा बोलावू दे...त्याचं कामच आहे
दारीं बोलावणारा...उभाच आहे !

कालिदासविषयक नवीन संशोधनाचे परीक्षण : लेखांक – २*

वा० वि० मिराशी

'स्पिरिट ऑफ इंडिया' ह्या ग्रंथमालेतील दुसऱ्या क्रमांकाच्या ग्रंथातल्या डॉ. एस्. व्ही. सोहोनी यांच्या 'कालिदासावर नवीन प्रकाश' (खंड २, पृ० ३७–५१) या शीर्षकाच्या लेखाकडे आमचे लक्ष आकृष्ट झाले.

डॉ. सोहोनी हे संस्कृत वाङमयाचे चिकित्सक आणि कल्पक अभ्यासक आहेत. कालिदासाच्या 'रघुवंश काव्या'चा शेवट अग्निवर्ण ह्या विषयलंपट राजाच्या राजयक्ष्मा विकारामुळे झालेल्या अपमृत्यूच्या वर्णनाने व्हावा याचे त्यांना आश्चर्य वाटत असे. सध्या त्या काव्याचे एकोणीस सर्ग उपलब्ध आहेत. यानंतर सहा सर्ग असल्याची वार्ता त्या काव्याचे संपादक शंकर पांडुरंग पंडित यांनी पूर्वी नमूद केली होती. पण ते सर्ग अद्यापि कोठेही मिळाले नाहीत.

प्राणवितानांचे कालिदासविषयक मत

काही वर्षांपूर्वी श्रीलंकेचे डॉ. एस्. परानवितान (त्यांना आपण प्राणवितान म्हणू) यांच्या 'श्रीविजय' (देश) मध्ये 'कालिदासाविषयी प्रचलित असलेल्या आख्यायिका' या शीर्षकाच्या लेखाची सुटी प्रत डॉ. सोहोनी यांचे श्रीलंकेतील मित्र डॉ. सी. इ. गोदकुंबुरा यांच्याकडून त्यांना मिळाली.[१] त्यात कालिदासाचा 'रघुवंश' १९ व्या सर्गाबरोबर संपत नसून त्याचे २५ सर्ग होते अशी माहिती अनपेक्षितपणे त्यांना आढळली आणि तिच्यामुळे त्यांच्या पूर्वोक्त तर्काचे समर्थन झाले. म्हणून त्यांनी डॉ. प्राणवितान यांच्या लेखातील कालिदास-विषयक सविस्तर माहिती इंग्रजीमध्ये प्राणवितानांच्या शब्दांत आपल्या लेखाच्या शेवटी दिली आहे. ही माहिती अत्यंत मनोरंजक आणि खरी असल्यास, अतिशय महत्त्वाची असल्यामुळे ती येथे देऊन तिची चिकित्सक चर्चा करावयाची आहे.

श्रीविजय किंवा सुवर्णपुर (सध्याचे सुमात्रा द्वीप) येथील एका ग्रंथालयात 'रघुवंशा'तील २० ते २५ या सर्गांचे हे हस्तलिखित आहे. त्यात पहिल्या कुमारगुप्ताचा इक्ष्वाकुवंशाशी संबंध असलेला दाखविला आहे. दुर्दैवाने हे हस्तलिखित अद्यापि प्रकाशित झाले नाही. ते प्रसिद्ध झाल्यावर त्यायोगे गुप्तवंशाच्या इतिहासावर आणि कालिदासाच्या जीवनचरितावर महत्त्वाचा प्रकाश पडेल असे डॉ. सोहोनी सांगतात.

श्रीविजय किंवा सुवर्णपुर येथील पंडितांमध्ये कालिदासाविषयी ज्या आख्यायिका प्रचलित होत्या त्या श्रीलंकेच्या ख्रिस्तोत्तर पंधराव्या शतकात होऊन गेलेल्या सहाव्या पराक्रमबाहूने गोळा करून त्यांवर आधारित असा एक कालिदास–वृत्तांत तयार केला आणि तो आपल्या राज्यात पुढील पांच ठिकाणी प्रस्तर शिलाखंड व स्तंभ यांवर कोरविला. असा वृत्तांत कोरविण्याला तत्कालीन महाविहाराधिपति बौद्ध भिक्षूंचा आक्षेप असल्याने त्या राजाने तो वृत्तांत दुसऱ्या काही कोरीव लेखांच्या ओळींच्या मध्ये (पॅलिम्प्सेस्ट पद्धतीने) कोरविला होता. डॉ. प्राणवितान यांनी मोठ्या मेहनतीने त्याचे वाचन करून आपल्या लेखात त्याचे इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध केले. ते डॉ. सोहोनी यांनी आपल्या लेखाच्या शेवटी सविस्तर दिले आहे.

हा कालिदास वृत्तांत ज्या पाच ठिकाणी आढळला ती ठिकाणे आणि तो ज्या कालिकांत प्रसिद्ध झाला ती कालिके येणेप्रमाणे–

१. चतुर्थ महिंद (ख्रिस्तोत्तर दहावे शतक) याच्या कालच्या शिलाखंडावर (Vide *Epigraphia Zeylonika*, Vol. I, No. 20)
२. चतुर्थ दप्पुल (नवव्या शतकाची अखेर) याच्या

** 'लेखांक – १' 'युगवाणी'च्या फेब्रु. – मार्च ७७ ह्या अंकात प्रकाशित झाला आहे. –संपादक*

१. आपल्या लेखाला जोडलेल्या एका टीपेत डॉ. सोहोनींनी प्राणवितानांच्या या लेखाचा उल्लेख केला आहे, पण त्याचा संदर्भ दिला नाही.

एल्लवाव स्तंभावरील कोरीव लेखावर (Vide *Ep. Zey.*, Vol. IV, No. 35)

३. अनुराधपुर म्यूझियममधील क्र. एम्. १११ या उत्कीर्ण शिलाखंडावर.

४. पंडुवस्नुवर येथील बो मलुवच्या पायऱ्यांजवळ आता असलेल्या उत्कीर्ण स्तंभावर.

५. राजगल येथील उत्कीर्ण प्रस्तरावर (Vide No. 42 of Appendix I in the *Annual Report of the Archaeological Survey of Ceylon*, 1961-62)

सहाव्या पराक्रमबाहूने तयार केलेल्या या वृत्तांताचे इंग्रजी भाषांतर डॉ. प्राणवितान यांनी आपल्या लेखात दिले होते. तेच डॉ. सोहोनी यांनी आपल्या लेखाच्या शेवटी दिले आहे, त्यावरून पुढील वृत्तान्त येथे दिला आहे :–

प्राणवितानांचा तथाकथित कालिदासवृत्तांत

कालिदासाचा पिता ब्राह्मण व माता वैश्य जातीची होती. कालिदास चार वर्षांचा असताना त्याचा पिता वारला. तेव्हा त्याच्या मातेने त्याचे संगोपन केले. कालिदास सात वर्षांचा झाल्यावर त्याच्या मातेने एका संस्कृत गुरुजीची भेट घेऊन आणि त्याला उपायन देऊन कालिदासाला संस्कृत शिकविण्याची विनंती केली त्या गुरुजीने तिला म्हटले, 'माझ्या पाठशाळेत सर्व ब्राह्मण जातीचे विद्यार्थी आहेत. या वैश्य कुमाराला प्रवेश दिला तर मला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागेल. शिवाय, संस्कृत शिकून वैश्याला फायदा काय ? तेव्हा त्याला एखाद्या वैश्य शाळेत घाला आणि आपल्या जातीला उपयुक्त असे विषय त्याला शिकू द्या.' तेव्हा कालिदासाची माता एका वैश्य गुरूकडे गेली आणि आपल्या मुलाचा संस्कृत शिकण्याचा दृढ निश्चय असल्यामुळे त्याला ते शिकविण्याविषयी तिने त्याची प्रार्थना केली. तो वैश्य गुरू संस्कृतातही प्रवीण होता. म्हणून त्याने कालिदासाचा विद्यार्थी म्हणून स्वीकार केला. पुढे कालिदासाने झटून अभ्यास केला आणि कालान्तराने तो संस्कृत भाषा, व्याकरण, कोश, काव्यकला, नाट्यकला, तर्क, तत्त्वज्ञान इत्यादिकांत प्रवीण झाला.

कालिदास आता तारुण्यात आला होता. त्याने आपल्या गुरूला 'कोणता व्यवसाय करावा' याविषयी विचारले. त्या गुरूचा एक मित्र तत्कालीन कुमारगुप्त राजाचा सूत–प्रमुख होता. त्याला त्याने कालिदासाला 'सूत–नवक' (उमेदवार भाट) म्हणून राजाच्या संमतीने नोकरीत घेतले.

नंतर रोज प्रातःकाळी व रात्री इतर भाटांप्रमाणे सम्राट् कुमारगुप्ताच्या शयनागारासमोर उभा राहून कालिदास श्लोक म्हणत असे. पण कालिदासाला ते श्लोक पसंत पडत नसत. म्हणून त्याने एकदा स्वतः काही श्लोक रचून ते सूत–प्रमुखाला दिले. त्याने ते आपल्या भाटांना पढवून त्यांना सम्राट् कुमारगुप्तासमोर ते गाण्यास सांगितले. कुमारगुप्ताला ते श्लोक अतिशय आवडल्यामुळे त्याने त्याच्या कर्त्याविषयी चौकशी केली. तेव्हा ते कालिदासाने रचले असल्याबद्दल त्याला कळले. त्याने त्याच्याकडून आणखी श्लोक गाऊन घेतले आणि त्याची मोठी प्रशंसा केली. नंतर त्याने कालिदासाला एक नाटक रचण्यास सांगितले. तेव्हा कालिदासाने 'मालविकाग्निमित्र' रचले. त्याचा प्रयोग उत्तम वठला. त्यातील काव्याची व नाट्यगुणांची सभाजनांनी मोठी प्रशंसा केली. नंतर कालिदासाने 'विक्रमोर्वशीय' रचले. त्याचीही वाहवा झाली. तेव्हा कालिदासाने 'अभिज्ञानशाकुन्तला'ची निर्मिती केली. ज्या निवडक राजकुलोत्पन्न लोक, सामन्त, अधिकारी इत्यादिकांच्या पुढे त्या नाटकाचा प्रयोग झाला, त्यांनी आपण असे रसोत्कट नाटक प्रथमच पाहत आहो अशी कबुली देऊन कालिदासाच्या असामान्य प्रतिभेची मुक्त कंठाने प्रशंसा केली. तेव्हा स्वतः सम्राट्, त्याचे सामंत, अधिकारी वगैरेंनी त्याच्यावर देणग्यांचा वर्षाव केला. कुमारगुप्ताने त्याला आपला राजकवि नेमले. त्याने एका उच्चकुलोत्पन्न स्त्रीशी विवाह केला आणि तो सुखाने वैवाहिक जीवन घालवू लागला.

पण कालिदासाच्या वैभवामुळे सूतप्रमुखाला त्याचा हेवा वाटू लागला. आपण ज्याला सम्राटाच्या नजरेस आणले त्यानेच आपणांस मागे टाकले, याचा त्याला मोठा विषाद वाटून त्याने येन केन प्रकारेण त्याला खाली खेचण्याचे ठरविले. त्याने कालिदासाला सुचविले, "तू जर स्कन्दकुमाराच्या जन्मावर 'रामायणा'तल्या प्रमाणे काव्य रचशील तर ते कुमारगुप्त महाराजांना आपल्या जन्माचे प्रतीक म्हणून फार आवडेल." कालिदास महाकाव्याकरिता एखाद्या विष-

याच्या शोधात होताच. त्याला ही सूचना पसंत पडून त्याने 'कुमारसंभव' काव्याचे पहिले सात सर्ग रचून ते सूतप्रमुखाला वाचावयास दिले. तेव्हा त्याने विचारले, 'सातव्या सर्गाच्या शेवटी शंकर व पार्वती कौतुकागारात प्रवेश करतात, येथपर्यंत कथा आली आहे. येथेच तिचा शेवट होणार काय?' कालिदास म्हणाला, 'नाही. पण यापुढील भाग कसा वर्णावा याचा मी विचार करीत आहे.' त्यावर तो सूतप्रमुख म्हणाला, 'स्वतः कौतुकागारात प्रथमच गेल्यावर तुला जो अनुभव आला त्याचे वर्णन तू पुढील सर्गात कर.' कालिदासाला ती सूचना पसंत पडली. त्याने तसा आठवा सर्ग रचून तो सूतप्रमुखाच्या स्वाधीन केला.

नंतर तो सूतप्रमुख ते काव्य घेऊन महाराज कुमारगुप्ताकडे गेला आणि कालिदासाने त्या काव्यात शिव-पार्वतींचा संभोगशृंगार कसा वर्णिला आहे ते दाखविले. तो म्हणाला, 'महाराज, कालिदासाने हे काव्य महाराजांच्या जन्माचे प्रतीक म्हणून रचले आहे. अर्थातच यातील शिवपार्वतींच्या संभोगशृंगाराचे वर्णन हे महाराजांच्या मातापित्यांच्या संभोगशृंगाराचे वर्णन आहे असे लोक समजतील. त्यायोगे लोकांना त्यांच्याविषयी आणि पर्यायाने आपणांविषयी किळस उत्पन्न होईल.' असे म्हणून तो सूतप्रमुख दुःखावेगाने स्फुंदू लागला. तेव्हा कुमारगुप्ताने त्याच्या दुःखावेगाचे कारण विचारले. त्याने 'कुमारसंभवा'च्या आठव्या सर्गातील वर्णनाकडे अंगुलिनिर्देश करून कालिदासाच्या औचित्यभंगाकडे राजाचे लक्ष वेधले, आणि 'याची महाराजांनी योग्य ती दखल घ्यावी' असे म्हणून तो घरी गेला.

नंतर कुमारगुप्ताने कालिदासाला बोलावून 'सूतप्रमुखाने जे सांगितले होते ते खरे काय?' असे विचारले. त्यावर कालिदास म्हणाला, "होय, महाराज! तो सर्ग रचल्यावर त्याचे अनौचित्य माझ्या ध्यानात आले. म्हणून मीच तो आठवा सर्ग परत आल्यावर जाळून टाकणार होतो." त्यावर कुमारगुप्त म्हणाला, "तू तो सर्ग जाळू नको. यापुढे 'कामसूत्रा'चे अध्ययन करणारांस उदाहरण म्हणून त्याचा उपयोग होईल. मी त्या सर्गाच्या सर्व प्रती मागवून राजकीय ग्रंथालयात ठेवण्याची आज्ञा केली आहे. 'रामायणा'-तील स्कंदकुमाराच्या जन्माची कथा महाकाव्याला योग्य विषय होऊ शकत नाही. म्हणून तू यापुढे ते काव्य रचू नये."

कुमारगुप्ताने पुढे म्हटले की, "कालिदासा, तुझ्याविरुद्ध औचित्यभंगाची तक्रार करण्यात आली आहे. तूही तो दोष मान्य केला आहेस. औचित्याचा भंग करणाऱ्यास राजसभेत प्रवेश करू देणे योग्य नाही. पण तुझ्या यापूर्वीच्या तीन कलाकृतींत काहीही अनुचित नाही. म्हणून तुला फक्त एक वर्षभर राजसभेत प्रवेश मिळणार नाही. हा काळ प्रवासात घालवून तू आपला अनुभव विस्तृत करावा. तू दक्षिणापथात जावे असे आम्ही सुचवितो."

नंतर कालिदास स्वगृही परत आला. त्याने आपल्या पत्नीला तिच्या पित्याच्या घरी पाठविले आणि तो स्वतः देशाटनास निघाला. सात महिने दक्षिणेतील अनेक देशांत भ्रमण केल्यावर तो वर्षाकालाच्या आरंभी रामगिरीवर आला. पुढील पाच महिने कसे घालवावे याच्या चिंतेत असता त्याला त्या पर्वतावर एक मेघ दिसला, तेव्हा त्याला 'मेघदूता'तील कल्पना स्फुरून त्याने ते काव्य रचून पूर्ण केले आणि ते कुमारगुप्ताकडे पाठविले. ते पाहताच राजाला आपण संस्कृत भाषेतील एका अद्वितीय काव्याच्या निर्मितीला कारणीभूत झाल्याबद्दल मोठा आनंद झाला. तितक्यात त्याला कळले की 'कुमारसंभवा'च्या आठव्या सर्गात शंकर-पार्वतींचा संभोगशृंगार वर्णण्याची कल्पना सूतप्रमुखानेच स्वतः कालिदासाला सुचविली होती. ते समजल्यावर राजाने त्याला नोकरीतून काढून टाकले आणि कालिदासाला राजसभेत येण्याकरिता संदेश पाठविला.

तो संदेश ऐकून कालिदासाला परमानंद झाला, तो लागलीच परत आला. त्याने आपल्या पत्नीचे सांत्वन केले आणि राजसभेत येऊन आपणांस पुनः सम्राट् कुमारगुप्ताची सेवा करण्याची संधि मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. नंतर कुमारगुप्ताने त्याला म्हटले, "आमचे इक्ष्वाकुकुलोत्पन्नत्व वर्णन करणारे महाकाव्य पंचवीस सर्गांत तू रचावे."

डॉ. सोहोनींचे कालिदास-वृत्तांताविषयी मत

हा कालिदास-वृत्तांत सविस्तर देऊन डॉ. सोहोनींनी म्हटले आहे की हा केवळ काल्पनिक वृत्तांत नसून त्यात ऐतिहासिक सत्याचा मोठा अंश असावा. यात निर्दिष्ट केलेले कालिदासाचे वैश्यवर्णत्व मात्र त्यांना संमत नाही. पण या वृत्तांतात कालिदास गुप्त-नृपति कुमारगुप्त आणि स्कंदगुप्त यांचा समकालीन

होता असे म्हटले आहे ते त्यांना अत्यंत महत्त्वाचे वाटते. कारण ते ख्रिस्तोत्तर पंधराव्या शतकाइतक्या प्राचीन काळी – ज्या वेळी भारताच्या गुप्त वंशाविषयी मुळीच माहिती नव्हती त्या काळी – केले होते. विशेषत: त्यात 'रघुवंशा 'चे २५ सर्ग होते हे विधान पाहून तर त्यांना निरतिशय आनंद झाला. कारण दीर्घकालीन अभ्यास केल्यावर ते काव्य १९ व्या सर्गाअखेर संपले असेल असे त्यांना मुळीच वाटत नव्हते.

कुमारगुप्ताने कालिदासाला 'आमचे इक्ष्वाकु-वंशीयत्व वर्णन करणारे काव्य लिहावे' असे सांगितले असे वरील वृत्तांतात म्हटले आहे. डॉ. सोहोनी यांचा असा तर्क आहे की श्रीविजयमधील अप्रकाशित सहा सर्गांत गुप्त नृपतींचे इक्ष्वाकुवंशीयत्व अर्थात् सूर्यवंशीयत्व वर्णिले असावे. पण एका नंतरच्या कोरीव लेखात[२] सम्राट गुप्त नृपतींना चंद्रवंशी म्हटले आहे ते कसे? असा प्रश्न उपस्थित होतो. त्यावर डॉ. सोहोनींचे उत्तर असे की कुमारगुप्त आपल्या पित्याच्या बाजूने नव्हे तर मातेच्या बाजूने सूर्यवंशी असावा. त्याची माता ध्रुवस्वामिनी (द्वितीय चंद्रगुप्ताची पट्टराणी) हिची एक मुद्रा वैशाली उत्खननात मिळाली आहे. त्यावरून ती लिच्छवि कुलांतील असावी. वैशालीचे लिच्छवि हे स्वत:स सूर्यवंशी क्षत्रिय म्हणवीत. ध्रुवस्वामिनी सूर्यवंशी कुलात जन्मली असल्याने कुमारगुप्ताने आपला संबंध मातृकुलद्वारे इक्ष्वाकुवंशाशी जोडलेला दिसतो. म्हणून त्याने कालिदासाला इक्ष्वाकुवंशवर्णनपर एक महाकाव्य रचावयास सांगितले असे दिसते. ते संस्कृत काव्य सुप्रसिद्ध 'रघुवंश' होय.

'कालिदास – वृत्तान्ता 'चे चिकित्सक परीक्षण

आम्ही जेव्हा हा कालिदास–वृत्तान्त वाचला तेव्हा तो 'भोज–प्रबन्ध 'सारख्या ग्रंथांतील कालिदासविषयक आख्यायिकांसारखा वाटला. कालिदासाच्या 'रघुवंशा 'चे २५ सर्ग होते अशी किंवदन्ती संस्कृत पंडितांमध्ये प्रचलित आहे असे शंकर पांडुरंग पंडितांनी म्हटले आहे खरे, पण ते सर्ग अद्यापि प्रसिद्ध झाले नाहीत. ते दूरच्या श्रीविजय (सुमात्रा) देशामध्ये हस्तलिखितात अवशिष्ट आहेत, यावर आमचा विश्वास बसत नाही. तसे असते तर ते, हस्तलिखित केव्हाच प्रकाशित झाले असते. आम्हांस वाटते की 'रघुवंश' हा कालिदासाचा शेवटचा ग्रंथ होय. त्याच्या निधनामुळे तो अपूर्ण राहिला असावा.

डॉ. प्राणवितान यांनी प्रकाशित केलेला कालिदास –वृत्तांत तरी खरा आहे काय? डॉ. प्राणवितान म्हणतात की तो वृत्तांत पाच ठिकाणी दुसऱ्या प्राचीन कोरीव लेखांच्या ओळींच्या मध्ये कोरला आहे. असे कोरण्याचे कारण श्रीलंकेच्या महाविहारांच्या भिक्षूंचा विरोध, असे त्यांनी दिले आहे. पण जे भिक्षू या लेखांच्या कोरण्यालाच विरोध करीत होते त्यांनी इतर प्राचीन कोरीव लेखांमध्ये त्या वृत्तांताला कोरण्यास कशी संमति दिली, असा प्रश्न उपस्थित होतो. तेव्हा ही एक कल्पित कथा दिसते. पण याच्या उलट हे लक्षात घेतले पाहिजे की डॉ. प्राणवितान यांनी ज्यांवर तो वृत्तान्त 'पॅलींप्सेस्ट' पद्धतीने कोरला आहे ते प्रस्तर, शिलाखंड, व स्तंभ यांचे निश्चित संदर्भ दिले आहेत. ते खोटे कसे असतील?

या प्रश्नाचा निकाल लावण्याकरिता ते संदर्भ स्वत: पाहिले पाहिजत असे वाटून आम्ही डॉ. सोहोनी यांच्याकडून त्यांचे श्रीलंकानिवासी मित्र डॉ. गोदकुंबुरा यांचा पत्ता मिळवून त्यांना त्याविषयी विचारले. पण त्यांचे उत्तर आले नाही. त्या वृत्तांताचे संदर्भ मागे दिले आहेत. ते श्रीलंकेच्या पुरातत्त्व खात्याच्या कालिकांचे आहेत. म्हणून त्या खात्याच्या संचालकांना हवाई मेलने पत्र पाठवून त्या वृत्तांताच्या सत्यतेबद्दल आणि डॉ. प्राणवितानांबद्दल माहिती विचारली. पण त्याला दोन महिने झाले तरी उत्तर आले नाही. तेव्हा एका स्नेह्याने सुचविले की श्रीलंकेतील भारतीय हायकमिशनरला लिहावे. तेही करून पाहिले. त्यांनी आमच्या पत्राची माहिती श्रीलंकेच्या पुरातत्त्व खात्याच्या संचालकांना देऊन आम्ही मागविलेली माहिती पुरविण्याविषयी त्यांना विनंती केली आणि त्या आपल्या पत्राची प्रत आमच्याकडे माहितीकरिता पाठविली. त्या हायकमिशनरांनाही अद्यापि उत्तर मिळाले नसावे, कारण, त्यानंतर त्यांच्याकडून स्मरणपत्र पाठवूनही अद्यापि उत्तर आले नाही. नंतर अलिकडे मिरॅकल्स (चमत्कारां)-विरुद्ध दंड थोपटून उभे राहिलेल्या श्रीलंकेच्या डॉ. कोवूरना या बाबतीत पत्र लिहून सविस्तर माहिती मागवावी असे वाटून आम्ही त्यांनाही पत्र लिहिले. पण अद्यापि

२. *Bombay Gazetteer* (old ed.), Vol. I, part ii, p. 578.

त्यांचेही उत्तर आले नाही. तेव्हा कल्पना सुचली की श्रीलंकेच्या पुरातत्त्व खात्याची प्रकाशने व अहवाल भेटीदाखल भारत सरकारच्या मैसूर येथील चीफ एपिग्राफिस्टच्या ऑफिसात येत असावे. म्हणून मैसूर येथील आमचे स्नेही सेवानिवृत्त चीफ एपिग्राफिस्ट डॉ. जी. एस्. गै यांना प्राणवितान यांनी उद्धृत केलेले संदर्भ देऊन त्या लेखांत कालिदासवृत्तांत पूर्वीच्या लेखांच्या ओळींमध्ये कोरला आहे काय हे पाहून कळविण्याची विनंती केली. त्यांनी ते संदर्भ पाहून कोठेही तसा वृत्तांत कोरला नसल्याचे कळविले. तरीही समक्ष पाहिल्याशिवाय मनाचे समाधान होईना. म्हणून भारत सरकारच्या पुरातत्त्व खात्याकडून एपिग्राफिया झायलानिका, व्हॉ. १, व व्हॉ. ५, आणि श्रीलंकेच्या आर्किऑलॉजिकल कमिशनरांचा सन १९६१–६२ चा ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट हे ग्रंथ मागविले. त्यांत कोठेही असा वृत्तांत कोरला असल्याचे म्हटले नाही. फक्त एपि. झा., च्या पाचव्या व्हॉल्यूमच्या पृ. ३७३ वर दापुल राजाच्या एल्लवाव स्तंभलेखात कांही ठिकाणी ओळींमध्ये कोणी तरी ख्रिस्तोत्तर तेराव्या शतकात काही मजकूर कोरला आहे एवढेच म्हटले आहे.[3] त्या पृष्ठावरच्या तळटीपेत तो मजकूर कलिंग देशाच्या ख्रिस्तोत्तर तेराव्या शतकातील मघ राजाविषयी आहे असे प्राणवितानांचेच मत उल्लेखिले आहे. आता तेच प्राणवितान तो मजकूर म्हणजे ख्रिस्तोत्तर पंधराव्या शतकातील श्रीलंकेच्या सहाव्या पराक्रमबाहूने कोरविलेला कालिदास–वृत्तान्त आहे असे म्हणतात हा 'वदतो व्याघात' आश्चर्यकारक आहे ! इतर कोणत्याही लेखात, कालिदास–वृत्तांत तर राहोच, पण कोणताही अन्य मजकूर कोरलेला आतापर्यंत कोणालाहो आढळला नाही. तेव्हा "पूर्वोक्त ठिकाणी 'कालिदास–वृत्तांत' ओळींमधील जागेत कोरला आहे" हे प्राणवितानांचे मत धादांत खोटे आहे. असे असत्य विधान करण्याचे धाष्टर्य त्यांनी करावे हे अत्यंत आश्चर्यजनक आहे.

श्रीलंकेतील कालिदासविषयक आख्यायिका

श्रीलंकेमध्ये कालिदासविषयक काही आख्यायिका प्रचलित होत्या यात संशय नाही. सन १९१९ मध्ये पुण्यात प्राच्यविद्यापरिषदेचे पहिले अधिवेशन भरले होते. त्याला तत्कालीन मध्यप्रदेश शासनाचे प्रतिनिधि म्हणून आम्ही उपस्थित होतो. त्या प्रसंगी कलकत्त्याचे विख्यात तत्त्वज्ञान–प्राध्यापक डॉ० सतीशचंद्र विद्याभूषण यांनी 'कालिदासाच्या अग्निसंस्काराचे स्थान' या शीर्षकाचा आपला लेख वाचला होता. तो जिज्ञासूंस त्या अधिवेशनच्या अहवालात (व्हा. १, पृ. १२०-१६३) आढळेल. त्यात डॉ. सतीशचंद्र विद्याभूषण यांनी दाखविले होते की श्रीलंकेच्या दक्षिण भागातील मातर जिल्ह्यात – जेथे किरंदी नदी समुद्राला मिळते त्या ठिकाणी – कालिदासाच्या अग्निसंस्काराची जागा अद्यापि दाखविली जाते. ही आख्यायिका श्रीलंकेच्या अन्य भागांतही प्रचलित आहे आणि सुमारे ५०० वर्षांपूर्वी रचलेल्या 'पराक्रमबाहुचरित्र' या सिंहली ग्रंथात तिचा उल्लेख आहे असेही त्यांनी म्हटले आहे.

श्रीलंकेचा राजा कुमारदास हा कालिदास मित्र होता. 'एकदा कालिदास त्याच्या भेटीस गेला असता एका वेश्येने समस्यापूर्तीकरिता राजाने जाहीर केलेल्या मोठ्या बक्षिसाच्या लोभाने त्याला ठार केले' अशी आख्यायिका भारतातील संस्कृत पंडितांत प्रचलित आहे. ती आम्ही आपल्या 'कालिदास' ग्रंथात (तृतीयावृत्ति, पृ. ७७) दिली आहे. ती आख्यायिका ऐतिहासिक दृष्ट्या सत्य असणे शक्य नाही हेही तेथेच दाखविले आहे.

'कालिदास–वृत्तांत' बनावट

डॉ० प्राणवितान यांनी प्रसिद्ध केलेला कालिदास-वृत्तांत खरा मानण्यास आमचे मन धजत नाही. तो वृत्तांत संस्कृत वाङ्मय व प्राचीन भारतीय इतिहास यांचा परिचय असलेल्या कोण्या विद्वानाने रचला असावा असे आम्हांस वाटते. श्यामभट्टाच्या 'अय्यणवंशचरिता'ला बनावट मानण्यास जी कारणे आहेत तीच या वृत्तांताच्या बाबतीत विद्यमान आहेत.

डॉ० प्राणवितान यांनी पुरविलेल्या माहितीवरून श्रीलंकेचा राजा सहावा पराक्रमबाहु याने ख्रिस्तोत्तर पंधराव्या शतकात श्रीविजय येथे प्रचलित असलेल्या कालिदासविषयक आख्यायिकांचा संग्रह करून तो वृत्तांत आपल्या राज्यात पाच ठिकाणी कोरविला होता. तो वृत्तांत मागे दिला आहे. त्यावरून कालिदास हा कुमारगुप्त नामक गुप्त नृपतीचा राजकवि होता असे

३. *अलाहाबाद येथील समुद्रगुप्ताच्या स्तंभ–लेखातही असे उत्तरकालीन लोकांनी अनेक ठिकाणी कोरून तो लेख खराब केला आहे !*

कळते. या वृत्तांताच्या सत्यतेवर मुख्य आक्षेप हा की ख्रिस्तोत्तरं पंधराव्या शतकात केवळ श्रीलंकेतच नव्हे तर भारतातही कुमारगुप्त नामक गुप्त राजाची यत्किंचितही माहिती नव्हती. भारतीय वाङमयात इतिहासग्रंथांचा पूर्णपणे अभाव आहे. (कल्हणाची राजतरंगिणी हा एकच त्याला अपवाद आहे) समुद्र-गुप्त, चंद्रगुप्त, कुमारगुप्त, स्कंदगुप्त यांसारखे महा-प्रतापी राजे गुप्तवंशात होऊन गेले. त्यांनी अनेक देश जिंकून विशाल साम्राज्याची स्थापना केली, अश्वमेध यज्ञ केले, परकी आक्रमकांशी प्राणपणाने लढून स्वदेशाचे रक्षण केले. पण त्यांपैकी एकाचाही नाम-निर्देश एकाही संस्कृत ग्रंथात आढळत नाही. या बलाढ्य गुप्त नृपतींची माहिती गेल्या दीडशे वर्षांत अनेक परदेशी आणि भारतीय संशोधकांनी अविरत परिश्रमाने अभ्यासून प्रकाशित केलेल्या कोरीव लेखांवरूनच झाली आहे. उदाहरणार्थ, प्रयाग येथील समुद्रगुप्ताचा स्तंभ-लेख सन १८३४ मध्ये कॅप्टन् ए. ट्रॉयर याने प्रथम वाचण्याचा प्रयत्न केला. कुमारगुप्ताचे काही कोरीव लेख सन १८७३ ते १८८० या कालावधीत प्रथम माहीत झाले. तेव्हा पाचशे वर्षांपूर्वी श्रीलंकेमध्ये (किंवा दूरच्या श्रीविजयमध्ये) कुमारगुप्त व कालिदास यांच्या परस्परसंबंधाची व कालिदासाच्या ग्रंथांची यथातथ्य माहिती श्रीलंकेचा राजा सहावा पराक्रमबाहु याला असणे सुतराम असंभवनीय आहे.

तेव्हा हा कालिदास–वृत्तांत गेल्या दीडशे वर्षांत संशोधनाने प्राप्त झालेला प्राचीन भारतीय इतिहास ज्याला अवगत आहे अशा एखाद्या कल्पक विद्वानाने रचलेला दिसतो. त्याला कालिदासाच्या ग्रंथांची व तद्विषयक संस्कृत अलंकार–ग्रंथातील टीकेची माहिती असली पाहिजे. एकच उदाहरण देतो.

'कालिदास–वृत्तांता'चे संभाव्य आधार

'कुमारसंभवा'चे पहिले आठ सर्गच कालि-दासाचे आहेत. त्यानंतरचे नऊ सर्ग दुसऱ्या कोणी रचून ते काव्य पूर्ण केले आहे हे आता सर्वमान्य झाले आहे.[४] या पहिल्या आठ सर्गांवरच मल्लिनाथाची टीका आहे. हे काव्य अपूर्ण राहण्याचे कारण आठव्या सर्गात शिव-पार्वतींच्या संभोगशृंगाराचे वर्णन असावे हा तर्कही अत्यंत संभवनीय आहे. अरुणगिरिनाथ नामक टीका-काराने याविषयी एक आख्यायिका उल्लेखिली आहे. तो म्हणतो, 'आठव्या सर्गातील संभोगशृंगाराच्या वर्णनाने पार्वतीला राग आल्यामुळे तिच्या शापाने हे काव्य अपूर्ण राहिले ?' हेच कारण गुरुदेव रवीन्द्रनाथ ठाकुरांनी आपल्या एका पद्यात सुंदर रीतीने सुचविले आहे. त्यांनी अशी कल्पना केली आहे की, एकदा कैलास पर्वतावर शंकर–पार्वतीसमोर सर्व गणांच्या समूहात कालिदासाने 'कुमारसंभवा'ची कथा गाण्यास आरंभ केला. ते वर्णन ऐकताना आपल्या पूर्वायुष्यातील विविध प्रसंग आठवून पार्वतीदेवीच्या मुखावर तज्जन्य भिन्न भिन्न भाव उमटू लागले. त्यांचे सुंदर वर्णन रवींद्रनाथांनी आपल्या बंगाली पद्यात केले आहे. त्याचा संस्कृत अनुवाद आमचे मित्र प्रा. पु. ना. वीरकर यांनी पुढीलप्रमाणे केला आहे.[५]

किमपि चकम्पे क्वचित्सुमन्दस्मितेन देव्या ओष्ठयुगम् ।
तदनु च शीघ्रं मुक्तवती सा दीर्घमलक्षितनिःश्वासम् ।।
क्षणेन तस्या नयनापाङ्गे जाते बाष्पैः परिप्लुते ।
व्रीडाकुलसंभ्रान्तलोचना सपदि स्म च सा विलोक्यते ।।
ततस्तादृशीं देवीं गिरजां कविकुलभूषण विलोकयन् ।
सपदि नीतवान् भवान् विरामं मधुगानं निजमसमाप्तम् ।।

रवीन्द्रनाथांनी हे पद्य कविकुलगुरू कालिदासाला उद्देशून रचले आहे. ते म्हणतात, "कविकुलगुरो कालिदासा ! तुझ्या 'कुमारसंभवा'त वर्णिल्याप्रमाणे भगवान शंकरांचे दर्शन झाल्यावर आनंदाने पार्वती देवीच्या मुखावर मद स्मित विलसू लागले; पण एका क्षणातच घडलेल्या मदनदाहाने ती दीर्घ दुःखोच्छ्वास टाकू लागली. नंतर रतीच्या शोकावेगाने तिचे नयन अश्रूंनी भरून आले; पण लागलीच आठव्या सर्गातील संभोगशृंगाराच्या वर्णनांमुळे ती लज्जेत चूर होऊन तिचे नयन संभ्रांत झाले. ते पाहून, हे कविश्रेष्ठा ! तू

४. आमचा 'कालिदास' ग्रंथ (तृतीयावृत्ती), पृ. ११३–११४.

५. हे सर्वच पद्य अत्युत्कृष्ट आहे. प्रा. वीरकरांनी केलेले त्याचे संस्कृत रूपांतर आमच्या 'कालिदास' ग्रंथात (तृतीय आवृत्ती, पृ. ३००–३०१) दिले आहे. त्याचे इंग्रजी रूपांतर आमच्या 'कालिदास' (इंग्रजी) ग्रंथात दिले आहे.

अनुक्रमणिका

आपले मधुर गायन – ते समाप्त झाले नसताही– बंद केलेस."

या सुन्दर पद्यातही रवीन्द्रनाथांनी तीच कल्पना ग्रथित केली आहे. 'मेघदूत' काव्यातील यक्षाचे विरह-वर्णन कालिदासाने रामगिरीवर असताना स्वानुभवावरून केले असावे अशी काही लोकांची कल्पना आहे. तो रामगिरी उज्जैनीच्या दक्षिणेस विदर्भात आहे हे आमच्या गेल्या पन्नास–साठ वर्षांतील इंग्रजी लेखांवरून आता सर्वांस परिचित झाले आहे. आता राहिले कालिदासाच्या निष्कासनाचे कारण. तेही आनंदवर्धनाच्या 'ध्वन्यालोका' तील पुढील विधानावरून सुचले असणे अशक्य नाही.[६] 'उत्तमप्रकृति पात्रांच्या संभोगशृंगाराचे वर्णन वाचन वाचकांच्या मनात लज्जा उत्पन्न होते तशात हा शृंगार कवीला अत्यंत पूज्य वाटणाऱ्या त्रैलोक्याच्या जनकजननींचा – शिवपार्वतींचा. त्यामुळे तो अत्यंत अनुचित वाटतो. या शृंगाराचे वर्णन वाचून प्रत्येक सहृदय वाचकास स्वतःच्या मातापित्यांच्या संभोगवर्णनाने येते तशी किळस आली पाहिजे, असे आनंदवर्धनाने स्पष्ट म्हटले आहे.[६] या उक्तीवरून कालिदास–वृत्तांताच्या लेखकाला सूतप्रमुखाच्या तोंडी घातलेल्या कालिदासाच्या अनौचित्याची कल्पना सुचली असावी.

प्राणवितानांना 'कालिदास–वृत्तांत' कसा सुचला ?

वरील विवेचनावरून हा तथाकथित 'कालिदास-वृत्तांत' स्वतः प्राणवितानांनीच रचला असावा हे सहज सिद्ध होते. प्राणवितानांविषयी आम्ही जी माहिती गोळा केली त्यावरून हे सुतराम संभवनीय वाटते. ते श्रीलंकेतील पुरातत्त्व खात्यात १९४० ते १९५६ पर्यंत कमिशनरच्या अत्युच्च पदावर होते. त्यांनी श्रीलंकेतील ब्राह्मी लिपीतील कोरीव लेख संपादनाचे महत्त्वाचे कार्य केले आहे. सेवानिवृत्तीनंतर ते श्रीलंकेच्या विद्यापीठात आपल्या निधनापर्यंत सन्मान्य प्राध्यापक (एमेरिटस प्रोफेसर) होते. ते अलीकडेच जवळजवळ ८० वर्षांचे होऊन निधन पावले असे समजते.

अशा विद्वान् गृहस्थाने पूर्वोक्त धादांत खोटा वृत्तांत प्रसारित करून जनतेचा बुद्धिभेद का करावा हे कोडे उलगडणे कठीण आहे. आमच्या काही मित्रांनी सुचविले की वार्धक्यामुळे ते वेडे झाले असावे. पण हॅम्लेटच्याप्रमाणे त्यांच्याही वेडेपणात पद्धतशीरपणा आढळतो ! (There is a method in his madness.)

कदाचित् कालिदासाचा काळ व जीवनवृत्तांत यांविषयी एका नव्या सिद्धान्ताचा प्रतिपादक म्हणून आपली ख्याति व्हावी अशी त्यांची महत्त्वाकांक्षा असावी. 'रघुवंशा'च्या पाचव्या सर्गाच्या अखेरीस भाटांनी स्वयंवराकरिता विदर्भात आलेल्या अजकुमाराला प्रातःकाळी जागे करण्याकरिता म्हटलेले श्लोक अत्युत्कृष्ट गणण्यात येतात. 'कुमारसंभवा'च्या आठव्या सर्गानंतरचे सर्ग तत्कालीन विद्वानांच्या टीकेमुळे रचले नसावे हे आनंदवर्धनाच्या पूर्वोद्धृत विधानावरून अनुमानता येते. 'मेघदूता'तील कथानक एका निर्वासित प्रेमीचे आहे. तो ज्या रामगिरीवर काही महिने वास करीत होता ते स्थान दक्षिणापथात आहे हे त्या काव्यातील मेघमार्गाच्या वर्णनावरून सुस्पष्ट आहे. विद्वानांनी विविध प्रमाणांनी कालिदास गुप्तकालांत होऊन गेला हे सिद्ध केले आहे. या विविध सामग्रीवरून प्राणवितानांनी ही कालिदासवृत्तान्ताची कल्पित कथा रचलेली दिसते. कालिदासाला त्यांनी भाट करण्याचे ठरविले तेव्हा ब्राह्मणाला वैश्य पत्नीपासून तो झालेला दाखविणे जरूर होते. प्राचीन काळी अनुलोम असवर्ण विवाहाने झालेली संतती मातेच्या जातीची गणण्यात येई.[७] म्हणून कालिदास हा एका ब्राह्मणाला वैश्य स्त्रीपासून झालेला मुलगा असे त्यांनी कल्पिलेले दिसते.

तेव्हा श्यामभट्टाच्या 'अय्यणवंशचरिता'प्रमाणे[८] हा कालिदासवृत्तांत बनावट आहे. तो ख्रिस्तोत्तर पंधराव्या शतकाइतकाही पुरातन नसून अलीकडेच प्राणवितानांनी गेल्या शे–दीडशे वर्षांतील संशोधनाने उपलब्ध झालेली गुप्तकालाची माहिती, संस्कृत अलंकार–ग्रंथ, कालिदासाच्या काव्यांच्या टीका

---

६. पुढील उतारा पाहा –'*तस्मादभिनेयार्थे च काव्ये यदुत्तमप्रकृते राजादेरुत्तमप्रकृतिभिर्नायिकाभिः सह ग्राम्यसम्भोगवर्णनं तत्पित्रोः सम्भोगवर्णनमिव सुतरामसह्यम् तथैवोत्तमदेवताविषयम् ।*' *ध्वन्यालोक (हरिदास संस्कृत ग्रन्थमाला)* पृ॰ २१६.

७. म्हणूनच *'शाकुन्तला'त दुष्यन्त 'ही शकुन्तला कण्व ऋषीची असवर्ण स्त्रीपासून झालेली कन्या असेल का ?' असे स्वतःस विचारतो.*

८. *संशोधनमुक्तावली : सर ७, पृ. १७४ इ.*

इत्यादिकांतील विधाने व स्वत:ची कल्पनाशक्ती यांचा कौशल्याने उपयोग करून रचलेला दिसतो. त्यातील विधाने ऐतिहासिक सत्याच्या कसोटीस उतरत नाहीत.

'रघुवंशा'चे एकोणिसाव्या सर्गानंतरचे सहा सर्ग श्रीविजयमध्ये अद्यापि हस्तलिखितावस्थेत आहेत ही वार्ताही आम्हांस विश्वसनीय वाटत नाही. त्या सर्गांत कालिदासाने कुमारगुप्ताचा संबंध पुरातन इक्ष्वाकुवंशाशी जोडला होता हे प्रस्तुत कालिदास–वृत्तांतातील विधानही असेच अविश्वसनीय आहे. कालिदासाने आपल्या कोणत्याही ग्रंथात आपल्या आश्रयदात्याचे वर्णन केले नाही.[९] तो 'रघुवंशा'सारख्या आपल्या शेवटच्या ग्रंथात आपल्या नीतीहून चळला असेल असे वाटत नाही. गुप्तांच्या एकाही लेखात त्यांचे सूर्यवंशीयत्व निर्दिष्ट किंवा सूचित केले नाही. 'सूर्यवंश', 'चंद्रवंश' आणि 'अग्निवंश' या देवोद्भूत राजवंशाच्या कल्पना नंतरच्या कोरीव लेखांत आढळतात. ध्रुवस्वामिनी, काही इतर प्राचीन राण्यांप्रमाणे,[१०] वैशाली येथे अधिकारपदावर असावी. म्हणून तिच्या नावाच्या मुद्रा वैशालीच्या उत्खननात मिळाल्या आहेत.[११] ती लिच्छविकुलातील होती याला प्रमाण नाही आणि लिच्छविवंशी गणप्रमुख स्वत:स सूर्यवंशी म्हणवत होते याला काडीचाही आधार नाही.

'यज्ञफल', 'कृष्णचरित' आणि 'अय्यणवंश-चरित' याप्रमाणे प्रस्तुत 'कालिदास–वृत्तांत'ही सर्वस्वी बनावट आहे. संस्कृतज्ञ विद्वानांनी असे बनावट ग्रंथ रचून संशोधकांनी अत्यंत परिश्रमाने निश्चित केलेल्या प्राचीन इतिहासातील घटनांविषयी सामान्य जनांचा बुद्धिभेद करू नये. शेवटी सत्याचाच जय होतो आणि बनावट ग्रंथाचे पितळ उघडे पडते हे त्यांना स्नेहभावाने सुचवून हा प्रदीर्घ लेख पुरा करतो.[१२]

---

९. *फक्त 'विक्रमोर्वशीया'त 'विक्रम' पदावरील श्लेषाने त्याला सूचित केले आहे.*

१०. *उदाहरणार्थ, उत्तरकालीन चालुक्य नृपती सहाव्या विक्रमादित्याची अलौकिकसौंदर्यसंपन्न राणी चन्द्रलेखा त्याच्या साम्राज्यातील काही प्रदेशावर सत्ता गाजवीत होती.*

११. *आर्किऑलॉजिकल सर्व्हे रिपोर्ट, १७०३–४, पृ. १०१ इ.*

१२. *हा लेख लिहिल्यानंतर दोन महिन्यांनी श्रीलंकेच्या पुरातत्त्व खात्याच्या कमिशनरांचे आलेले पत्र उत्तर भारताच्या तेथील हायकमिशनरांकडून दि. २० एप्रिल १९७७ रोजी आम्हांस मिळाले. त्यात त्यांनी कळविले आहे की, 'प्राणवितानांनी कल्पिलेल्या कांही कोरीव लेखांच्या ओळींमधील वृत्तांताचे अस्तित्व सिद्ध करण्यास आवश्यक तो शास्त्रीय दृष्टीचा पुरावा नसल्यामुळे या खात्याला प्राणवितानांचे मत स्वीकारणे कठीण जात आहे.'*

अनुक्रमणिका

रानस्वर आणि सावल्या

पोपट सातपुते

*

जांभळाच्या झाडात झुकणारे भर पावसाचे दिवस
आता चितूर पक्ष्याच्या हाकांनी गजबजून गेलेले असल्याने
फार पलीकडच्या शेतातून येणारा क्लोक' असा एकांतिक आवाज
कापसाच्या बिया टोकणाऱ्या लिलीला ऐकू येत नाही –
मात्र सखेवाल्या परतल्याने रान कुलकुलत नाही तेव्हा
शेकण्यासाठी पेटविलेल्या शेकोटीने
हिवाळ्याची अख्खी रात्र उबविली जात असते
आणि जुन्या गमतीच्या गोष्टी आता दुःखदायक होऊन
काळोखाने झिडकारलेल्या रानहोल्याप्रमाणे भांबावून फडफडू लागतात.

*

आपले डोळे अधू झाले की रानाचा वृद्धापकाळ जवळ येऊ लागतो
खोकडाच्या मिषाने ते रात्री पहाटे खोकू लागते,
आपल्या अतिक्षीण हृदयाला मरण समीप येणारी
अथांग भरती त्याला सोसत नाही.
तरीही शतकाशतकांचा परिचय असलेल्या
औतकऱ्यांच्या उत्साहपूर्ण आवाजाला ते मनातल्या मनात
हसतच असते की काय कोण जाणे.
परंतु असल्या आनंदपूर्ण हाका थांबतात न थांबतात तोच
ढगांच्या कुशी काळ्या होऊ लागतात
आणि हजारो–हजार विभिन्न पक्ष्यांचे थवे आभाळभर नाचत असतात.

*

पहा, कशाशाच वासाच्या तिळाच्या फुलाला
उमलण्यातलं सुख लागत आहे
आणि टांगा टाकीत येणाऱ्या जंगली वाऱ्यासारखा दाह वाढत आहे.
अगं बाई, आमचा सगळा एकांत उन्मत्त सावल्यांचा.
केवढो धुंदी !
सभोवार निळसर धुके दाटत असते
नसानसांतून दिव्य हुंगाम झुलू लागतो
आणि पुराच्या अधीर पाण्याप्रमाणे सगळा उन्माद पैलपार होतो तेव्हा तर
शिरीषाच्या झाडांनी मिटून घेतल्याप्रमाणे आम्ही अनंतकाळ झोपून जातो.

*

लालभडक फुललेल्या पांगाऱ्याच्या झाडातून
बिनसलेला वारा वैरी वैरी ओरडत आहे
आणि पांगाऱ्याच्या मोठाल्या टोकदार पाकळ्या
भिजलेल्या पोलक्याप्रमाणे मातीला चिकटून बसल्या आहेत.
शेपूट उलटे होऊन अख्खे अंगच विस्कटून जात असले तरी
भारद्वाज पक्ष्याची मादी आज्ञाधारकपणे वसून आहे.
पण आता यापैकी काहीच नाही –
रात्र झाली आहे
खूपच रात्र झाली आहे
हवेत हुरहुर भरली आहे
आणि राजा मदन हक्काच्या चोरीला निघाला आहे.

*

रानभेंडीच्या झाडात सात बायांचा गलका वाढतच असतो
चांगले परिचयाचे असलेले लिलीचे निर्भर हसणेही आता मावळू लागते
आपल्या बायकोचा राग कोतवाल पक्षी
मुकाटपणे खाली मान घालून ऐकून घेत असतो.
रान हसतच असते
पंख फडफडवीत उडणाऱ्या पाणकावळ्याच्या मनात तर अवेळीच सांजावून येते –
आणि नदीकाठच्या उन्मन गवतातून
ऊन वाऱ्यामागून आडवे तिडवे सुसाटत येणारे पावसाचे थेंब
रूप यौवन वृद्धापकाळ यांच्या पार पलीकडे निघून जातात.

*

आता ऊस तोडण्याचे काम चालले आहे
आणि मंडळी भलरी म्हणण्यात गढून गेली आहेत.
हे भलरीचे स्वर रानभर कुठल्या कुठे पांगून जातील
तरी हिवाळ्याचा आत्मा नेमाने जागृत होईलच.
रानाच्या कानावर मुलींच्या गाण्याचे शब्द गेले
तरी गुंजेच्या लाल काळ्या बिया ओघळून पडत असतील.
पर्णरहित सोनचाफ्याचे सूर्याकडे तोंड करून उमललेले एखादे फूल
मान टाकते तेव्हा माणसांच्या जगात सुख-दुःखांनी घातलेले थैमान
जराही कमी होत नाही.
शेतांनी कसले कसले आवाज ऐकले आहेत कोण जाणे
परंतु माणसांच्या गाठी सुख-दुःखाचा हिशोब आहे
तसा आशा–निराशेचा अनुभवही आहे –
तरीही रानाचे सर्वांग अद्भुत वासाने दरवळत असते
तेव्हा अख्खी मानवजात कोड्यातच असते
कारण युगायुगांचा आपला अनुभव रानाने पार तळाशी दडवून ठेवला आहे.

अनुक्रमणिका

*

त्याला जागे करण्यात आले तेव्हा
त्याचे लोकर कातरण्याचे काम अर्धवटच राहिले.
आता त्याच्या मनातील अपराधीपणाची भावना गेली असली
तरी कित्येक वर्षांपूर्वी केलेली आणखी एक चूक त्याच्या लक्षात आली
आणि शिवाराची सारी रखरख जिभेवर जमल्याप्रमाणे
त्याने आपले ओठ अगदी बेचवपण हलवले.
आता त्याची गर्भार बायको समोर असती तर कदाचित
तिची कित्येक बाळंतपणे त्याला आठवली नसती
आणि पाणकोंबडीच्या छातीचा नितळ पांढरेपणाही अतिपरिचयाचा वाटला नसता.
– तरीही थिजणाऱ्या उजेडाचा उदास जांभळा रंगच त्याच्या गळचात उतरला
आणि टेकाडावर एकटेच ओरडत पळणाऱ्या
कोकराच्या आर्त आवाजात तो रडू लागतो.

*

गर्भकळा पसरलेली निवांत शेतं अज्ञात आनंदाच्या राज्यात मावळत असल्याप्रमाणे
वर्षाऋतूच्या हिशोबातून जात चालली असली तरी
लिलीच्या अंगाला येणारा भातशेतांचा मधुर वास
आणि आपले उमेदीचे दिवस
रुणझुण पक्ष्यांच्या तालावर नाचतच असतात.
गावाच्या आसपास दुर्बल पक्ष्यांचे थवे मजेने घोटाळत असतात.
शेत शिवारांचे आशीर्वाद असोत नसोत
माणसाच्या जातीला समृद्धीचेच स्वप्न पडत असते.
पाहता पाहता उमलणाऱ्या मुलींच्या अंत:करणातील
मुग्ध संभ्रमाप्रमाणे कर्दळीच्या पिवळ्या तांबड्या फुलांमागून
गोल पांढऱ्या वियांनी भरलेले हिरवे काटेरी बोंड वर येते
तेव्हा काळाचा गूढ आरक्त चेहरा डोळे मिटून बोलू लागतो
आणि सोललेल्या पायांनी स्वप्नातून चालत गेल्याप्रमाणे
संध्याकाळभर भिरभिरणारी सुखद खंत
रानाच्या अंगाखांद्यावरून ओळखीच्या पार पलीकडे निघून जाते.

मीलन

वैजयंती काळे

विदुला : (हातांतला पुष्पगुच्छ पडद्याच्या दारावर धरुन) हे बघाना जयंत, हा गुच्छ इथं कसा दिसतो? फ्लॉवरपॉटमध्ये ठेवण्यापेक्षा असाच छान दिसेल, नाही! पडदा हलला की फुलंही हलतील. बघणाऱ्याला वाटेल, इथे खरीखरी फांदीच उमलली आहे.

(जयंत तिच्याकडे बघतोय, पण तिच्या बोलण्याकडे त्याचं लक्ष नाही.)

जयंत, ऐकताय ना? मी तुमच्याशी बोलत्येय.

जयंत (भानावर येत हसून) हो, हो, ऐकतोय ना!

विदुला : मग सांगा बरं, कसं दिसेल?

ज० : काय कसं दिसेल?

वि० (फुरंगटून) हे काय हो जयंत? सदा तुमचं माझ्या बोलण्याकडे लक्ष नसतं.

जयंत : विदुला, मी तुला कितीदा सांगितलंय, हजारवेळा जयंत, जयंत करीत जाऊ नकोस. माझ्या आईला ते आवडायचं नाही.

विदुला अय्या! तुमचं नाव नुसतं घेतलेलं तुमच्या आईला आवडायचं नाही? आपण तर कित्ती फ्री बोलतो. मग कसं होईल हो माझं?

ज० : ए, अशी एकदम हातपाय गाळू नकोस. मी घेईन तुला सांभाळून, पण आधीच सूचना देऊन ठेवतो; एवढ्यासाठी की, तुला पाहिल्याबरोबर, पहिल्या भेटीत आई खूष झाली पाहिजे म्हणून तर तुला आज इथं बोलावून घेतली.

विदुला : आज काय भटजींनी मुहूर्त काढून दिला वाटतं?

ज० : नाही ग, अनायासे आज आईची एकसष्ठी आहे. तिच्यासमोर मी तुला उभी करणार आणि सांगणार, आई, हे तुला वाढदिवसाचं प्रेझेन्ट – ही तुझी सूनबाई.

वि० : अरेरे! हे तर स्वत:लाच प्रेझेन्ट घेणं झालं. तुमची आई अशानं फसेल होय?

(जयंताची बहीण विद्या येते. पदवीधर, नोकरी करणारी)

विद्या० : हॅलो विदुला! आत्ता संध्याकाळची तू इथे कशी? अरे? जयंता, तू पण? मग विदुला दुसरीकडे कुठे जाणार!

जयंत : विद्या, फाजिलपणा करू नकोस. तूही आताशा रोज संध्याकाळची कुठे तरी गडप होतच असतेस ना? आज मुद्दाम बोलावून घेतली तेव्हा ताईसाहेब घरी आल्या. चल आमच्या मदतीला ये. हे उशांचे अभ्रे बदल. अर्ध्या तासात तयारी झाली पाहिजे.

विद्या : (त्याच्या मदतीला लागत) कसली तयारी? तू मला ऑफिसात फोन केलास तेव्हाच विचारणार होते तेवढ्यात फोन कट झाला. आज काय आहे आपल्याकडे?

जयंत : ए शहाणे, आज आईचा वाढदिवस विसरलीस कां? आज आई एकसष्ठ वर्षांची झाली. सकाळी एकदम मला सुचलं, आणि मी हा समारंभ ठरवला.

विद्या : आई एकसष्ठ वर्षांची झाली? तुला कुणी सांगितलं?

विदुला : काय हे विद्या? स्वत:च्या आईबद्दल असं?

विद्या : हीच गंमत आहे बघ विदुला, ती आई आहे हे खरं. पण माझी आई किंवा आपली आई असं कधी आमच्या तोंडात येतच नाही. नाही का जयंत?

जयंत : खरंय तुझं. पण आपण तरी असे अलिप्त कसे झालो ग?

विद्या : आईमुळे! ती आपल्याशी कोरडं वागली तसेच आपण तिच्याशी. या वृत्तीचा मला फार राग येतो.

जयंत : मला वाईट वाटतं. तुझ्यासारखा राग येत नाही. मला असं वाटतं, आपण दोघं अगदी लहान असतानाच बाबा गेले. तिच्याजवळ फारसा पैसा

नव्हता, आधार देणारे नातेवाईक नव्हते. अशा स्थितीत आपली जबाबदारी पार पाडावी लागल्याने ती अशी झाली असावी.

विद्या : तिनं मोठं दिव्य केलं हे खरं. पण त्यामुळे आपल्याशी वागण्यातला ओलावा नाहीसा व्हायचं काय कारण ?

विदुला : मला आपलं वाटतं . . . सांगू का मला काय वाटतं ते ?

जयंत : अग ऽ अशी घुटमळतेस कशाला ? तू आता या घरातलीच होणार आहेस ना ?

विदुला : असं नाही जयंत, पण विद्याला . . .

जयंत : हं ऽ ! विदुला !

विदुला : ओ सॉरी ! तुमचं नाव न घेता बोलते. असं नाही हो, पण ती तुमची आई आहे आणि मी मानसशास्त्राच्या अभ्यासातला एक प्रश्न या भूमिकेने त्याच्याकडे बघणार. कदाचित तुम्हाला, विद्याला त्याचा राग येईल.

विद्या : छे: छे: ! तुझं मानसशास्त्रीय पृथक्करण तू अगदी मोकळेपणाने कर. आम्ही काही इतके हळवे नाही.

विदुला : मला असं वाटतं, तुमचे वडील गेले तेव्हा त्या जेमतेम तिशीला आल्या असतील. त्यांना कदाचित असं वाटत असेल की, ही दोन मुलं नसती तर आपण पुन्हां लग्न केलं असतं. नवा संसार थाटला असता. या दोन मुलांमुळे आपण जखडून पडलो. (जयंत हातांतलं काम टाकून गप्प उभा राहातो. त्याच्याजवळ जात) रागावलात ?

जयंत : नाही ग ! तू बोलत्येस त्यांत काय खोटं आहे ? कधीकधी मलाहि तसंच वाटतं.

विदुला : कदाचित, तुमच्या वडिलांवर त्यांचं एवढं प्रेम असेल की त्यांचे जागी दुसऱ्या पुरुषाची कल्पनाच त्या करू शकल्या नसतील. (विद्याच्या खांद्यावर हात ठेऊन) तुला काय वाटतं विद्या !

विद्या : (खांदे उडवून) कोण जाणे बाई ! आईच्या मनात काय चाललं असेल याची मी कल्पनाच करू शकत नाही. आम्ही तिघं कधी निवान्तपणे एकत्र बसलो नाही, मोकळेपणानं बोललो नाही. तिनं एकदाही मागच्या आठवणीसुद्धा काढल्या नाहीत.

विदुला : कशा काढतील त्या ? त्यानं त्यांचं मन हेलावलं असतं. आणि आपल्या आईला रडताना पाहून तुला काय आनंद झाला असता ?

विद्या : आनंद ऽऽ ! हा शब्द फार मोठा आहे. निदान मला हलकं वाटलं असतं. आपली आई मानवी आहे एवढं तरी जाणवलं असतं.

विदुला : विद्या तू फार कठोरपणाने बोलते आहेस.

जयंत : पण ती खरं बोलते आहे. आजकाल विज्ञान-कथांत यांत्रिक मानवाची वर्णनं येतात तसाच एक यांत्रिक मानव आईच्या रूपानं आपल्या घरांत वावरतोय असं मला वाटतं. तिनं आपल्या दु:खाचं कधी प्रदर्शन केलं नाही हे खरं. पण सदैव स्तब्ध असलेल्या तिच्या चेहऱ्याचं मनावर दडपण येतं हेही खरं.

विद्या : हे सगळं तू आज बोलतोयस. मला वाटायचं, असले विचार माझ्याच मनात येतात.

विदुला : मग त्यांनी कसं वागायला हवं होतं ?

विद्या : माणसासारखं. तिच्या सुखदु:खांत तिनं आम्हाला सहभागी करून घ्यायला हवं होतं. तुला सांगते विदुला, जयंत एम. बी. बी. एस. झाला त्या दिवशी मी आनंदाने अक्षरश: नाचले. कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला होते मी. ढीगभर मैत्रिणी जमवल्या. जो भेटेल त्याला पेढे देत सुटले. आईनं पेढे आणायला पैसे दिले. पण ती स्वस्थ बसली होती.

विदुला : आज तुमचे वडील असायला हवे होते, या कल्पनेने त्यांना उदास, जड वाटत असेल.

विद्या : हट् ! मला नाही पटत आणि समजा तसं वाटतं तर तिनं निदान जयंताला पोटाशी धरायला हवं होतं. तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळायला हवे होते — आनंदाचे, दु:खाचे, कसलेही ! त्यांत आम्ही विरघळलो असतो. तिघं मनानं एक झालो असतो. पण तसं झालं नाही. ती निर्विकार. आम्ही दुरावलेलो !

जयंत : जाऊ दे विद्या ! त्या आठवणीनं आज मनाचा विरस करून घेऊ नकोस. तिनं निदान तिचं कर्तव्य तरी पार पाडलं ना ? बस् झालं. चल मी मोगऱ्याची फुलं आणली आहेत त्यांचा हार कर. बाबांच्या फोटोला घाल. तोपर्यंत मी या फ्रेम्स् पुसतो.

विद्या : तू सांगतोयेस ते करते मी. पण या कशाचीच आईला चव वाटेल असं समजू नकोस.

विदुला : विद्या, तुझं सगळं ऐकल्यावर मलाही वाटायला लागलंय की त्यांनी पुनर्विवाह केला असता तर बरं झालं असतं. तुमच्या नात्यात कुणी वडीलधारी माणसं नव्हती का? त्यांचेपैकी कुणी पुढाकार घेतला असता तर त्यांचं लग्न झालंही असतं नाही का?

जयंत : कोण जाणे वुवा! आम्हांला कधी आईच्या मनाचा थांगच लागत नाही. मी पहातोय तसं, एक शांत सदाचारी विधवा, हेंच तिचं रूप आहे. जणू काही, एक विधवा आई अशीच 'ही' मूर्ती एकदम निर्माण झाली.

विद्या : नुसती विधवा नाही जयंत, आदर्श विधवा! मला खरंच वाटतं विदुला, तसलं ते फर्स्टक्लास वैधव्य भोगण्यापेक्षा तिन पुन्हां लग्न करून सेकंड क्लास संसार केला असता तर ती सुखी झाली असती. आम्हांला सावत्र वडील आले असते, त्यांच्यामुळे तिचं आमच्याकडे जरा दुर्लक्ष झालं असतं. पण घरात मोकळेपणा, चैतन्य आलं असतं. आजच्या धीरगंभीर आईपेक्षा ती थोडी बेफिकिर पण हसूनखेळून राहाणारी आई मला अधिक आवडली असती.

जयंत : तुझं सगळं खरंय विद्या. पण आज या चर्चेचा काय उपयोग? आपण तर तिची एकसष्ठी साजरी करतोय. आजपासून तिचा वानप्रस्थाश्रम सुरू होणार.

विद्या : हट्! वयावर काय आहे? वानप्रस्थाश्रम काय, आपण पुढे ढकलावा तितका ढकलला जातो. अमेरिकेतले लोक नाही का साठाव्या न् सत्तराव्या वर्षी लग्न करून हौसेने संसार थाटतात? तसं आपल्याकडे का होऊ नये?

विदुला हा विचार तसा बरोबर आहे. इतकी वर्षं तुमची दोघांची जबाबदारी त्यांच्यावर होती. आता तुझंही लग्न होणार. मुलगा मुलगी दोघंही आपापल्या मार्गाला लागतील, मग त्यांच्या जीवनात भयाण पोकळी निर्माण होईल.

विद्या : म्हणूनच मला वाटतं, या एकाकी अवस्थेत तिला जोडीदार हवाच हवा.

जयंत : काहीतरीच तुझं. आपल्याकडे अशी प्रथा नाही. आणि तिने लग्न करायचं म्हटलं तरी लगेच तसा जोडीदार कुठून उभा करायचा! शिवाय तिच्या मनाचा काही विचार नको का?

विद्या : हं ऽ! ते कठीण आहे. कारण माझ्या दृष्टीने आईचं मन हे मला न कळणाऱ्या लिपीतलं पुस्तक आहे. पण तरीसुद्धा मला वाटतं, ही अशक्य गोष्ट शक्य व्हावी. आज या वयातही आईचं सौष्ठव कायम आहे. देवानं तिला रूप दिलंय. तिला सवाष्ण बघावी अशी माझी फार फार इच्छा आहे.

(आणि सवाष्णीच्या वेषात आई येते. तिच्या शरीरावर उतारवयाची साक्ष नाही. जरीचं सुरेख लुगडं. अंगात त्याला साजेसं पोलकं. कपाळावर ठसठशीत कुंकू. अंगावर मोजके अलंकार. सुखी सुवासिनीचं, संतुष्ट गृहिणीचं मूर्तिमंत चित्रच! तिघेही भयचकित होऊन तिच्याकडे बघतात. विद्या तर तोंडातून फुटणारी किंकाळी हाताने दाबते. विदुला विलक्षण कुतुहलाने तिला न्याहाळते आहे. प्रथम भानावर येतो तो जयंत.)

जयंत : आई, वेळेवर आलीस. आमची सगळी तयारी झालीय बघ.

आई : (विलक्षण उत्साहाने) झाली ना? छान! त्यांची यायची वेळही झालीच आहे!

विद्या : (जवळजवळ किंचाळत) त्यांची? त्यांची म्हणजे?

आई (लाजून, पदराचे टोक हाताने चुरगाळीत) इश्य! त्यांची म्हणजे...त्यांचीच (त्या उत्तर देत असल्या तरी आपली मुलं आपल्या समोर आहेत याचं त्यांना भान नसावं. त्या स्वत:च्याच तंद्रीत).

जयंत (धीमेपणाने) आत्ता एवढ्यात आबाकाका येतील, गंगूमावशीलाही बोलावलंय. मी म्हटलं, तुला वडीलधारी माणसं अशी तीच दोघं आहेत.

आई (चिडून) कशाला ती भुतावळ? आज कुणी नकोय यायला.

विद्या : असं काय आई? आपले नातेवाईकच नाहीत का ते?

आई : हः! मला नाहीत कुणी नातेवाईक. विद्या, आज या फ्लॉवरपॉटमध्ये फुलं दिसत नाहीत ग?

विद्या : अग, आज फुलं आपल्या पडद्यावर लावलीय ही बघ ! या विदुलाची कल्पना बरं का. काय विदुला ? कुठे शिकलीस ही आयडिया ?

(आईनं विदुलाकडे पाहावं, त्यामुळे विषयाला अनुकूल वळण मिळेल ही विद्याची धडपड. सूनबाई म्हणून त्या आपलं कसं स्वागत करतात या आशंकेने विदुलाही पदर सावरून एक पाऊल पुढे येते. पण आईचं लक्ष नाही. खोलीत सगळीकडे नजर टाकून.)

आई : बागेत तरी फुलं असतील ना ? लाल गुलाबाचं एखादं फूल मिळालं तरी पुरे. नाहीतर पिवळ्या गुलाबाचं.

जयंत : कशाला हवंय आई ? कुणासाठी ?

आई (गोंधळून) कुणासाठी म्हणजे ? मला ! माझ्यासाठीच ! (तंद्रीत) कुठे बाहेर जायचं असलं अन केसांत फूल नसलं तर लगेच खप्पा मर्जी ! (डाव्या हाताने लुगड्याचा पदर हातावर घेऊन न्याहाळत) मला वाटतं, या पातळावर पिवळ्या गुलाबाचं फूल जास्त शोभेल. बागेतल्या वेली गुलाबावर एखादं तरी फूल असेल. (जायला निघते.)

विद्या : कुठे निघालीस आई ?

आई : कुठे म्हणजे ? बागेत. फूल हवंय मला.

विदुला : आपण बसावं. मी आणते.

आई : छेः ग बाई ! ज्याची आवड त्यालाच माहीत ! आलेच मी.

(वयाला न शोभणाऱ्या चपळाईने बाहेर जातात.)

जयंत-विद्या (धपकन खाली बसून कपाळावर हात मारून घेत) माय गॉड ! आईला झालंय तरी काय ?

जयंत : विदुला, तुला लागतोय का याचा काही अर्थ ?

विदुला : नाही बाई ! मी तर त्यांना पहिल्यांदाच पाहात्येय. पण विद्यानं त्यांचं जे वर्णन केलं होतं, त्यापेक्षा हे भलतंच निराळं काहीतरी दिसतंय.

विद्या : आईनं पुनर्विवाह करावा असं मी म्हटलं, ते तिनं मनावर घेतलं की काय ?

जयंत शटप् विद्या. यट्टेला काही काळवेळ !

विदुला : रागावू नका बाई. कुणीही गोंधळून जाईल असाच हा प्रकार आहे. पण त्या इतक्या छान नटल्या तरी कशा ?

जयंत : आणि खुषीत आहे ! दिसत्येय किती सुरेख ! हसत्येय, लाजत्येय ! विदुला, तुलासुद्धा इतकं नाजूक लाजता येत नाही.

विदुला : शीः ! त्यांची न माझी कसली तुलना करता ? त्यांचं हे हसणं न् लाजणं मला कसंतरीच वाटतंय.

विद्या मलासुद्धा ! आबाकाका न् गंगूमावशीचं नाव काढल्यावर हिला इतकं खवळायला काय झालं रे ?

विदुला : तुमच्या संकटकाळात त्यांनी कदाचित मदत केली नसेल.

विद्या : त्यांची स्वतःचीच परिस्थिती फारशी चांगली नव्हती.

जयंत : त्या दोघांनी आम्हांला जशी मदत केली नाही, तशाच नसत्या पंचायतीही कधी केल्या नाहीत. वेळोवेळी येतात, चौकशी विचारपूस करतात. आमचं दोघांचं कौतुक करतात. आणखी काय करावं त्यांनी ?

विद्या : आईसुद्धा त्यांच्याशी अगत्यानं वागते नेहेमी. तिच्या मनात त्यांच्याविषयी इतका तिटकारा आहे हे आजच बाहेर पडलं.

जयंत खरंच ! कोडंच आहे आई म्हणजे. तुला अवघड जाणार आहे विदुला.

विदुला : ते पुढचं पुढे बघू. आज या घटकेला काय करायचं ते ठरवा. त्यांच्या मनाची काहीतरी विलक्षण उलथापालथ झालेली दिसत्येय.

विद्या : हो ना ! आईला सवाष्ण बघावीशी वाटते असं मी म्हटलं. पण खरंच ती तशी आली तर मला धडकीच भरलीय.

जयंत : काय आलं असेल तिच्या मनात ? मी डॉक्टर असून गोंधळलोय.

विदुला : त्यांच्या मनात विलक्षण संयम आहे असं तुम्ही म्हणालात ना ? संतत निर्विकार राहणाऱ्या त्या चेहऱ्यामागे अनेक कल्लोळ उमटत असतील. आज त्यांनी त्यावर घातलेल्या संयमाच्या झाकणाला तडा गेला असेल.

विद्या : म्हणजे ? विदुला ! तुला म्हणायचंय तरी काय ?

विदुला अगबाई ! त्या आल्याच (आई स्वतःशीच गुणगुणत, हातांतलं पिवळ्या गुलाबाचं फूल अंबाड्यात खोचत येते).

जयंत (आईचा हसतमुख चेहरा बघून आवंढा गिळत) मिळाली ना फुलं ? तुला बागेत बराच वेळ लागला ?

आई (हसून खेळकरपणे) अरे, तशीच मग पुढे गेले. चितळ्यांकडे श्रीखंडाची ऑर्डर देऊन आले. आधीच उशीर झालाय. चक्का आणून श्रीखंड गाळायला वेळ कुठाय ?

विद्या : आई, आई, (जवळ जाऊन तिच्या दोन्ही खांद्यांना धरून खाली बसविण्याचा प्रयत्न करीत) आई ग, अशी बस बरं. मला सांग, कोण येणार आहे आपल्याकडे ?

आई (तिचे हात दूर करीत, चिडचिडत) विद्या, कितीदा सांगितलंय मोठ्या माणसांच्या पंचायती करू नयेत म्हणून ? (स्वतःशीच हसत, लाजत) कोण येणार आहे ते काय सांगू ?

जयंत : (काहीतरी सुचून), आई बाबांचा फोटो या उजव्या भिंतीवर लावू का ? खूप दिवस या बाजूला लावलाय आपण.

विदुला : हं, तसंच करू या. सगळ्यांना तो बरोबर समोर दिसला पाहिजे.

(त्यांच्या बोलण्याकडे आईचं लक्ष नाही. फूल, अंबाड्यात कसं बसलंय ते ती आरशात मान तिरकी करून पाहात आहे. मग खोलीतल्या सजावटीकडे चारी बाजूंनी नजर टाकून)

आई : हं, हे सगळं ठीक आहे. (उठून खुर्चीवरच्या उशा तिरप्या, सरळ ठेवून पाहात) पण मला ठीक वाटून काय उपयोग ? तुम्हांला आवडलं पाहिजे. किती वाजले ? साडेसात ? अगबाई ! फार वेळ राहिलाच नाही. केव्हाही गाडी येईल. (अतिशय चपळाईने खोलीतल्या खोलीत इकडून तिकडे करीत, आतुर प्रेयसीच्या आविर्भावात)

हे माझं सदाचंच आहे. आधी काही ठरवायचं नाही. मग आयत्या वेळी तारांबळ. जाऊ का स्टेशनवर त्यांना आणायला ? का येऊ देत त्यांनाच? मी स्टेशनवर गेले तर स्वारी खूप होईल. तेवढंच वाट बघणं कमी. पण काय झालं त्यांनी थोडी वाट पाहिली तर ? मी एकसारखी वाट बघत्येय ती ? किती वाट पाहिली ! दहा मिनिटं ? दहा वर्षं ? अंहं ! शंभर वर्षं ! नाही ग बाई, आता मला मुळीच धीर निघत नाही. सारी कामं मी उरकलो आहेत. (दूरवर बघत) ऐकलंत ? आतां मुळीच नाही मी थांबणार. तुम्ही यायच्या आधी मीच येते तिकडे ? ही मी आलेच !

('आई ग ऽ' अशी किंचित किंकाळी फोडून कोसळून पडते. स्तंभित होऊन जागच्याजागी खिळून राहिलेले तिघेही एकदम पुढे धावतात विद्या 'आई ! आई ग ! ' करून हाका मारू लागते. जयंत तिचे कपडे भराभरा सैल करतो. टेबलावरच्या लोटीभांड्यातलं पाणी ओतून तिच्या कपाळावर मारतो. विद्याला सांगतो – जा शेजारी जाऊन ॲम्ब्युलन्सला फोन कर; तो धावत आत जाऊन आपली बॅग घेऊन येतो. इंजेक्शनची सिरींज काढून त्यात औषध भरतो. पुन्हा शंका येऊन आईजवळ जातो, नाडी बघतो, स्टेथास्कोप लावतो. आणि 'आई ग ऽ' करून तिच्या अंगावर पडतो. विदुला त्याला अुठवून बाजूला नेते.)

विदुला:—नका, असे शोक करू नका, त्या खरंच त्यांना भेटायला गेल्या ! आजवर मुलांसाठी त्यांनी मनावर, भावनांवर सयमाचा दगड ठेवला. आज त्यांच्या आयुष्याचं नवं पर्व सुरू होणार. त्यामुळे त्यांच्या मनातल्या ऊर्मी अशा अनावर उसळल्या की तो मणामणाचा दगड उडून गेला. त्या क्षणी त्या वजनानं दाबून ठेवलेलं चैतन्यही हरपलं. उठा. या सतीला वंदन करून तिचे आशीर्वाद घेऊ !

नाटक–चित्रपट : एक कलांतर, अत्र्यांचा प्रयोग

शशिकांत शां० देशपांडे

नाटक व चित्रपट या दोन्ही कलांचे तंत्र भिन्न आहे. साम्यापेक्षा दोन्ही माध्यमांत फरकच अधिक जाणवतो. नाटकाचे पुस्तक जोपर्यंत ग्रंथालयात पडून असते तोपर्यंत खऱ्या अर्थाने ते समूहापुढे (Mob) आलेले नसते. प्रयोगरूपाने सिद्ध झालेले नाट्यलेखन प्रायोगिक अंगाने परिपूर्ण झाल्याने रंगभूमीशी त्या लेखनाचा संबंध जोडला जातो. नाट्यलेखनाकडून (Scribe) प्रयोगाकडे वाटचाल करणाऱ्या नाटकाचे (Play) रूप त्याच्या जीवनविकासातील एक अपरिहार्य पण महत्त्वाचा टप्पा मानला तर, चित्रपटासाठी लिहिण्यात आलेल्या कथानकावर योग्य तो संस्कार करून वेगवेगळ्या दृश्यांच्या द्वारे अनुभूती प्रेक्षकांपर्यंत संक्रांत करणे म्हणजे चित्रपटाला मूर्त स्वरूप मिळणे असेच म्हणावे लागते. पण नाटक व चित्रपट यांतील साम्य यापेक्षा अधिक नाही. अभिनयाच्याद्वारे नाटककार व कथालेखक यांच्या जाणिवा लोकांपर्यंत पोहचविणे हेच महत्त्वाचे साम्य दोन्ही कलांत जाणवते. यापुढील विचार मात्र या दोन्ही कलांतील भेदाचा, कलांतराचा विचारच ठरतो. नाटक हे वाङ्मय तर चित्रपट ही चित्रे, हा विचार अनेक नाट्यविमर्शकांनी मांडलेला आहे.

" The stage presents people, the screen pictures "[१] या विचारात वरील अर्थच अनुस्यूत आहे. नाटक वाचण्यासाठी नसून प्रयोगासाठी असते, पण असे असून नाटक हे वाङ्मय आहे या अर्थाने चित्रपट वाङ्मय ठरू शकत नाही, असा विचार अॅलन रिनॉल्डस् थॉमसन व्यक्त करतो.[२] नाटकात पात्रांना सतत बोलावे लागते. तेथे खऱ्या अर्थाने अभिनय महत्त्वाचा ठरतो. उलट चित्रपटात कमीत कमी शब्द चालू शकतात.

" There is in general a stage play demands constant talk, a film requires an absolute minimum of words. The essential basis of the cinema lies primarily in the realm of visual images."[३] असे निकॉल म्हणतो. चित्रपटात संवादांना महत्त्व नसते असे अॅलन रिनॉल्डस् थॉमसन खालीलप्रमाणे सांगतो.

" I conclude that the dialogue in a Movie is not really essential. In other words the screen silent film – a medium of visual images. "[४] नाटक व सिनेमा या दोन्ही माध्यमांतील अत्यंत महत्त्वाचा फरक हा त्यांच्या परिमाणाचा फरक आहे, असे सांगणारे के० ना० काळे चित्रपटांच्या मर्यादेचा व रंगभूमीच्या सामर्थ्याचा मागोवा घेताना मूलगामी विश्लेषण करतात.[५] चित्रपटांची निर्मिती ही प्राय: प्रेक्षकांच्या वरवरच्या रंजनासाठी असते. शब्दांत अपार सामर्थ्य असते उलट चित्रे क्षणभंगूर असतात, हा विचार देखील आता चांगला प्रस्थापित झालेला आहे. याचाच अर्थ नाटक हे वाङ्मय असते तर चित्रपट ही चित्रे असतात असे ठामपणे सांगता येते.

अत्र्यांचे 'साष्टांग नमस्कार' हे प्रायोगिक रंगभूमीवर आलेले पहिले नाटक ज्या काळात रंगभूमीवर आले तो काळ मराठी रंगभूमीच्या इतिहासातील एक काळाकुट्ट कालखंड होता, असे समजता येते. या काळात मराठी रंगभूमीच्या अपकर्षाची कारणमीमांसा फार मोठ्या प्रमाणात झालेली आहे, त्यावरून केवळ बोलपट हेच रंगभूमीच्या ऱ्हासाला जबाबदार होते असे समजता येत नाही.

" बोलपटांचे अनुकरण करून रंगभूमी टिकणार नाही, तर आपले वैशिष्ट्य कायम ठेऊनच टिकेल,"[६] असे पु० गो० काणेकर म्हणतात तेदेखील समजून घ्यावे लागते. मराठी नाटकांना आलेली संगीताची सूज, हेदेखील मराठी नाटकांच्या व रंगभूमीच्या अवनतीचे एक महत्त्वाचे कारण आहे याचा उल्लेख अनेक समीक्षकांनी केलेला आहे. तत्कालीन अनेक लेखांमध्ये मोठ्या जोरदारपणे या गोष्टींवर

अनुक्रमणिका

उलट सुलट मते मांडली जात होती; नाटचोत्कर्षाच्या ऐनवेळी बालगंधर्वांच्या तानांमुळे नाटक कुठेच दिसत नव्हते,[७] अशा आशयाचा माधव मनोहर यांनी काढलेला सूर म्हणूनच खूप बोलका वाटतो. चित्रपटकला व नाटचकला यांचा परस्परसंबंध लक्षात न घेता आमच्या नाटचकलेचे बहुतेक नेते गलितगात्र झालेले होते,[८] हा वसंत शांताराम देसाई यांचा अभिप्राय महत्त्वाचा मानला तर मूलत: चित्रपट व रंगभूमी ही दोन्ही माध्यमे पूर्ण भिन्न व स्वायत्त आहेत हे लक्षात घेणे या संदर्भात महत्त्वाचे ठरते.

"सिनेमाशी साम्य प्रस्थापित करून नाटक सिनेमाला कधी जिंकू शकणार नाही. सिनेमा (बोलपट) जे देऊ शकत नाही ते नाटकामध्ये रसिकाला मिळाले असे होईल, तरच नाटचाकडे लोक वळतील."[९] असे प्रसिद्ध नाटचसमीक्षक श्री० ना० बनहट्टी म्हणतातच.

त्या काळाचा विचार साकल्याने केला तर नवीन व आकर्षक प्रकार म्हणून लोक सिनेमाकडे वळले. महायुद्धाच्या छायेखाली वावरणाऱ्या भयग्रस्त पण तरीही स्वप्नाळू समाजाला जे हवे होते ते चित्रपट सहज देऊ लागले; त्यामुळे चित्रपटांची चलती झाली व परिणामत: नाटचगृहे ओस पडू लागली. वाङ्मयीन कस नसणारे चित्रपट आधुक-माधुक वातावरणातून, हातात पैसा खुळखुळणाऱ्या प्रेक्षकांना फिरवून आणू लागले. थोडचा वेगळचा अर्थाने बोलपट म्हणजे एक अभिनव यात्रा-कंपनी होती. पलायनवादी विचारसरणीच्या लोकांना ही यात्रा-कंपनी अनेक प्रलोभने दाखवीत होती. अर्थातच या 'वरलीया रंगाला' लोक भुलले. चित्रपट आणि रंगभूमी एका वेगळचा वळणावर थबकली. रंगभूमीच्या साऱ्या आघाडचा थंडगार झाल्या. दृश्यांवर आधारलेले, गतिमान भासणारे व उडत्या चालीच्या संगीताला जवळ करणारे चित्रपट लोकांच्या तात्कालिक गरजा पूर्णपणे भागवू लागले. या पार्श्वभूमीवर 'साष्टांग नमस्कार' नाटकाला यश मिळाले, हे समजून घ्यावे लागते. पण असे असले तरीही पुढे चित्रपटसापेक्ष तंत्राचा वापर करून रंगभूमीवर नव्या पवित्र्यात अवतीर्ण झालेली नाटकेदेखील निष्प्रभ ठरली व हे तंत्रदेखील रंगभूमीची अवकळा कायम स्वरूपात थांबवू शकले नाही. याचाच अर्थ रंगभूमी व चित्रपट हे आपापल्या स्थानांवर टिकून राहाणारे कलाप्रकार आहेत असा होतो.

चित्रपटसृष्टीतील अनुभव ही नाटककार अत्र्यांची जमेची बाजू होती. कोणत्याही क्षेत्रात फार काळ टिकून न राहणारे अत्रे फुलांतून उठून एकदम मुलांत आले. पण-मुलांना बांधून टाकणाऱ्या या दगडी भिंतीदेखील त्यांना काच देणाऱ्या वाटू लागल्या. त्यांची प्रतिभा या भिंतींच्या सीमित चौकटीत मावणारी नव्हतीच. त्यामुळे एकदम ते रंगभूमीवर आले. बोलपटांच्या आक्रमणामुळे ढासळू पाहणारी रंगभूमी सावरण्याचा प्रयत्न करणारे अत्रे या क्षेत्रातदेखील फार काळ रमले नाहीत. चित्रपटांच्या आकर्षणाला ते बळी पडले, हा इतिहास आहे. अत्यंत संस्कारक्षम बीजे असणारी अत्र्यांची पहिली काव्यात्मक कथादेखील पुढे नको इतकी बदलली. सुरवातीचे कवी, शिक्षक, नाटककार, कथाकार अत्रे पुढे चित्रपटनिर्माते झाले, 'अर्धांगी,' 'घरजावई,' 'तस्वीर,' 'दिलकी बात,' 'दौलत,' 'धर्मवीर,' 'नवरदेव,' 'वसंतसेना,' 'पायाची दासी,' 'लपंडाव,' प्रेमवीर, 'वाईलवेडा,' 'राजाराणी,' 'बेगुनाह,' 'ब्रँडीची बाटली,' 'ब्रह्मचारी,' 'महात्मा फुले,' 'मोरूची मावशी,' 'शामची आई' असे अनेक चित्रपट अत्र्यांच्या नावावर जमा आहेत. चित्रपटसृष्टी ही मयासुराची सृष्टी आहे, असे अत्रे सांगतात. त्यांच्या जीवनाच्या आलेखात अनेक चढउतारांची गर्दी स्पष्टपणे जाणवते. 'मी चित्रपटकार कसा झालो?' या त्यांच्या 'मी कसा झालो?' मधील प्रकरणात त्यांना आलेले विविध चमत्कारिक अनुभव अत्र्यांनी सांगून ठेवलेले आहेतच. पुण्याच्या म्युनिसिपालिटीत आल्यापासून चित्रपटसृष्टीत प्रवेश करण्याचा विचार अत्र्यांच्या मनात तयार झालेला होता, व त्यातूनच 'नवयुग' चित्रपट कंपनी स्थापन झाली. चित्रपटसृष्टीत नेहमीच घडणाऱ्या व मनस्ताप देणाऱ्या गोष्टी वाटचाला आल्याने त्या कंपनीतून अत्र्यांना बाहेर पडावे लागले. पुढे अत्र्यांनी स्वत:चे 'चित्रमंदिर' काढले. याच अत्रे पिक्चर्सने 'पायाची दासी' हा प्रसिद्ध बोलपट काढला. हा बोलपट खूपच गाजला. पण ज्या 'वसंतसेना' या चित्रपटाच्या नुसत्या जाहिरातीसाठी अत्र्यांनी पाऊणलाख रुपये खर्च केले, तो चित्रपट मात्र साफ पडला व अत्र्यांचा अगदी चारुदत्त झाला. 'धर्मवीर,' 'ब्रँडीची बाटली,' 'ब्रह्मचारी,' 'महात्मा फुले,' 'शामची आई' ही त्यांची चित्रे मात्र धमाल चालली. चित्रपटांच्या चढउतारामुळे अत्र्यांचे उभे जीवन ढवळून

निघाले, पण या मांडवाखालून गेलेल्या अत्र्यांच्या अनुभवाचा फायदा रंगभूमीला त्याचप्रमाणे रुपेरी पडद्याला झाला. नाटककार अत्रे व चित्रपट–कथाकार अत्रे या दोन्ही व्यक्ती एकच आहेत; त्यामुळे दोन्ही ठिकाणचा अनुभव अत्र्यांना प्रयोगरूपाने करून घेता आला हे सत्य आहे.

अत्र्यांच्या चित्रपटांमागे त्यांच्या नाटकांप्रमाणेच सामाजिक जाणीव आहे. अत्रे त्या काळाचे साक्षीदार असल्याने त्या काळाच्या अनेक खाणाखुणा कळत नकळत त्यांच्या चित्रपटांच्या अंगाखांद्यावर दिसत होत्या. अत्रे त्या काळात जाणीवपूर्वक चित्रपट व रंगभूमी यांचा दुरावलेला संबंध जोडत होते किंवा चित्रपटाचे आक्रमण थोपवीत होते असे विधान ठामपणे करता येत नसले तरी अत्र्यांच्या मनात कुठेतरी हा भाग असावा असे अस्पष्ट स्वरूपात जाणवते. सिनेमासृष्टीच्या सवंग वातावरणातील पोषाखी व तकलादू जगाचे चित्रण मर्यादित अर्थाने अत्रे 'साष्टांग नमस्कार,' 'पराचा कावळा' इत्यादी आपल्या नाटकांत करतात. कलात्मक परंपरा, प्रयोगशीलता व सामाजिक जाणीव त्यावेळच्या 'प्रभात,' 'नवयुग,' 'हंस,' 'प्रफुल्ल' या कंपन्यांनी कायम ठेवण्याचा प्रयत्न केला, असे सांगून अत्र्यांच्या 'ब्रह्मचारी,' 'धर्मवीर' वगैरे चित्रपटांची के० वा० भोळे स्तुती करतात.[१०] अत्र्यांचे चित्रपट ही त्यांची प्रगत व परिणत झालेली जीवनदृष्टीच होती. या काळातील सांकेतिक व निर्जीव होत चाललेल्या रुपेरी पडद्याला अत्र्यांनी खदखदून हसविले, असे वि० स० खांडेकर म्हणतात.[११]

'धर्मवीर', अर्धांगी', 'पायाची दासी' हे चित्रपट म्हणजे सामाजिक जाणीव अगोदरच लोकांपर्यंत संक्रान्त केलेले 'घराबाहेर', 'उद्यांचा संसार' व 'जग काय म्हणेल ?' ही नाटकेच आहेत. अल्पकाळ लोकांचे रंजन करून गल्ला वाढविणाऱ्या चित्रपटांकडे अत्र्यांनी लक्ष दिले नाही. भारतीय संस्कृतीचा देदीप्यमान स्रोत लोकांपर्यंत पोहचविणारी अत्र्यांची 'वसंतसेना' ही वाङमयीन अंगांनी बहरलेल्या चित्रपटांचा मानदंड मानता यावी इतक्या तोलामोलाची असताना देखील ती रंगभूमी गाजवू शकली नाही ही गोष्ट बाजूस ठेवली तरी नाटककार अत्रे या श्रेष्ठ व्यक्तीचे महत्त्व त्यामुळे कमी होत नाही. ज्या गुणांमुळे अत्र्यांची नाटके रंगभूमीवर धमाल चालली त्याच गुणांच्या बळावर त्यांचे काही चित्रपट गाजले.

'अत्रे म्हणजे कोणीतरी जाम हसविनारा मानूस' हे मत अत्र्यांचे खेड्यापाड्यातील व्याख्यानांचे दौरे सुरू होण्यापूर्वी त्यांच्या चित्रपटांनी अगोदरच करून दिलेले होते, असे पु० ल० देशपांडे सांगतात.[१२] ते देखील या संदर्भात जोडून घ्यावे लागते.

नाटकांकडून चित्रपटांकडे ओढले गेलेले अत्रे हा त्या काळाचा अत्र्यांवर झालेला एक परिणाम म्हणून नोंदवावा लागेल. १९३० पर्यंत चित्रपट मूक होते, त्यानंतर ते बोलपट झाले. या काळाचे दर्शन अत्रे आपल्या आत्मचरित्रात स्पष्ट घडवून देतात. अण्णासाहेब किर्लोस्करांपासून ते नाट्याचार्य खाडिलकरांपर्यंत बहरत गेलेल्या मराठी रंगभूमीला विपन्नावस्था प्राप्त झाली याची कारणे रंगभूमी व नाट्यवाङमय यांच्या अंतरंगात दडून बसलेली होती, हे जरी खरे असले तरी कोणत्याही बाह्य गोष्टींचा आनुषंगिक व तात्कालिक परिणाम होतोच. रंगभूमीला एकापेक्षा एक सरस नाटके अत्र्यांनी दिलेली होती, पण असे असूनही लोकांचे चित्रपटांचे आकर्षण कमी झालेले नव्हते. कसलीही चित्रे अफाट गाजत होती. निर्मात्यांची उखळे पांढरी होत होती. या काळात अत्र्यांनी रंगभूमी सोडून चित्रपटांकडे जायला नको होते अशी मते नोंदविली गेलेली दिसतात, ती अगदी योग्य असली तरी अत्र्यांच्या स्वभावाची ती अटळ बाजू होती असेच मानावे लागते. १९३७ सालापासून अत्रे चित्रपटाकडे वळले. चित्रपटांच्या आकर्षणामुळे मधल्या काळात रंगभूमीवरील साऱ्या आघाड्या पुन्हा हळू हळू थंडगार पडू लागल्या. व्ही. शांताराम, फत्तेलाल, बाबूराव पेंढारकर, दामले, विनायक इत्यादी कलावंतांनी चित्रपटसृष्टीत प्राण ओतून जी कामगिरी केली होती, त्यामुळेदेखील असेल पण चित्रपटांकडे धावणारा लोकांचा लोंढा आता थोपविता येत नव्हता.

चित्रपटांच्या हलक्या फुलक्या कथा, चित्रपटनटांभोवती पसरलेले प्रसिद्धीचे वलय आणि स्वप्नांच्या, भोवऱ्यात सतत गिरक्या घेणाऱ्या लोकांना त्यांच्याद्वारे स्वप्नपूर्तीचा मिळणारा आनंद इत्यादी अनेक कारणांमुळे मागे सांगितल्याप्रमाणे तो काळ खऱ्या अर्थाने चित्रपटांचा काळ होता. मो०ग०रांगणेकरांचे 'कुलवधू' हे नाटक 'वहिनी' या त्यांच्या नाटकापेक्षा तुलनेने डावे असूनदेखील रंगभूमीवर गाजले याचे कारण नटांच्या भोवती त्या काळात 'वलय' निर्माण

झाले होते. शिवाय लोकांचा त्यांच्याकडे पाहण्याचा एक विकृत दृष्टिकोण होता, असे पु० गो० काणेकर साधार स्पष्ट करतात.[13] याचाच अर्थ हा काळ खऱ्या अर्थाने खोटया चित्रांचा होता.

नाटक हे वाङमय असते, चित्रपटांकडे पाहताना वाङमय म्हणून रसिक पाहत नाहीत व तो त्यांचा मूळ गुणही नाही. नाविन्याची ओढ व आवड असणाऱ्या कलावंत अत्र्यांच्या मनात चित्रपटांवरुन नाटके करण्याची कल्पना यावी यात आश्चर्य नाही. आपल्या अनेक सरस व सकस चित्रपटांची नाटके करण्याची इच्छा त्यांच्या मनात कशी आली ते 'ब्रह्मचारी,' व 'मोरूची मावशी' या नाटकांच्या प्रस्तावनेत ते सांगतात. पण अगदी अपवादात्मक उदाहरणे वगळता अत्र्यांना या कलांतरात फारसे यश प्राप्त झाले नाही हेच खरे.

"मूळ कलाकृतीचा गाभा आणि नव्या साधनांची समज यावर पूर्ण हुकमत असल्याशिवाय प्रभावी कलांतर साधत नाही, बऱ्याच वेळा हे जे कलांतराचे प्रयोग फसतात ते या हुकमतीच्या अभावामुळे"[14] असे पु० शि० रेगे म्हणतात. नाटक व चित्रपट यांच्यामध्ये केवळ चेहरेपट्टीचा व वरवरचा फरक नसून, तो यापेक्षा अधिक खोल व मूलतः भिन्न प्रकृतीचा आहे, याचे विवेचन मागे केलेलेच आहे. साहजिकच कलांतर होताना काही महत्त्वाच्या गोष्टी राहून जातात व त्या कलाकृतीला योग्य तो न्याय मिळू शकत नाही. कलावंत आपल्या प्रकृतीला अनुसरून मूळ 'भाष्या' ची निवड करणार; त्याला हवे ते तो घेणार व नको ते टाकून देणार. या प्रक्रियेत हवा तो भाग नेमका काही वेळा टाकला जातो व नको तो भाग स्वीकारला जातो. परिणामतः कलाकृतीचे यश सीमित राहते, किंवा बऱ्याच वेळा अपयश तिच्या वाटयाला येते. कोणत्याही आकृतिबंधाची यशस्विता सापेक्ष असते पण त्याच्या यशापयशाचे कारण मात्र शेवटी कलांतराच्या प्रक्रियेतच असावे. त्यामुळे कलांतराचा प्रयोग म्हणजे तारेवरची कसरतच असते.

यशस्वी नाटकांच्या कथानकावर आधारलेले चित्रपट काढणे ही कल्पना अत्र्यांच्या मनात येणे अगदी स्वाभाविक वाटते. वेगवेगळे प्रयोग करण्याचे वेड अत्र्यांच्या प्रतिभेला आहे, त्याचाच हा अपरिहार्य परिणाम. अत्र्यांच्या नाटयगुणांच्या लक्षणीयतेमुळे त्यांची चित्रे चित्रपटसृष्टीत अविस्मरणीय ठरली हे मान्य केले तर असा परिणाम त्यांच्या नाटकाच्या कथेवर आधारलेल्या 'ब्रह्मघोटाळा' या चित्रपटावर मात्र झालेला नाही. 'लग्नाची बेडी' हे अत्र्यांचे अत्यंत यशस्वी नाटक. हे नाटक रजतपटावरदेखील बदललेल्या स्वरूपात खूप खळबळ उडवून देईल ही अत्र्यांची अपेक्षा फोल ठरली. विजय तेंडुलकरांचे 'शांतता: कोर्ट चालू आहे' हे जीवनानुभव साकार करणारे एक अर्थगर्भ नाटक मराठी रंगभूमीवर खूप चालले पण या नाटकाचा बोलपट मात्र अगदी साफ पडला, हे सत्य देखील या संदर्भात जोडून घ्यावे लागते. अत्र्यांच्या 'तो मी नव्हेच!' या गाजलेल्या नाटकावरुन तयार करण्यात आलेला 'वो मैं नही!' हा हिंदी बोलपट फारसा गाजला नाही. प्रत्यक्ष अत्र्यांनी जरी त्या नाटकाचे रूपांतर केले असते तरी चित्रपटाचे अपयश नक्की होते, असे म्हणता येते. रंगभूमीवर गाजणाऱ्या विषयांना व पर्यायाने त्या विषयांना पडद्यावर न्याय मिळत नाही याचे कारण मागे सांगितल्याप्रमाणे दोन्ही कलांची 'मूळप्रकृती'च वेगळी आहे. एका दृष्टीने हे कलमच म्हणावे लागेल. झाडांवर कलमे करणारा माळी जाणकार असेल तर केलेली कलमे रुजतात व वहरतात. अत्रे हे जाणकार होते, धन्वंतरी होते पण असे असूनही त्यांनी केलेली ही कलमे रुजली नाहीत. मानवी शरीराच्या अवयवांवर अगदी तज्ज्ञ डॉक्टरांकडून केलेली कलमे (Transplantation) देखील खूपदा अयशस्वी होतात. शरीरांतर्गत गेलेली बाहेरची वस्तू (Foreign Body) शरीराच्या बाहेर टाकण्यासाठी शरीरांतर्गत यंत्रणा सदैव धडपड करीत असते. आपल्या चांगल्या कृती लोकांपर्यंत जाव्यात असे कलावंताला वाटले तरी या प्रक्रियेतून जाणारी ती कलाकृती ताऊन सुलाखून बाहेर पडणे खूप त्रासाचे व अवघड असते. 'ब्रह्मघोटाळा' हा चित्रपट का पडावा, हे अत्र्यांना समजत नाही. पण असे हे अपयश हे कलावंताच्या प्रयत्नांतील केवळ अपुरेपणा किंवा त्याचे नशीब यांच्यापुरतेच मर्यादित नाही, तर तो कलांतराच्या अंतरंगातील गुंतागुंतीचा परिणाम आहे.

'साष्टांग नमस्कार', 'मी उभा आहे', 'तो मी नव्हेच!', 'डॉ. लागू', 'प्रीतिसंगम', 'अशी बायको हवी' इत्यादी नाटकांत अत्र्यांनी चित्रपटसापेक्ष तंत्राचा प्रत्यक्ष वापर केलेला आहे. संवादांना दृश्याचे

स्थान प्राप्त करून देणे (साष्टांग नमस्कार), लोकसमुदायाचा, त्यांच्या घोषणांचा आभास निर्माण करून देणे (मी उभा आहे'), फिरता रंगमंच रंगभूमीवर वापरणे (तो मी नव्हेच, डॉ. लागू, प्रीतिसंगम, अशी बायको हवी!), प्रत्यक्ष रंगभूमीवर आगगाडी दिसणे (अशी बायको हवी), समूहगीतांचा (chorus) आकर्षक पद्धतीने उपयोग करून घेणे इ. चित्रपटसापेक्ष तंत्राचा अवलंब अत्रे आपल्या नाटकांतून करतात. विजय तेंडुलकर, गिरीश कर्नाड, आणि त्यानंतरच्या कित्येकांच्या नाटकांवर चित्रपटांचा झालेला परिणाम दिसून येतो. वेधकता, गतिशीलता व दृश्यात्मकता हे चित्रपटांचे आकर्षक पैलू नाटके 'चालण्यासाठी' रंगभूमीवर या ना त्या स्वरूपात येऊन हल्ली नाटकांचे चित्रपट होऊ लागलेले दिसतात. नाटकांचे चित्रपट होणे; ही गोष्ट चांगली की वाईट या गोष्टीचा ऊहापोह या ठिकाणी करावयाचा नाही. सांगावयाचे आहे ते इतकेच की आज जी पूर्णपणे गजबजलेली व बदललेली रंगभूमी दिसते तिच्या बदलाची सुरुवात अत्र्यांच्या नाटकांतून झालेली आहे; तसा त्यांनी धाडशी प्रयत्न आणि प्रयोग केला. विशेषत: शेवटी शेवटी वास्तवकथाधिष्ठित नाटके (तो मी नव्हेच?, डॉ. लागू, प्रीतिसंगम) वेगळ्या स्वरूपात रंगभूमीवर त्यांनी उभी केली. रुपेरी पडद्यामागचा प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या अत्र्यांनी आपल्या अखेरच्या काळातदेखील त्याच जुन्या तंत्राचा अवलंब करून रंगभूमीवर चैतन्य निर्माण करण्याचा मार्ग मोकळा करून दिला हे मात्र नाकारता येत नाही.

संदर्भ

१. Alan Renolds Thompson, The Anatomy of Drama, 1946, (P. 16).

२. तत्रैव.

३. Film and Theatre, 1936, (P. 129).

४. The Anatomy of Drama, 1946, (P. 29).

५. नाट्यविमर्श, १९६१, (पृ. ८८–८९).

६. माझ्या काही नाट्यस्मृती, १९४४, (पृ. ११५).

७. नाटक, वर्ष चवथे, अंक दहावा, ऑगष्ट १९५९, 'मराठी नाटक थिटे का?', (पृ. १३).

८. मखमालीचा पडदा, १९४७, (पृ. २३८).

९. मराठी नाट्यकला आणि नाट्यवाङ्मय, १९५९, (पृ. १७५–७६).

१०. अंतरा, १९६७, (पृ. १८६).

११. नवयुग, आचार्य अत्रे स्मृती विशेषांक, 'साहित्यातील सेनापती', (पृ. १३८).

१२. आचार्य अत्रे विविधदर्शन, १९५८, सम्पादक कृ० पां० कुळकर्णी व इतर, 'अत्रे : ते हशे त्या टाळ्या', (पृ. ७०).

१३. माझ्या काही नाट्यस्मृती, १९४४, (पृ. १०६).

१४. छांदसी, १९६८, (पृ. १६८).

लेखकांना विनंती

साहित्य कागदाच्या एका बाजूला, सुवाच्य अक्षरांत, पुरेसा समास सोडून लिहावे. ते मराठी साहित्य महामंडळाच्या शुद्धलेखनाच्या नियमांनुसार असावे. सोबत पुरेसे टपालहशील व स्वत:चा पत्ता लिहिलेला लिफाफा असेल तरच नापसंत साहित्य परत पाठविले जाईल. त्याविषयी कोणताही निराळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. कवींनी टपालहशील पाठवू नये. नापसंत कविता निकालात काढल्या जातील.

॥ प्रसिद्ध झाली ॥

यातनाघर
एकांकिकासंग्रह : **महेश एलकुंचवार**
किमत साडेअकरा रुपये

□

मानसी
कवितासंग्रह
वसंत बापट
किमत पाच रुपये

□

'गर्भालय' आणि 'लंघनमूर्ती'
दोन लघुकादंबऱ्या : **रत्नाकर पटवर्धन**
किमत सतरा रुपये

॥ आगामी प्रकाशने ॥

मातृका
कादंबरी
पुरुषोत्तम शिवराम रेगे

□

सलाम
कवितासंग्रह
मंगेश पाडगावकर

□

सौंदर्यानुभव
समीक्षा
प्रभाकर पाध्ये
[एस्थेटिक्स सोसायटी / मौज प्रकाशन]

॥ छापत आहेत ॥

जहाज
कथासंग्रह
बाळकृष्ण वि० प्रभुदेसाई

□

कांटची सौंदर्यमीमांसा
समीक्षा
रा० भा० पाटणकर

□

ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र
समीक्षा : नवी आवृत्ती
गो० वि० करंदीकर

□

रापण
आत्मवृत्त
प्रल्हाद अनंत धोंड

□

डॉ. पटवर्धन
ऊर्फ माधव जूलियन
चरित्र
द० न० गोखले

॥ मौज प्रकाशन गृह ॥ **खटाववाडी, मुंबई ४०० ००४**

अनुक्रमणिका

पाच कविता

अनिल दिगंबर कुळकर्णी

कुणीतरी,
उशालगतचे दिवे
अचानक मालवून टाकले.
आणि स्वप्नांना भोवळ आली
स्तनांचे विवस्त्र आकार पाहून.
आयुष्याचा प्रतिकात्मक अर्थ सांगणाऱ्या
झाडांच्या निष्पर्ण फांद्या
मग अधिकच घनघोर नग्न होत गेल्या.
दिशांचे सर्व भास–आभास नाकारून
मी, स्वत: सावल्यांप्रमाणे दूरवर भिनत गेलोय
डोंगर पहाडात. . .
तेव्हा
सूर्याच्या विझत्या डोळ्यातून
हजारो पारव्यांची एकच रांग उडताना दिसली,
सृष्टीच्या आदिम रहस्यासारखी.

सोललेल्या कातडीवर
पसरत जाणारी हळव्या स्पंदनांची थरथर
माझ्या सनातन संवेदनांना
पाझर फुटण्याआधीच संपून जावी.
श्वासनालयात दाटून आलेला
गच्च काळोख, अस्पष्ट हालचाल आणि दीर्घ हुंकार
ही तुझ्या अस्तित्वाची खूण समजायला
माझी हरकत नाही.
पण,
प्रवासातील सर्व धोके टाळूनही
अंतिम मुक्कामाला आपण पोहचू
अशी खात्री कुणाला देता येणार नाही.
ह्यापेक्षा;
पापण्यांचे पडदे उघडण्या आधीचे
डोळ्यांशी येऊन थबकलेले ढगांचे तुकडे
अलगद्पणे दूर करावेत. . .
म्हणजे आकाशाच्या खूप जवळ पोचल्याचा
अनुभव मात्र आपणाला घेता येतो.

संपन्न अस्तित्वाचे किनारे
नदीच्या पाण्यात ढासळताना
मी असाच अनिर्बंधपणे वाहात जाईन
उत्तरार्धातील रात्रीच्या मऊशार आठवणी
मृत्यूच्या अटळ हाकांनी गोठून जातील.
माझ्या मरणपूर्व यातनांची चाहूल लागलेला सूर्यास्त
तुझ्या भयाकुल, भावगर्भ डोळ्यांत मावळताना
माझे निग्रही स्पर्श नाकारणारे
तुझे हिमशुभ्र उरोज
रात्रीच्या सघन काळोखात बुडून जातील.

तुझ्या डोळ्यांप्रमाणे लुकलुकणाऱ्या दिव्यांच्या रांगाही
आता मालवून टाकाव्यात
आणि उभा अंधार कवटाळून
मी स्वत:लाच आतल्या आत सोलत जावे
तुझ्या अस्तित्वाचे संकेत
कुठे सापडतील कां ? म्हणून पाहण्यासाठी
किमान, तुला आवडणाऱ्या निष्पर्ण डहाळ्यांचे
विवस्त्र, नाहीतर, मानवाच्या चिरंतन
वासनांचा इतिहास सांगणारे
एखाद्या अनावृत्त आर्येचे प्राचीन शिल्प
पण,
शेवटी फक्त हाडामांसाच्या रक्तावर
तरंगताना दिसली
एक व्याकुळ कविता
तुझ्या उदास दु:खासाठी
माझ्या ओंजळीतून गळणारी. . . .

माझ्या विराट दु:खाची ओळख सांगणारा
हा रात्रीचा प्रदीर्घ काळोख;
जर मला न विचारताच
तुझ्या दाराशी आला तर
सरळ त्याला समोरच्या उघड्या माळावर जाण्यास सांग
मी काहीच म्हणणार नाही
कारण
सत्य नाकारून, स्वप्न पाहण्याची तुझी सवय
मला माहीत आहे.
पण,
माझ्या उजाड आयुष्याचा वसा घेऊन भटकणाऱ्या
भ्रमिष्ट पक्ष्यांचा थवा,
जर चुकून तुझ्या झाडावर येऊन बसला
तर, त्याला मात्र वाळवंटाची दिशा दाखवू नकोस
त्याला तहान लागली आहे
निळ्या पाण्याची.

मी जरा उंचावता

राजीव प्रभाकर पांडे

मी जरासे चालताना पाहतो मागेपुढे :
मीपणा माझ्यातला का धावतो माझ्यापुढे

मैफली मी जिंकल्या मी जिंकल्या साऱ्या सभा;
आज आता वाटते, मी बोलतो का एवढे !

दोष माझ्या मीपणाला आज ते देतात का;
मी जरा उंचावता ते वाकले माझ्यापुढे !

गप्प का सारे; अरे, हे शब्द घ्या माझे तुम्ही;
पाहतो मी कोण आता बोलतो माझ्यापुढे.

चाल

बबन सराडकर

नभासाठी जरी
वेडावली लाट
व्हावयाची होती
वादळाची भेट

विरलेला सूर
हरलेला ताल
द्यावयाची कशी
कवितेला चाल ?

आधार

मोहन सावंत

शब्दांच्या अडगळीतही
मरणाला कडी घालीन
इस्पितळाच्या कोपऱ्यावर एक एक पायरी ओलांडीत
तो म्हणाली.
त्याला जेवू घालता घालता
तिला आठवली तिच्या मायची कथा
सरपटल्याची आंब्याखालून
मातीला ओढ लागल्याची
..आणि रानामागून रान उठल्याची.
उंच उंच मजल्यावर
तो शांत ढळलेला
आढयावर सूर्य लोंबकळावा ना तसा.
तिचा शब्द न् शब्द लोंबकळलेला काळोखात
इस्पितळाच्या खोलीत
तो पुन्हा पुन्हा सारे मजले चढली
...आणि मधले कुठले उतरली आधारानं.

भेदून जायचे आहे

सगुणा पुजारी

मातीचा गौरव
भूमीची स्तोत्रे
खूप झाली
आता माणसाविषयी
लिहिणे आहे.
जय-इतिहास-बखरी
एका वळणाची अक्षरे
दृष्टिपाठ होऊन गेलीत
इतिहासावर कधीतरी
नांगराची फाळ
नागमोडी वळण
कोरणार आहे.
ऋतुचक्रात सापडलेल्या
सूर्याचे तापमान
नोंदलेच जाते दररोज
भुकेच्या आगीचे मला
कमाल तापमान
नोंदून जायचे आहे...
भेदून जायचे आहे ! !

बिन चेहऱ्याची एक आत्मग्लान मुलगी

आनंद विंगकर

बिन चेहऱ्याची अधोमुखी एक आत्मग्लान मुलगी
पुळणीकाठी माडाच्या बनात रात्री-अपरात्री फिरत
असते.
पलीकडच्या गावात तिच्या दंतकथेची पारायणं
शिळोप्याच्या दुपारी हुक्का पीत वा रात्री उशीरा
देवापुढे समईच्या वाती वळत
-शापित आहे ती
-गाता आणि हसताच येत नाही तिला-अशी कितीतरी
त्यामुळे तिचे मूळचे रूप आठवत नाही कोणास
मोहवृक्षाची फुले वेचीत असता एकदा त्या
गंधाने तिला भोवळ आली. तेव्हापासून फिरत असते
गावातील एका विधवेच्या मुलाने
मेघव्याकुळ मोराबरोबर नाचताना तिला पाहिले होते.
आणि ऐकले होते तिचे
मोकळ्या सामुद्रिक सुरावटीतील एकांतगीत.
तेव्हा तो तिचा वेडा झाला
-तेव्हापासून फिरत असते रात्रीअपरात्री.
एका अज्ञात कोळ्याने विणले आहे जाळे
सभोवती तिच्या त्यापलीकडचे दिसत असले तिला
सर्व जरी
आणि ऐकताही.
तरी मनाची किवाडं बंद झालीयत
म्हणून की काय आता
तिच्या पावलागणिक उलगडत जाणारे चंद्र
भरतीच्या पाण्यात बुडून जातात
समुद्राच्या मेलडीने तिची सरळ भुवई
तसूभर देखील चळत नाही.
घायाळ पक्ष्याच्या चित्काराने तिची पावलं थांबत
नाहीत.
वाटेवर तिच्या किती-एक मोरांचे पिसारे गळून पडलेत
आणि मेघांनीही ढाळलेत अश्रू याचनेत तिच्या
तरीही मागे वळून पहात नाही.
क्वचितच कधीतरी ती एकटक पहाते.
दक्षिणेकडून तरंगत येणाऱ्या होड्यांची पांढरी शिड.

महाभारत युद्ध : साम्राज्यवाद विरुद्ध गणसंघर्ष

शिवकुमार नेवासकर

महाभारताचे महत्त्व केवळ धार्मिक ग्रंथ या दृष्टीने नसून तो ग्रंथ भारतीयांच्या प्राचीन इतिहासाचा आधारस्तंभ असल्यामुळे आहे. संस्कृत वाङमयात या ग्रंथाला 'इतिहास' या नावानेच ओळखण्याचा प्रघात आहे. त्यामुळे या ग्रंथाच्या परिशीलनाने आपल्याला प्राचीन भारताचे सामाजिक, आर्थिक व राजकीय चित्र स्पष्ट पहावयास मिळते. तसेच पूर्वीच्या लोकनेत्यांनी मांडलेले विचार व त्यावरून स्थापित झालेले सिद्धांत यांचे सोपपत्तिक ज्ञान होते. आणि महाभारत क्रांतिनंतरच्या काळात अस्तित्वात् आलेल्या जैन, बौद्ध इत्यादी वैदिकेतर व शैव, वैष्णव, शाक्त इत्यादी वैदिक संप्रदायांचे बीज रूपाने दर्शन घडते. अशा रीतीने मानव समाजाच्या उत्कर्ष व अपकर्षाची ऐतिहासिक समीक्षा करण्यासाठी महाभारताचा मोठाच उपयोग होतो यात संशय नाही.

या प्राचीन ऐतिहासिक ग्रंथाविषयी अलीकडे अनेक विद्वानांनी संशोधन चालविले आहे. त्या संशोधकातील पुरातत्त्वविद महाभारतास ऐतिहासिक ग्रंथ म्हणून मान्यता देण्यास तयार नाहीत. त्या त्यांच्या विधानांच्या पुष्टीसाठी त्यांनी दिलेली कारणे मुख्यत्वे खालीलप्रमाणे आहेत.

१) महाभारत समकालीन ब्राह्मण व उपनिषदात महाभारत युद्धाचा उल्लेख का नाही ?

२) सूत वाङमयात विसंगती फार त्यामुळे त्या वाङमयावर ऐतिहासिक दृष्टीने भरवसा ठेवता येत नाही.

३) महाभारतात वर्णन केल्याप्रमाणे तशी मोठी-मोठी राज्ये त्या काळात अस्तित्वात नव्हतीच.

४) आतापर्यंतच्या उत्खननात इ. पूर्व एक हजार वर्षांपूर्वीची जी शस्त्रास्त्रे सापडली ती सर्व अविकसित स्वरूपाची आढळून आली. महाभारत युद्धात वर्णिलेली शस्त्रास्त्रे विकसित स्वरूपाची वर्णिली आहेत त्यामुळे महाभारत युद्ध काल्पनिक असावे.

५) यदाकदाचित महाभारत युद्ध झाले असे मानून घेतले तरी ते मोठे युद्ध नसावे तो एक कौटुंबिक कलह असावा. सूतपरंपरेने त्या कलहास युद्धाचे काल्पनिक मोठे स्वरूप दिले.

वरील कारणे दर्शवून डॉ. सरकार प्रभृती कित्येक संशोधकांनी महाभारतातील राजकीय घटना काल्पनिक ठरविल्या तरी त्या त्यांच्या मताविरुद्ध डॉ. दत्त, डॉ. पुसाळकर प्रभृती अनेक इतिहासविदांनी महाभारतातील राजकीय घटना काल्पनिक नसून त्या सत्य घटनाच आहेत असे सप्रमाण सिद्ध केले आहे. अशा या विसंवादी चर्चेत आम्हाला पडावयाचे नाही. आमचे निश्चित मत आहे की पुराणवस्तुसंशोधनास भारतात अजूनही पर्याप्त अवसर आहे. ते संशोधन प्रगत अवस्थेत पोहोचण्यापूर्वी महाभारतासारख्या परंपरामान्य ऐतिहासिक ग्रंथास डावलून चालणार नाही. नाहीतर प्राचीन इतिहासाची भव्य इमारत ढासळून पडेल; ते योग्यही नाही. आमच्या बुद्धीला तो विचार पटत नाही अतएव आम्ही महाभारत ग्रंथास प्राचीन इतिहासाचे साधन मानूनच त्यांतील घटनांचा ऐतिहासिक दृष्टीने विचार करणार !

त्याबरोबरच 'सूत वाङमयात विसंगती फार' या संशोधकांच्या मताचीही दखल घेणार. महाभारताची रचना ज्या सर्वसामान्य जनतेसाठी झाली व ज्यांच्याकडून झाली त्या उभय परिस्थितीचा विचार करून सूतवाङमयाच्या नुसत्या वाच्यार्थापेक्षा त्यांच्या लक्ष्यार्थाकडेच विशेष देणार आहोत आणि मग त्या ऐतिहासिक घटनांची संगती साधण्याचा प्रयत्न करणार आहोत; इतके सांगून मुख्य प्रतिपादनाकडे वळू.

महाभारतासारखा प्रचंड ग्रंथ लिहिण्याचा श्रीमत् कृष्ण द्वैपायनांचा कोणता हेतू होता हे पाहणे अत्यावश्यक आहे. कारण ग्रंथकार कोणत्यातरी हेतूने प्रेरित होऊन ग्रंथरचना करीत असतो. ग्रंथकाराचा तो

ग्रंथलेखनाचा हेतू लक्षात घेतल्याशिवाय त्याच्या लेखनाचे मर्म ध्यानात येत नाही. तसेच उपक्रम कळला की उपसंहाराची भाषा समजण्यास सोपी वाटते. लेखकाचे तात्पर्य चटकन शोधता येते.

कोणत्याही ग्रंथाचे तात्पर्य शोधण्यासाठी मीमांसकांनी एक सुंदर नियम घालून दिला आहे तो असा–

उपक्रमोपसंहारावभ्यासोऽपूर्वताफलम् ।
अर्थवादोपपत्तीच लिङ्गं तात्पर्य निर्णये ।।

वरील नियमाप्रमाणे कोणत्याही ग्रंथाचे तात्पर्य शोधण्यासाठी ग्रंथकाराने ग्रंथाचा उपक्रम व उपसंहार कसा केला आहे, तसेच कोणता मुद्दा निरनिराळ्या शब्दात पुन:पुन्हा मांडून तो ठसविण्याचा प्रयत्न केला आहे. तद्वत तो मुद्दा ठसविण्यासाठी त्याने रंगविलेल्या अर्थवादरूप गोष्टी या सर्वांचा साकल्याने विचार अवश्य करावा लागतो आणि मग लेखनाचे तात्पर्य शोधून काढावयाचे असते. या नियमानुसार महाभारत ग्रंथाचे तात्पर्य शोधून काढण्यासाठी ग्रंथकाराचा या ग्रंथलेखनामागे कोणता हेतू होता ते शोधून पाहू. सूतपरंपरेतील एक श्रेष्ठ ग्रंथ श्रीमत् भागवत या ग्रंथात महाभारत ग्रंथ लिहिण्याचा कृष्ण द्वैपायनाचा कोणता हेतू होता तो खालील श्लोकात दर्शविला आहे–

स्त्रीशूद्रद्विजबंधूनां न त्रयी श्रुतिगोचरा ।
इति भारतमाख्यानं कृपया मुनिना कृतम् ।।

या श्लोकावरून वेदाधिकार नसलेल्या स्त्री, शूद्र, दलित यांचा उत्कर्ष व्हावा या कळकळीने कृष्ण द्वैपायनांनी महाभारत ग्रंथाची रचना केली असे कळून येते. प्राणिमात्रांच्या हितासाठी झटणाऱ्या महर्षी द्वैपायनांचा हा प्रयत्न खरोखरीच लोकोत्तर आहे. त्रैवर्णिकांना वेदाधिकार जन्मजात लाभल्यामुळे ते त्यांची ऐहिक व आमुष्मिक उन्नती ज्ञानाच्या बळावर साधू शकतात पण ज्यांना वैदिक ज्ञानमार्ग खुला नाही अशा आपल्या बांधवांनाही स्वोन्नती करून घेता यावी या काळजीने कृष्ण द्वैपायनांनी भारतदीप प्रज्वलित करून त्यांना मार्ग दाखविला. एकीकडे पैल वगैरे शिष्यांना तयार करून त्यांना वैदिक वाङ्मयाच्या संगोपनाची कामगिरी सोपिली तर दुसरीकडे इतिहास-गाथा–पुराण इत्यादी लौकिक वाङ्मयांची जोपासना व प्रसार करण्याची कामगिरी सूत परंपरेस सोपिली. त्यामुळे सूतपरंपरेस त्या लौकिक वाङ्मयाचे प्रणयन व प्रसार करण्याचे कार्य करीत द्विजेतर जनसमूहास वैदिक संस्कृती, वैदिक संस्कार, वैदिक विचार यांच्याशी सुसंबंध ठेवून लोकशिक्षणाचे कार्य करावयाचे होते. ही मोठी कामगिरी पार पाडण्यासाठी त्यांना त्या लोकवाङ्मयाची घडण लोकभोग्य राखणे आवश्यक होते. अर्थातच ज्या लोकसंघासाठी हा भारत ग्रंथ कृष्ण द्वैपायनांनी लिहिला त्या लोकसंघाची ग्रहण-शक्ती, त्यांचे संस्कार, त्यांची अभिरुची, त्यांचे मनोधर्म या सर्व गोष्टींचा विचार करूनच त्यांनी ग्रंथाची घडण घडली आहे. ग्रंथकाराचा हा मोठ्यात मोठा गुण तो हाच ! नाहीतर वैदिक धर्माची उदात्त तत्त्वे, उच्च संस्कारिता यांचा उपदेश देणे, तो उपदेश त्या असंस्कारी लोकसंघाच्या गळी उतरविणे हे अत्यंत बिकट कार्य सुकर झाले नसते. अशा रीतीने लोकपरिस्थितीचा विचार करून त्यांना झेपेल अशा पद्धतीने मनोरंजक व ऐतिहासिक गोष्टींच्या रूपात ती सनातन तत्त्वे गुंफून लोकशिक्षणाचे कार्य महर्षींनी केले आणि हे संस्कारितेचे धडे देता देता अखिल भारतीय प्रजेची एकात्मता व अस्मिता उजळून निघेल याचीही पूर्ण दक्षता घेतली. आदिकाळापासून द्वापरयुगाच्या अंतापर्यंतच्या काल-खंडाचे रम्य चित्र रेखाटून त्या चित्राच्या पार्श्वभूमीवर आर्य, द्रविड, गिरिजन इत्यादी सर्व भारतीय समाजाच्या एकत्वाला पोषक असे रंग भरून ही महाभारतरूपी रम्य कलाकृती महर्षींनी तयार केली असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही.

ग्रंथकाराचा ग्रंथलेखनाचा हेतू वाचकांसमोर मांडून त्यानंतर त्या ग्रंथाची लेखनपद्धती कशी आहे त्याचाही थोडा विचार करू. त्यासाठी चार हजार वर्षांपूर्वी आपल्या समाजाचे चित्र कसे असेल ते पाहू. चतुर्वेद व त्यांचे ब्राह्मण ग्रंथ, त्या ब्राह्मण ग्रंथांनी उप-देशिलेले क्रियाकलाप, उपनिषद् व दार्शनिक वाङ्मयांतील आध्यात्मिक संशोधन यांत ब्राह्मणवर्ग गढून गेलेला दिसून येतो. तीच स्थिती क्षत्रियांची ! वारंवार होणारी परकीय आक्रमणे व लहानमोठ्या राज्यांचे झगडे यांत गुंतलेले क्षत्रिय ! त्यामुळे सामान्य जनतेच्या उन्नयनाची कामगिरी बजाविली ती सूतपरंपरेनेच. ह्या सूतसंस्थेने अगोदर त्या सर्वसामान्य जनतेस रुचेल व पचेल असे वाङ्मय तयार केले. तसे वाङ्मय तयार करावयास हवेच होते. म्हणून आम्ही संस्कारी द्विजवर्गास पुन: पुन: उच्चरवाने सांगत आहोत की ह्या सूतवाङ्मयाची पार्श्व-भूमी लक्षात घ्या ! त्या ग्रंथाचा लेखनहेतू ध्यानात घ्या

आणि त्या ग्रंथाची प्रतिपादनपद्धती ओळखून त्याचा निष्कर्ष काढा! त्या ग्रंथाच्या केवळ शब्दार्थावर विसंबून राहिला तर ग्रंथवाचनाचा निर्दोष आनंद लाभणार नाही. अर्थसंगतीत अनंत अडचणी येतील कारण ज्यांच्यासाठी ही ग्रंथरचना केली त्यांच्या बौद्धिक पातळीलाच ग्रंथकार अग्रहक्क देणार. यामुळे ग्रंथकाराने जे सांगावयाचे ते कशा प्रकारे सांगितले ते थोडक्यात पाहू.

महाभारतात सर्पाचा इतिहास आला आहे. ते सर्प मानवाशी मानवी भाषेत संभाषण करीत असत. ती सर्पजात व नागलोक स्वतःची राज्ये स्थापून त्या राज्यांचा कारभार चालवीत. त्या सर्प व नागाशी मानवांचा बेटी-व्यवहार झाल्याची वर्णने महाभारतात वर्णिली आहेत. ती वर्णने वाचून त्यांत वर्णिलेल्या गोष्टी वाच्यार्थाने जशाच्या तशाच मानणे शक्य ठरतील का? नाग स्वेच्छेने मानव शरीर धारण करीत व मानवांशी व्यवहार करीत कारण ते देवांश होते असे आत्मसमाधान करून घेणे योग्य ठरेल काय?

पांडवांचे नागांशी हाडवैर होते कारण ते साम्राज्यवादी होते. ती एक ऐतिहासिक घटना 'सर्पसत्र' या नावाने वर्णन केली. नुसत्या वाच्यार्थाने या घटनेचे मर्म लक्षात येणार नाही व ऐतिहासिक दृष्टीने स्वच्छ ग्रंथपरीक्षणही साधणार नाही. म्हणूनच लोकभोग्य सूतवाङ्मयाचे परीक्षण करताना ग्रंथलेखकाच्या लक्ष्यार्थाकडेच मुख्य लक्ष द्यावयास हवे. लोकभोग्य अशा अलीकडील ग्रंथाचे एक उदाहरण देऊन हा मुद्दा पूर्ण करू. 'खंडोबा' हे महाराष्ट्रातील बहुजनसमाजाचे दैवत आहे त्या देवतेचे माहात्म्य वर्णन करणारा 'जेजुरी-माहात्म्य' नांवाचा ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिलेला आढळला. हा ग्रंथ अलीकडच्या काळातच लिहिला गेला असावा असे ग्रंथाच्या भाषेवरून व त्यातील वर्णनावरून स्पष्ट कळून येते. या ग्रंथात काही अस्सल मराठी शब्दांचे संस्कृतिकरण केले आहे; त्या शब्दाकडे वाचकांचे लक्ष आम्ही वेधू इच्छितो.

खंडोबास वाहिलेल्या मुला-मुलींस वाघे व मुरळी म्हणतात. या वाघे शब्दांचे संस्कृतिकरण 'व्याघ्र' असे जेजुरी माहात्म्यात केले आहे. अर्थातच जेथे जेथे 'वाघ्या म्हणाला' असा कथा प्रसंग येतो तेथे तेथे 'व्याघ्रउवाच' असे त्या शब्दाचे संस्कृत रूपान्तर येते. आता येथे विचार येतो की काही शतकांनंतर ही वाघ्या-मुरळीची प्रथा बंद पडली आणि त्यानंतर हा ग्रंथ भाविक व्यक्ती वाचू लागली किंवा असंस्कृत व्यक्तीस अर्थ करून सांगू लागली तर 'व्याघ्र-उवाच' याचा अर्थ 'वाघ म्हणाला' असाच करणार व सांगणार. सामान्य श्रोता यावरून पूर्वी वाघ मनुष्यासारखे बोलत असावेत असे मानू लागणार की नाही! अतएव नुसता वाच्यार्थ घेऊन लोकवाङ्मयाचा निष्कर्ष पाहू लागलो तर ती आत्मवंचना ठरेल व ग्रंथकारांवरही अन्याय केला, असेच म्हणावे लागेल. यासाठी वरील मुद्दे लक्षात घेऊन सूतवाङ्मयाचे परिशीलन केले तर उपस्थित होणाऱ्या शंकांचे निरसन आपोआप होत जाईल. ही गोष्ट पूर्ण लक्षात घेतल्यावर महाभारतग्रंथद्वारे ग्रंथकारास कोणाचा इतिहास सांगावयाचा आहे व तो इतिहास कोणत्या प्रकारे सांगितला आहे ते पाहू.

पूर्वीपासून आपली अशी दृढमान्यता आहे की कौरव व पांडव या भाऊबंदात राज्यलोभामुळे जे महायुद्ध झाले त्या युद्धाचा इतिहास म्हणजे महाभारत! कौरव पांडव या दोघांत युद्ध झाले ही गोष्ट आम्हाला मान्य पण कौरव व पांडव एका कुलातच उत्पन्न झाले हे आम्हाला अमान्य! तसेच भाऊबंदात राज्याच्या वाटणीसाठी झालेला झगडा हे महाभारत युद्धाचे स्वरूपही आम्हाला मान्य नाही.

महाभारताच्या अंतरंग परीक्षणावरून असे वाटते की ग्रंथकाराला एक असामान्य घटना कथन करावयाची आहे. भारतवर्षांत पूर्वी न घडलेली अशी एक राजकीय क्रांती वर्णन करावयाची आहे. ती अपूर्व क्रांतीची घटना क्रांतीच्या स्वरूपात कथन केली तर सामान्य जनतेच्या गळी उतरणे शक्य होणार नाही. त्या प्रकारची क्रांती पूर्वी कधी घडलेली त्यांनी ऐकलेली नाही अशा अभूतपूर्व भव्य क्रांतीचे आकलन त्यांना कसे झेपेल! या कारणास्तव ती ऐतिहासिक क्रांती राज्यलोलुप भाऊबंदकीच्या स्वरूपात गोवून मांडावी लागली आहे. वस्तुतः महाभारत युद्ध हे साम्राज्यवादाविरुद्ध गणतंत्रवाद असा संघर्ष होता. कौरव हे पूर्ण साम्राज्यवादी होते तर पांडव गणतंत्राचे कट्टे पुरस्कर्ते होते. त्यामुळे कौरव व पांडव एकाच कुळात उत्पन्न झाले असा जो आपला पूर्वापार समज आहे तो पण भ्रांतिमूलकच आहे.

कौरव हे साम्राज्यवादी पक्षाचे पुढारी होते. हस्तिनापुराचे आसमंतात त्यांचे राज्य पसरलेले होते.

त्यांच्या पक्षात तत्कालीन भारताच्या पश्चिमेकडील कांबोज प्रदेशापर्यंतची राज्ये व पूर्वेकडील गंगाखोऱ्यातील साम्राज्यवादी राज्ये संमीलित झाली होती. अशा या विशाल साम्राज्यवादी पट्ट्यातील पांचाल प्रदेशचा राजा द्रुपद हा मात्र तटस्थ राहिला होता पण शेवटी तो योग्य समयी गणतंत्रवादी संघास मिळाला.

कुन्तीने पांडव हे गणतंत्रवादी संघराज्याचे प्रतिनिधी म्हणूनच निवडले होते. त्या समयांत भारतात ठिकठिकाणी गणतंत्रवादी राज्ये विखुरलेली होती. उत्तर भारतात नेपाळकडील शैवसंघराज्य, पांचाल प्रदेशातील द्रुपदाचे गणराज्य, मध्यभारत व सह्यपठारावरील वृष्णिसंघांची गणराज्ये, विदर्भ व त्याच्या पूर्वेकडील प्रदेशातील भोजसंघराज्ये, आन्ध्रातील अन्धकगणराज्य, राजस्तानातील कुकुरगणराज्ये तसेच अनेक गणपतिसंघ गोपसंघ या गणतंत्रवादी संघटनेत संमीलित झालले होते असे दिसून येते.

महाभारतात वर्णन केल्याप्रमाणे मथुरेस भोजांचे राज्य होते ते गणतंत्रवादी असावे. पण कंस गणतंत्राला अनुकूल नव्हता म्हणूनच त्याचा नाश करावा लागला. व त्या गणराज्याची सूत्रे उग्रसेनाकडे सुपूर्त केली. या भोज गणराज्यात आन्ध्र वीरांचाच विशेष भरणा होता. हे आन्ध्रवासी अन्धक व त्यांचेच संबंधी व पडोशी वृष्णी या नावाने उल्लेखिलेले द्राविड क्षत्रिय मथुरा–वृन्दावनात पडाव टाकून होते. अशा या अनेक गणतंत्रवादी संघांचे बौद्धिक नेतृत्व त्यासमग्र वृष्णिसंघाचे चतुर अग्रणी भगवान श्रीकृष्ण यांचेकडेच होते. महाभारत युद्धाचा आरंभ होण्यापूर्वी शांतिसंस्थापनाच्या गोष्टी श्रीकृष्ण व साम्राज्यवादी गटाचा प्रतिनिधी म्हणून आलेला कर्ण या दोघांत झाल्या असे वर्णन महाभारतात आहे. (उद्योग प. अध्या. १३८ श्लो. १८ भांडारकर प्रत)

वरील विवेचनावरून निश्चितपणे म्हणता येईल की महाभारत युद्ध हे भाऊबंदकीमुळे झालेला राजकीय कलह नसून ते युद्ध म्हणजे साम्राज्यवादी राज्याविरुद्ध गणतंत्रवादी सत्तेचा संघर्ष होता. या संघर्षात वृष्णि–संघाने पुढाकार घेतला होता. त्या वृष्णिसंघाचे कर्णधार भगवान् गोपालकृष्ण यांनी भारतात गणतंत्रसत्ता संस्थापनेचे स्वप्न साकार केले.

श्रीकृष्णांच्या या लोकोत्थानवादी प्रयत्नांचा साक्षात्कार तत्कालीन अनेक गणसंघातील सुबुद्ध व्यक्तींना झाला होता. त्या व्यक्ती स्वार्पण भावनेने श्रीकृष्ण कार्यात संलग्न झाल्या. अशा श्रेष्ठतम व्यक्तींत श्रीकृष्णाची पितृ–भगिनी कुन्ती हिला फार मोठे स्थान दिले पाहिजे. कारण त्यावेळी भारतात गणतंत्रसंस्थापनाचा प्रयोग प्रथमतःच मूर्तस्वरूपात येत होता. अशा या अभूतपूर्व क्रान्तिकार्यात मोठ्या धैर्याने सामील होऊन कुन्तीने जे संघटनाकौशल्य दाखविले त्याची वाखाणणी करावी तितकी थोडीच ! तिने दाखविलेले राजकारणातील चातुर्य, तिने योजिलेले राजकीय यशस्वी डाव याला तर तोड नाही. आमचे मत विचाराल तर आम्हाला असे वाटते की अखिल विश्वात गणतंत्रसत्ता नावारूपाला आणणारी जर कोणी प्रथम महिला असेल तर कुन्तीच ! म्हणूनच या आदिक्रांतिकारक महिलेचा 'क्रांतिशिखा' या नावानेच उल्लेख केला आहे.

महाभारताविषयी अशा आश्चर्यकारक विधानांचे सोपपत्तिक विवेचन सूज्ञ वाचकांसमोर मांडण्यापूर्वी त्या विधानांचे दिग्दर्शन करून हा उपोद्घात पूर्ण करू —

१. गणतंत्रवाद वैदिक आहे. त्या वादाचे बीज अत्रि-ऋषींनी प्रथम भारतात रोविले. श्रीकृष्ण, कुन्ती, कृष्णद्वैपायन यांनी त्या वादाला मूर्तरूप दिले. 'गणतंत्रवाद' भारताने विश्वाला दिलेली देणगी !

२. गणतंत्रसंस्थापनेसाठी महाभारतकाळी धार्मिक व सामाजिक क्रान्ति होणे अपरिहार्य होते. त्या क्रांतिमुळे वैदिक वाङमयाचे नवसंकलन झाले तसेच लोकवाङमयाचे संस्कृतिकरण करून संस्कृत भाषेस भारतीय राष्ट्रभाषेचे स्थान मिळाले. सामाजिक क्रान्तीने भारतीय एकात्मता सिद्ध झाली.

३. या धार्मिक क्रान्तीने सर्व वैदिक वाङमयाचे नवे संकलन झाले. त्यामुळे संस्कृत वाङमयांत 'ळ' आणि 'ण' या वर्णध्वनीचा प्रसार झाला. वास्तविक अद्यापही उत्तरभारतीयांत ळ आणि ण या वर्णांचा उच्चार नाहीच त्यांना तो साधत नाही. त्यामुळे ते ळ ऐवजी ड चा आणि ण ऐवजी न या वर्णांचाच उच्चार करतात, यावरून ळ आणि ण या वर्णध्वनींची वैदिक वाङमयावरील छाप वैदिक वाङमयाच्या नवसंकलनात द्राविडांचे प्रभुत्व व्यक्त करते त्या द्राविड ठशाला मुरड घालून उत्तरभारतीयांना सुलभ अशी उच्चारण परंपरा याज्ञवल्क्यांनी सुरू करून माध्यंदिन संप्रदाय अस्तित्वात आणिला.

४. वैदिक वाङ्मयाचा आविर्भाव भारतवर्षाच्या बाहेरील भूमीत झाला नाही. भारतातील सप्तसिंधू प्रदेशांतच सप्तगोत्रप्रवर्तक सप्तर्षी अनादिकालापासून वास्तव्य करीत होते. त्यांना जो मंत्रोपदेश लाभला तो त्यांनी सात छन्दात उपनिबद्ध केला. त्यालाच वेद म्हणतात.

५. कौरव व पांडव हे चुलत भाऊ नव्हतेच. कौरव धृतराष्ट्र–गांधारीचे पुत्र होते हे खरे पण पांडव हे पंडु–कुन्तीचे पुत्र नव्हते. ते गणसंघांचे प्रतिनिधी म्हणून कुन्तीने आहूत केले होते. त्यांना पुत्रवत मानून गणतंत्रसंस्थापनेच्या कार्यात संमीलित केले.

६. महाभारतकाळी गणतंत्रसंस्थापन कार्याची महनीय कामगिरी यशस्वी करण्यात ज्या लोकोत्तर व्यक्ती आढळतात त्यांत कुन्तीचे स्थान श्रीकृष्णाच्या बरोबरीचे आहे. तिने त्या कार्यसिद्धीसाठी जो नियोग आचरिला तो पुत्रोत्पादनाचा ग्राम्य प्रकार नसून ती एक राजकीय संघटनेची प्रक्रिया आहे.

७. महाभारतात साम्राज्यवादी मुख्य पात्रे गौरवर्णाची व गणतंत्रवादी मुख्य पात्रे श्यामवर्णाची वर्णिली आहेत. यावरून गणतंत्रवादी पक्षात द्राविडप्रजेच्या नेत्यांचे प्रामुख्य होते असे ग्रंथकारांनी ध्वनित केले. क्रान्तिनेत्यांनी दक्षिणदिशेस पितृदिशा मानिले.

८. महाभारतकाळी भारतीय एकात्मता निर्माण करण्यासाठी जी आवश्यक सामाजिक व राजकीय क्रान्ती झाली ती यशस्वी करण्यास वृष्णिसंघातील द्राविड नेत्यांनीच पुढाकार घेतला. त्या क्रान्तीच्या पार्श्वभूमीवर साकार झालेला नवा समन्वयवादी संप्रदाय (ज्याला सांप्रत हिन्दुधर्म या नावाने संबोधितो–) आसेतुहिमाचल प्रसृत झाला.

९. पांडव वनवासानंतर प्रगट झाले त्यावेळी कालगणनेविषयी जो वाद झाला त्यावरून पांडव चांद्रवर्ष मानणारे व कौरव सौरवर्ष मानणारे होते. यावरून कौरव व पांडव एककुलप्रसूत नव्हते.

१०. बौधायन धर्मसूत्रात दाक्षिणात्यांच्या विशिष्ट चालीचे वर्णन करताना मातुलकन्या परिणय हा त्यांचा खास रिवाज सांगितला आहे. वृष्णिसंघ व पांडव यांच्यात मातुलकन्या परिणय रूढ होता यावरू ते द्राविड असावेत.

११. द्रौपदीची अग्निकुंडातून सशरीर उत्पत्ती झाली? ते द्रुपदाशी झालेले अग्निसख्य होते? तथाकथित द्रौपदीचा पांच पतींशी विवाह का? ह्या कथा कोणत्या राजकीय घटना सांगतात?

१२. महाभारताच्या प्रथम संस्करणाचे 'जय' असे अन्वर्थक नाव देऊन यशस्वी झालेल्या गणतंत्र–क्रान्तीची ही विजय–गाथा गाइली आहे.

साभार पोच

★ **इरवा** शंकर वडे (कविता) वऱ्हाडी साहित्य महामंडळ, दिग्रस : रु. १.६०.

★ **कॅलिडोस्कोप** : अच्युत बर्वे मॅजेस्टिक बुकस्टॉल, गिरगाव नाका, मुंबई – ४ : पृ. २०७ : रु. १६.

★ **शोध : बाळ गोपाळांचा** : य. दि. फडके : (लेख) श्री विद्या प्रकाशन : २५० शनिवार पेठ, अष्टभुजा रस्ता, पुणे – ३० पृ. २२६ : रु. १८.

★ **नवे घर** : निरंजन उजगरे (कविता) निशिगंधा प्रकाशन, नौपाडा, ठाणे : पृ. ८० : रु. १०.

★ **मुरारिमल्ल विरचित बाळक्रिडा** सं रा. चि. ढेरे, मो. मा. वाळिंबे श्री विद्या प्रकाशन, २५० शनिवार, पुणे – ३० : पृ. १०९ : रु. १५.

★ **संत ज्ञानदेव : चरित्र, कार्य व तत्त्वज्ञान** : वि. त्र्यं. शेटे : प्रकाशक – संचालक, श्री ज्ञानेश्वर विद्यापीठ, आळंदी (देवाची) जि. पुणे : पृ. १८१ रु. १०.

★ **महाभारत : एक सूडाचा प्रवास** : दाजी पणशीकर अस्मिता प्रकाशन, ४५८/२ सदाशिव, पुणे ३० : पृ. ५६७ : रु. ५०.

'थँक यू मिस्टर ग्लाड' – एक यशस्वी मानवी चित्रण

विमल भालेराव

माणूस म्हणजे निसर्गाचे सर्वगुणसंपन्न लेणे. मुळात वाईट नसलेले. पण नियतीच्या डोळ्यात त्याचे सर्वगुणसंपन्नत्व खुपते आणि दृष्टावले जाते. नियती नको ती परिस्थिती त्याच्या वाट्याला आणून त्याला बिघडवीत असते, मातीमोल करीत असते. इच्छा नसताना बरेचदा नको त्या गोष्टी त्याला कराव्या लागतात. त्या परिस्थितीवर सामान्य माणसाला मात करता येत नाही. आणि म्हणून नियतीकडून त्याचा बळी घेतला जातो. नको त्या गोष्टी करताना तो चिडतो, वैतागतो, सूड घेण्याच्या भावनेतून पेटून उठतो. कारण त्याच्या सहनशक्तीलाही मर्यादा आहेच ! पण मुळात असलेले त्याचे चांगुलपण पूर्णपणे कधीच लोप पावत नाही. वेळ येताच ते प्रकटते. क्षणिक धारण केलेला वाईटपणा बाजूला सारला जातो. हे मानवी जीवनाचे चिरंतन मूल्य बर्वे या कादंबरीत उकलतात. ग्लाड आणि नक्षलवादी या दोन समर्थ व्यक्तिमत्त्वांची ही झुंज आहे. यातूनच हे सत्य साकारते.

मारा ग्लाडपासून तोडली जाते. जवान, तगडा ग्लाड गेस्टापोंपुढे अजिजीने, लाचारीने तिच्या प्राणांची भीक मागतो. माराला त्याचे भीक मागणे बिलकूल आवडत नाही. त्याही अवस्थेत, 'पुरुषांसारखा पुरुष असून षंढासारखी अत्याचाऱ्यांच्या पुढ्यात लोळण का घेतोयस ? ' (९७) या शब्दांत मारा त्याची कान-उघाडणी करते. माराचे शब्द ग्लाडच्या वर्मी लागतात. पण वेळ निघून गेलेली असते. हिटरलच्या गॅसचेंबरमध्ये मारा गुदमरून गुदमरून मारली जाते. आणि ग्लाड पूर्णपणे उध्वस्त होतो. माराबरोबर ग्लाडचा धर्म जळतो. त्याची श्रद्धा जळते. त्याचा स्वप्नांशी संबंध तुटतो. त्याच्या जीवनाचा बहरच खुंटतो. ग्लाडचा बाणच पूर्णपणे बदलून जातो. दुःखाने, ताटातुटीने हल-णारे, तडफडणारे माणसाचे मृदू, मुलायम मन तो टाकून देतो. ' जग मोठं क्रूरय. इथं कुणावर जीव लावू नये; कुणाला जीव लावू देऊ नये.' (७८) हे त्याचे जीवनतत्त्व होऊन बसते. रागावणे, ओरडणे हेच त्याच्या जीवनातील आनंद होऊन बसतात. ग्लाड सूडभावनेने पेटून उठतो. त्याचे क्रौर्य अधिकाधिक स्पष्ट करण्यासाठी बर्व्यांनी मोठ्या चतुराईने जेलरची भूमिका त्याच्याकडे सोपव-लेली आहे. त्याच्या फरशीवरून चालणाऱ्या ताडताड पावलांनी पाखरांची किलबिल एकदम थांबते. पानांची सळसळ बंद होते. फाटकाला भीतीने कापरे भरते. भिंती अंग चोरून उभ्या राहतात. कामगार वर्ग आणि कैदी यांची पाचावर धारण बसते. ग्लाडचे हे दरारी व्यक्तिमत्त्व अधिक स्पष्ट करण्यासाठी या मजकुराची कादंबरीत बरेचदा पुनरुक्ती होते. परंतु त्यामुळे कादंबरीचा ओघ कुठेही साकळत नाही. रोज एक दंडा कोणाच्यातरी पाठीवर मोडल्याशिवाय तो टिफिनला हात लावत नाही. फाशी दिल्यावर धार्मिक कृत्य केल्याचे सात्त्विक तेज त्याच्या चेहऱ्यावरून ओसंडते. असा त्याच्या अठ्ठावीस वर्षांच्या कारकीर्दीचा इतिहास आहे. खुनाच्या प्रकरणातून फाशीची शिक्षा झालेला एक क्रांतिकारक नक्षलवादी–वीरभूषण पटनाईक याची केस ग्लाडकडे येते. नक्षलवादी हा ग्लाडचा कैदी. त्याने ग्लाडच्या इशाऱ्यानुसार चालायला पाहिजे. परंतु नक्षलवादी वाकणारा नाही. अगदी लहान बाळालासुद्धा विरोध सहन होत नाही. मग ग्लाड तर एक अधिकारी आहे. त्याला विरोध सहन होणे शक्यच नाही. त्यामुळे अगदी पहिल्या भेटीपासूनच त्यांची झुंज सुरू होते. यातूनच हळू हळू ग्लाड म्हणजेच एक मानवी चांगुलपण आपल्या हाती येते.

पहिल्या भेटीतच ग्लाड नक्षलवाद्याचा 'बास्टर्ड' असा उल्लेख करतो, "आय डोन्ट नो हू इज दॅट बास्टर्ड. वट दॅट नक्सलाइट इज हिअर !" (३) नक्षल-वाद्याच्या या पहिल्याच उत्तराने ग्लाड चमकतो. नक्षलवाद्याच्या पोटासंबंधीची हकीकत ग्लाड कान टवकारून ऐकतो. वरवर जरी तो नक्षलवाद्याशी वाईट वागत असला तरी कुठे तरी त्याच्या अंतःकर नक्षलवाद्यासंबंधी कणव निर्माण होते. येथूनच ते

हळू निवळायला लागतो. नक्षलवादी आपल्याला कळावा म्हणून ग्लाड काही तत्त्वज्ञानाची पुस्तकेही वाचतो. हे बदल जरी ग्लाडमध्ये होत असले तरी अठ्ठावीस वर्षे सांभाळलेली सूडभावना त्याला सोडायला तयार होत नाही. तिला तो अपमान वाटतो. ती रोज नक्षलवाद्याला तुडवण्याची प्रतिज्ञा ग्लाडला करायला लावते. डेथ सेन्टेन्स कन्फर्म केल्यावर ती हरखून जाते. तडफडत, लोंबकळत मारण्यात तिला आनंद होतो. याचे कारण म्हणजे मारा अशीच तडफडत मेलेली असते. रोज घरून निघताना नक्षलवाद्याला मारण्याचा निर्धार होतो. परंतु नक्षलवाद्याला पाहताच त्याचा नूरच पालटून जातो. कारण ग्लाडच्या चांगुलपणाने मनातल्या मनात नक्षलवाद्याला पसंत केलेले असते. ग्लाड आपला निर्धार पूर्ण न झाल्याने फणफणतच घरी परततो. असा ग्लाडच्या सूडबुद्धीचा आणि चांगुलपणाचा सतत संघर्ष सुरू असतो.

मर्सिपिटिशनचा अर्ज लिहिण्यास नक्षलवादी तयार होत नाही. एक जेलर म्हणून ग्लाडचा हा अपमान आहे. पण या अपमानाने तो चवताळत नाही तर वावचळतो. "काल रात्री घेतलेली अजून उतरली नाही की काय या भावनेने त्याने स्वतःला चिमटा काढून पाहिला." (१६) ग्लाडमधील बदलाचे हे वर्व्यांचे चित्रण फारच सुंदर साधलेले आहे. ग्लाडच्या या नवीन रूपाची ओळख हळूहळू निसर्गालाही पटू लागते. म्हणून ग्लाड झोपला असताना, "उन्हाची तिरीप बिनदिक्कत शिरली आणि त्याच्या चेहऱ्यावर जाऊन पडली. . .झोपमोड केल्याबद्दल सूर्याला सस्पेंड करणे काही ग्लाडसाहेबाच्या हाती नव्हते.' (१७) स्वभावनिष्ठ विनोद वर्वे या ठिकाणी साधतात.

ताटातुटीचे दुःख ग्लाडने अनुभवलेले आहे. जे दुःख आपण भोगले ते नक्षलवादी व त्याची पत्नी यांना तरी भोगावे लागू नये या उदारमतवादी दृष्टिकोणातून ग्लाड नक्षलवाद्याच्या पत्नीला त्याला भेटू देतो. वाटेल तेवढा वेळ बोलण्याची परवानगी देतो. नक्षलवाद्याच्या बायकोच्या भेगाळलेल्या पायांकडे बघून कळवळतो. तिला पैसे देतो. आणि बरेच वर्षांनी पुण्यकर्म केल्याचे सात्त्विक समाधान मिळवतो. पण त्याच्या अठ्ठावीस वर्षांच्या कारकीर्दीचा लगेच चडफडाट होतो. नक्षलवादी जेव्हा विल्‌संबंधी बोलतो तेव्हा ती कडाडते, 'विल्‌ची काय गरज ? तुला टांगल्यावर तुझा थालीपाॅट भट्टीखान्यातच जमा होणार आहे.' (२७) नक्षलवाद्याला या शब्दांत डिवचले जाते. पण लगेच त्याचे चांगुलपण आठवून त्याच्या दारिद्र्यावर उगीचच बोट ठेवले म्हणून हळहळते. त्याच्या शब्दाचे त्यालाच ओझे वाटू लागते. ग्लाडची सूडभावना आणि चांगुलपणा यांची उघडझाप सारखी चालू असते.

नक्षलवादी ग्लाडला 'असंस्कृत', 'नरपशू' म्हणतो. परंतु 'पुत्राचे सहस्र अपराध। माता काय मानी तयाचा खेद' या पावित्र्यात ग्लाड वावरतो. "हे प्रिये तुझ्याचसाठी सैतानालाही आव्हान दिले मी" (५५) असे आपल्या सैतानी वागणूकीचे कारण सांगतो पण, 'तुझ्याचसाठी का ईश्वरालाही विसरलो मी" (५५) अशी आपल्या वागण्यातली चूकही तो कबूल करतो. फक्त आंब्याला मोहर आला की कूजन करणारी माणसाच्या जातीतली लबाड कोकिळा ग्लाडला आवडत नाही. सुखदुःखात सोबत करणारी रातराणी त्याला पसंत पडते.

आपल्या चेहऱ्यावरील विरागी शांती आणि ग्लाडशी बरोबरीच्या नात्याने वागणे नक्षलवादी कधी सोडत नाही. आपल्या मृत्युपत्रात तो लिहितो, 'माझ्या देशातील तुमची शासनसत्ता उलथून पडून कामगार वर्गाच्या अधिनायकत्वाखाली कष्टकरी जनतेची नवी लोकशाही प्रस्थापित होईल याचा मला दृढ विश्वास आहे. आणि म्हणूनच जनतेच्या विजयी लढाऊ विभागाचा एक घटक असलेला मी, तुमच्याकडे प्राणांची याचना करीत नाही, करणार नाही. तसे करणे म्हणजे कष्टकरी जनतेच्या लढाऊ सामर्थ्याचा अपमान, आणि तुमच्या शोषित, जुलमी शासनसत्तेचा सन्मान केल्यासारखा होईल. . . तुमच्या शासनसत्तेला केवळ माझे प्राण हवे आहेत. माझ्या जीवनाचे अस्तित्व तुम्हाला पुसायचे आहे. . . मी या समाजाचे, माझ्या कष्टकरी देशबांधवांचे काही देणे लागतो, व त्या देण्यातून मुक्त होण्यासाठी माझ्या शरीराचा प्रत्येक भाग त्यांच्या कामी यावा अशी इच्छा धरतो.' (६२) आपल्या शरीराचा प्रत्येक अवयव गरजू लोकांना विनामूल्य देण्यास तो सांगतो. ग्लाडला हे नक्षलवाद्याचे जगावेगळे मृत्युपत्र वाकुल्या दाखवून सांगते, 'बघ क्रांतिकारक असा असतो.' या ठिकाणीच ग्लाड अवमानित झालेला असतो. कारण लाचाऱ्यांपुढे गुडघे टेकवून त्याने मारासाठी प्राणांची भीक मागितलेली असते. पण तरीही

ग्लाड चिडत नाही. तर जे आपल्याला साधले नाही ते याला साधले म्हणून त्याचे कौतुक करतो. या मृत्यु-पत्रातून कादंबरीकाराने नक्षलवाद्याच्या व्यक्तिमत्त्वातला कण न् कण वाचकांसमोर मांडलेला आहे.

बदललेला ग्लाड नक्षलवाद्याला वाचविण्याचा प्रयत्न करतो. त्याची फाशी रद्द व्हावी म्हणून मर्सि-पिटिशन लिहितो. "तुझा जीव लाखमोलाचा आहे.. तुझ्यासारखी माणसंच क्रांती करतात." "मी तुला हकनाक फासावर चढू देणार नाही."(४४) अशी त्याची पोटच्या पोरासारखी परोपरीने समजूत घालतो. पण नक्षलवाद्याचे ठाम उत्तर असते, "आयुष्य दुर्मिळ आहे...पण हौतात्म्य दैवदुर्मिळ आहे."(५४) आधीच ताठ असलेल्या नक्षलवाद्याला बर्व्यांची कलात्मकता या ठिकाणी आणखी ताठ करते.

शेवटी ग्लाडची सूडभावना पूर्णपणे गळून पडते. आपले पाऊल दगडी फरशीलाही रुतणार नाही इतक्या अलगदपणे ग्लाड चालतो. बदललेला ग्लाड आणि त्याचे मऊ–मुलायम चांगुलपण बर्वे यातून दाखवतात. जेनीची सुखरूप सुटका व्हावी म्हणून कुशल सर्जन नक्षलवादी याची मदत घेण्याची वेळ येते तेव्हा नक्षलवाद्याशी केलेली आपली वाईट वर्तणूक ग्लाडला आठवते. 'जेनीचा प्राण तर नक्षलवादी घेणार नाही ना?' अशी भीती ग्लाडला वाटते. तिच्या सोबत नर्स आहे. या विचाराने त्याला जरा बरे वाटते. मानवी मनाची स्वाभाविकता बर्व्यांनी यातून टिपलेली आहे. नक्षलवादी जेनीला समजून सांगतो, "ज्या वेदना वांझ नसतात त्यांचं दुःख करायचं नसतं."(९४) तिचे प्राण वाचवताना आपले दोन क्षणांवर उभे असलेले मरणही तो विसरत. जेनीची सुखरूप सुटका होते. या ठिकाणी ग्लाडचे चांगुलपण पूर्णपणे उमलते. ग्लाड नक्षलवाद्याल सोल्जर्स डेथ देतो आणि आपण गुन्हेगार म्हणून विराग. शांतीने पोलिसांच्या स्वाधीन होतो. 'बिहेव लाइक अ जंटलमन ऑर ए वॉरिअर.'(५४) ही जी नक्षलवाद्याची ग्लाडकडून अपेक्षा असते ती शेवटी पूर्ण होते. अखेरच्या क्षणी आपली सर्व शक्ती एकवटून नक्षलवादी म्हणतो, "थँक यू...थँक यू मिस्टर ग्लाड!"(१०३) पाखरे, भिंती, झाडे ग्लाडच्या या कर्तृत्वाला पसंतीची पावती देतात. मानवाच्या चांगुलपणाला निसर्गाकडून मिळालेल्या या अभिवादनापाशीच मोठ्या कलात्मकतेने बर्व्यांनी कादंबरी संपवलेली आहे.

कधी वातावरणातून तर कधी संवादांतून, केव्हा प्रसंगांतून तर केव्हा स्वगतातून बर्व्यांनी ही दोन्ही पात्रे कुशलतेने उकलली आहेत. आणि त्यातूनच अमित मानवी मूल्यांची उकल साधली आहे. माणसाची पारख असलेली जेनी, जुलम्यांपुढे गुडघे न टेकवणारी तडफदार, तेजस्वी मारा आणि नक्षलवाद्याची बायको या व्यक्तिरेखा फक्त एक-एक, दोन–दोन ताकदवान वाक्यांतून बर्व्यांनी उभ्या केलेल्या आहेत. माणूस अधिक स्पष्ट करण्यास कोकिळा आणि रातराणी ही सुंदर प्रतीके वापरलेली आहेत. पहिल्यावहिल्या कादंबरीत मिळालेले एवढे भरघोस यश बघून बर्व्यांचे खरोखर फार कौतुक वाटते.

'थँक यू मिस्टर ग्लाड': अनिल बर्वे, पॉप्युलर प्रकाशन, आ. १, पृ. १०३; मूल्य : ८ रुपये.

अनुक्रमणिका

‘तसवीर आणि तकदीर’

अक्षयकुमार काळे

उर्दू वळणाचे शीर्षक असलेल्या ५१५ पानांच्या या विस्तृत आत्मचरित्रपर ग्रंथात प्रथमतः कुठली गोष्ट जाणवत असेल तर ती ध्येयवेड्या, भावनापूजक आणि आत्मरत व्यक्तिमत्वाच्या विकासाची घडण. ही घडण जीवनाच्या दोन्ही अंगांनी झालेली आहे : एक आंतरिक जीवन आणि दुसरे बाह्य जीवन. क्षीरसागरांच्या जीवन-भाष्यात या द्विविध जीवनाला समान स्थान आहे पण आपल्या मनाला वेड लावतो तो आंतरिक जीवनाचा, रोमॅन्टिक प्रवृत्तीचा, प्रेमी मनाचा आणि डिवचल्या गेल्याबरोबर आपल्या मानसिक कोषाबाहेर पडून बंड करून उठणाऱ्या भावनापूजक व्यक्तित्वाचा भाग.

चिंतन आणि लेखनाच्या वळावर मराठीतील पहिल्या दर्जाचे टीकाकार आणि समीक्षक म्हणून क्षीर-सागर मराठी वाङमयात प्रसिद्धी पावले आहेत. निरनिराळ्या सभासंमेलनांच्या अध्यक्षपदांचा सन्मान स्वीकारीत असताना ज्यांची आस प्रत्येक साहित्यिक बाळगतो त्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावर आरूढ होण्याचा सन्मान त्यांनी मिळविला ही त्यांच्या बाह्यजीवनाची कथा आहे. या व्यक्तिविकासावर क्षीरसागरांनी पुष्कळच भाष्य केले आहे, त्यांच्यातील टीकाकार कसकसा घडत गेला याचे तपशीलवार वर्णन क्षीरसागरांनी अत्यंत संयमाने केलेले आहे. वाङमयीन टीकाकाराच्या जोडीला असलेल्या सामाजिक कर्तव्यपरायणतेचाही साक्षात्कार त्यांचे आत्मचरित्र वाचताना सातत्याने होतो. क्षीरसागरांचे व्यक्तित्व विकसित झाले ते त्यांच्या वाङमयीन कार्यामुळेच. पण त्यांच्या रोमॅन्टिक मनाचा विकास लक्षात घेण्यासाठी त्यांच्या वैयक्तिक आणि मानसिक जीवनाकडेच वळावे लागते आणि नेमका ह्याच भाग अतिशय हृदयस्पर्शी उतरला आहे. त्यांच्या प्रेम-जीवनाला त्यांच्या आत्मचरित्रात वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. ‘अनेक कादंबऱ्यांना पुरतील अशा प्रेमप्रकरणेही या आत्मचरित्रात अंतर्भूत झालेली आढळतील’ अशी जाहिरात या आत्मचरित्राच्या वेष्टनावर मोठ्या खुबीदारपणे करण्याचे कार्य प्रकाशकाने केलेले आहे पण आत कादंबऱ्यांना पुरणारा, लोकांना चविष्टपणे चघळता येण्यासारखा तथाकथित प्रेमाचा मसाला क्षीरसागरांनी भरून ठेवल्याचे दृष्टोत्पत्तीस येत नाही.

क्षीरसागरांचे हे प्रेम आणि प्रेमप्रकरणे रूढ चाकोरीपेक्षा वेगळी आहेत. मनुष्य प्रेमप्रकरणासंबंधी लिहिताना नकळत ते प्रेम पुनः जगत असतो. त्यावर भाष्य कमी असते आणि जगलेल्या वस्तुस्थितीला अधिक महत्त्व असते; पण क्षीरसागरांचे असे नाही. प्रेमापेक्षा प्रेमाचे तत्त्वज्ञान सांगण्याकडे क्षीरसागरांचा कल अधिक आहे. आपले प्रेम सर्व सामान्यांसारखे नाही. ते इतरां-पेक्षा उच्चतर पातळीवरचे आहे, त्यात शारीरिकतेचा भाग कमीच (जगावेगळ्या प्रेमात हे ओघाने आलेच) ही त्यांची पक्की समजूत आहे. त्यामुळे अशा प्रेमाच्या बाबतीत त्यांनी आपला समानधर्मा आधी शोधला तो म्हणजे माधवराव पटवर्धन व त्यामुळे माधवरावांच्या प्रेमाची छाननी करणाऱ्या सर्व टीकाकारांची, विशेषतः रविकिरण मंडळाच्या सदस्यांची, त्यांनी प्रथम हजेरी घेतली आहे. प्रेमाचे तत्त्वज्ञान विशद करताकरताच माधवराव, त्यांची प्रवृत्ती, प्रेमातील ध्येयवादित्व, प्रेमा-बद्दलच्या कल्पना यांना आपल्या परीने सिद्ध करून आपणही नेमके माधवरावांसारखे नसले तरी माधवरावी पद्धतीनेच प्रेम करण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे ते म्हणतात, “स्त्रीसंपर्काने माझ्या मानसिक शक्तींना फक्त ‘स्टिम्युलेशन’– ‘उत्तेजन’ मिळत असे. म्हणजे मी संयमीही नव्हतो. माझ्या मनाचे दार घट्ट बंदही नव्हते, की ढिले याणि नादुरुस्तही नव्हते. ते उघडे आणि सौंदर्याच्या संपर्काला सहज तयार असे.” अर्थात हे फ्लर्टिंग नव्हते. ते म्हणतात, “फ्लर्टिंगपेक्षा अधिक निर्मळ आणि प्लेटॉनिक ‘लव्ह’ पेक्षा कमी उदात्त असा एक संपर्क, बुद्धिमंत आणि प्रतिभावंत यांच्या जीवनात असू शकतो, असे मला वाटते.” (पृ. १०३)

अशा संपर्काबाबत त्यांच्या पहिल्या प्रेयसीला महत्त्वाचे स्थान आहे. ‘एम’ हे तिचे सांकेतिक नाव

खरे नाव न सांगितल्यामुळे वाचकांना तर्क वितर्काला बरीच जागा ठेवली आहे. अर्थात सुबुद्ध वाचकाला संपूर्ण नाव जाणून घेण्याची आवश्यकता नसावी. क्षीरसागरांच्या या प्रेयसीला आत्मचरित्रात काही विशिष्ट आकार नाही. तिच्या व्यक्तित्वाचे, स्वभावाचे आणि सौंदर्याचे वर्णन पुष्कळच 'रोमॅन्टिक' पद्धतीने केले असले तरी तिचे व्यक्तित्व साकार करण्यात क्षीरसागर फारसे यशस्वी झाले नाहीत असे खेदाने म्हणावे लागते. तिचे सगळे व्यक्तित्व काहीसे धूसर भासते. क्षीरसागरांची या प्रेमाबाबतची भूमिका 'कॉन्शसकिपर'ची आहे, त्यामुळे प्रेमाचे सर्वमान्य पैलू त्यात नाहीत. ह्यामुळे बालवयातील क्षणिक आकर्षण गोड हुरहूर, छळणारी तीच ती जाणीव, प्रेमात गाठलेली अतिरेकी टोके, केलेल्या प्रतिज्ञा आणि प्रेमवंचना, वासनेच्या क्षणिक मोहापायी उधळून दिलेले बेबंद आयुष्य यातील एखाद्या तरी पैलूच्या दर्शनाची अपेक्षा बाळगणाऱ्या वाचकाची प्रायः निराशाच व्हावी.

क्षीरसागरांचे प्रेम कसे तोललेले आहे, मापलेले आहे. कर्तव्याला या प्रेमात अधिक महत्त्व आहे. क्षीरसागरांनी प्रथम पत्नीबद्दल लिहिलेले सर्वच अतिशय हृदयस्पर्शी आहे. कारुण्य आणि प्रेमाने या विवेचनाचा भाग रंगून गेला आहे. क्षीरसागरांच्या या लिखाणात त्यांच्या वेदनेचा वेद झाला आहे. त्यातला प्रामाणिकपणा, सौहार्द आणि कलात्मक अलिप्तपणा वाखाणण्याजोगा आहे. प्रथम पत्नीची लग्नापूर्वीची असहाय्यता, परित्यक्ता असताना उन्मळून गेलेले तिचे मन, पोटचा पोरगा सासरच्या माणसांनी ओढून नेल्यावर तिची झालेली करुण व्याकुळ स्थिती, तिच्या लहानग्या मुलाने रस्त्यात भेट झाल्यावर ओळख न दाखविण्याच्या प्रसंगातील नाट्य व व्याकुळता क्षीरसागरांनी कलात्मक रीतीने चित्रित केली आहे. विवाह सौख्याच्या बाबतीत क्षीरसागर दुर्दैवी असले तरी त्याच त्या दुःखाचा पाढा त्यांनी वाचलेला नाही. प्रथम पत्नीच्या मृत्यूनंतरचा शोक हा असामान्य पातळीवर जातो तो यामुळेच. या दुःखाला मनातल्या मनात त्यांनी दाबून टाकले नाही. त्याला कलात्मक पातळीवर नेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रथम पत्नीवर केलेले भाष्य म्हणजे नियती आणि जीवनावर केलेले उत्कट गद्यकाव्यच आहे.

क्षीरसागरांचे तिसरे प्रेम म्हणजे सध्या विद्यमान असलेल्या शकुंतलाबाईंचे वरचे. क्षीरसागरांचे कुठलेही प्रेम सर्वसामान्य प्रेमवीरासारखे नाही. त्यात भीरुता नाही पण कमालीचा आत्मसंयम आहे. तब्बल अकरा वर्षे कोर्टिंग केल्यावर, वयाची साठी ओलांडल्यावर क्षीरसागरांनी हे लग्न केले आहे. क्षीरसागरांचा हा विवाह उभय पतिपत्नीतील वयाच्या अंतरामुळे अतिशय गाजला. क्षीरसागरांनी दोन्ही लग्नातील सामाजिक आणि वैयक्तिक हल्ल्याला चांगली उत्तरे दिली आहेत. प्रेमात भीरुता असली तरी केलेल्या कृत्याबद्दलचा अभिमान आणि अनुदार वृत्तीचे खंडन हा क्षीरसागरांचा स्वभावविशेष त्यांच्या दोन्ही प्रेमप्रकरणात जाणवतो. त्यांनी प्रत्येक प्रसंगाला दिलेले उत्तर आणि संघर्ष म्हणजे जिवंत नाट्य होते. त्याला कलात्मक रूप देण्यात क्षीरसागर यशस्वी झाले आहेत.

आपले प्रेमजीवन जितक्या हळुवारपणे क्षीरसागरांनी टिपले आहे तितक्या हळुवारपणे आपले भावजीवनदेखील. आपले वडील बंधू, वहिनी, त्यांची मुले, भय्यासाहेब उमराणी, तळवलकरांसारखे घनिष्ट मित्र आणि माधवराव पटवर्धन, विठ्ठलराव घाटे इत्यादी स्नेह्यांच्या स्नेहसंबंधाच्या अत्तराची कुपी त्यांच्याहृदयात सदैव उघडी आहे आणि त्याचा सुवास संपूर्ण आत्मचरित्रभर दरवळत राहिला आहे.

प्रत्येक व्यक्तीकडे पाहण्याचा क्षीरसागरांचा स्वतःचा वेगळा दृष्टिकोण आहे. या चष्म्यातून उतरलेली, शीलवतीबाई केतकर, धुंडीराजशास्त्री विनोद, अहिताग्नी राजवाडे, भाऊसाहेब पाटणकर या सुहृदांची काढलेली स्वभावचित्रे केवळ अविस्मरणीय आहेत.

आत्मचरित्राच्या इतर अंगांबद्दल मात्र क्षीरसागर काहीसे बेपर्वा वाटतात. आत्मचरित्र म्हणजे आयुष्यात घडलेल्या सर्वच घटनांची तपशीलवार उजळणी करणे नव्हे ती एक स्वयंपूर्ण कलाकृती असते. वास्तविक 'मुंडके आणि पाय नसलेली आकृती' असे आत्मचरित्राचे वर्णन केले जाते तरी देखील आत्मचरित्राला स्वयंपूर्ण कलाकृतीचा डौल देता येतो, नव्हे ती स्वयंपूर्ण कलाकृतीच असते. याच गोष्टीचे विस्मरण क्षीरसागरांना झाल्याचे दिसते. क्षीरसागरांचा दुसरा विवाह वास्तविक त्यांच्या भावनापूजक व्यक्तिमत्वाच्या विकासाचा अंतिम टप्पा. तेथेच या आत्मचरित्राच्या लौकिक यशापयशांचे चित्रण थांबायला हवे होते. खुद्द

क्षीरसागरांना हे जाणवले असतानाही व्याख्यानासाठी केलेल्या दौऱ्यांची लांबलचक वर्णने त्यांनी जोडली आहेत. ती तपशीलजड असल्यामुळे आत्मचरित्राचा कलात्मक घाट विस्कळीत करून टाकण्यास कारणीभूत झाली आहेत. या भागालगतच काही मित्रांची स्मरणे जोडली आहेत. मित्रांची किंवा मित्रप्रेमाची वर्णने आत्मचरित्राच्या ओघातच यायला हवी होती. पत्र लिहून आल्यावर ताज्या कलमात घरातील एकेक व्यक्ती आठवून त्यांच्या नावाने आपण जसे नमस्कार आशीर्वाद लिहितो तसाच हा प्रकार झाला आहे. त्यांच्या आत्मचरित्रात जो सलग 'मूड' तयार होतो किंवा आपल्या मनाची भावावस्था तयार होते तिला या वर्णनांनी धक्का बसतो. समारोपाच्या प्रकरणाने मात्र हा विघडलेला घाट किंचित सावरल्यासारखा झाला आहे. वाङ्मय आणि आत्मशोधावरील शेवटचे भाष्य म्हणून हे प्रकरण अतिशय उत्कट उतरले आहे.

क्षीरसागरांच्या आत्मचरित्राची भाषा आत्मशोधात रंगताना त्याच त्या स्वप्नात गुंगून जाण्याची नाही. ती भाषा अस्सल भाष्यकाराची आहे. हा भाष्यकार स्वतःच्या जीवनापासून अलिप्त झाला आहे. समुद्रात पोहणाऱ्यांना किंवा बुडणाऱ्यांना समुद्राचे खरे सौंदर्य दिसत नाही ते काठावर उभे असणाऱ्यांना दिसते. क्षीरसागर जीवनसमुद्रापासून अलिप्त झाले आहेत. निर्विकार मनाने आणि निर्लेप अंतःकरणाने पूर्वग्रह सोडून त्यांनी जीवनाकडे पाहिले आहे; त्यावर सडेतोड भाष्य केले आहे. ज्या जीवनविषयक, वाङ्मयविषयक, व्यक्तिविषयक आणि समाजविषयक जाणिवा क्षीरसागरांनी उत्कटपणे जपल्या त्याचे प्रत्यंतर त्यांच्या आत्मचरित्रातील प्रत्येक पान वाचताना येते. यातच त्यांच्यातला आत्मचरित्रकार यशस्वी झाला आहे.

'तसबीर आणि तकदीर'; श्री० के० क्षीरसागर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई; मूल्य ४० रुपये; पृ. ५१५.

विसावा

माधवी जुमडे

भर दुपारची वेळ ...तहानेनं जीव व्याकूळ झाला होता. पण जवळपास कुठंही पाणी मिळण्याची आशा दिसेना, इकडे तिकडे दृष्टी फिरवितानाच क्षणभर डोळे स्थिरावले.

खोलवर खणलेल्या विहीरीतून मातीगोटे दोरानं ओढणारी ती काळसर वर्णाची कोमल तरुणी ! किती कौशल्यानं अन् सहजतेनं ती ते काम मनोमन करीत होती.

कितीतरी वेळ तिचं कौशल्य डोळे भरून पाहिलं. नकळत पावलं त्या दिशेनं वळलीत. आणि तिचं सौंदर्य एखाद्या इंद्रधनूप्रमाणे भासलं.

तिच्या काळसर अंगावर पोपटीसर मळकट पातळ होतं. काळ्याभोर वळणदार केसांचा मागे सैलसर अंबाडा पाडलेला होता. कुठल्याही रंगावर खुलणारं लालभडक कुंकू तिच्या कपाळी रेखलेलं होतं.

"ए, इथे जवळपास कुठे पाणी मिळेल काय ग प्यायला ?" मी सहानुभूतीनं तिच्याकडे पाहिलं.

"पाणी होय ! माझ्याच तर घरी आहे. ते बघा ते दिसतं ना ? तेच माझं घर.

"ए सोमा हा दोर ओढ बरं जरा ! मी बाईंना पाणी देऊन येते." असं म्हणून तिनं हातचा दोर सोडला. आणि पातळाच्या पदरानं कपाळाचा घाम पुसत ती निघाली. क्षणभर तिच्या हातांकडे पाहिलं अन् हृदयांत एक खोलवर कळ उठली.

दोर ओढून तिचे हात लाल करडे झालेले होते. पण त्याची तिला मात्र मुळीच खंत वाटली नाही. तिच्या मागोमाग मी तिच्या दिशनं निघाले.

अन् अकल्पितपणेच गतकालच्या पुसट आठवणी नकळत माझ्या मनांत क्षणाक्षणांनी ठळक होऊ लागल्या.

राधा....! अस्फुटपणे माझे ओठ हलले.

आणि तिची माझी भेट मला आठवली.

त्यावेळी ती माझ्या शेजारी राहायची. तिच्या गरिबीबद्दल मला तिच्याविषयी अपार सहानुभूती वाटायची आणि सुखी कुटुंबात जन्मलेली मी मात्र वेगळ्याच मनोव्यथेनं दुखावलेली होती. तिथं प्रेमाचा ओलावा नव्हता. मायेचं छत्र नव्हतं. त्या मानानं ती सुखी होती. दोन भिन्न मनोव्यथांच्या मनांचं नकळत प्रेम परिपक्व झालं. परस्परांच्या व्यथांना कुरवाळीत आम्ही तासन्‌तास घालवीत होतो. तिच्या दारिद्र्यातही मला प्रेमाचा ओलावा मिळालेला होता.

तो अष्टमीचा दिवस होता. आकाशातल्या चंद्राच्या मंद प्रकाशांत आम्ही कितीतरी वेळ बोलत होतो.

रात्र बरीच वाढली.

'राधा, आज जेवायचं नाही वाटतं ?' मी तिला सावध केलं.

'खरं सांगू, छाया ! आज इथून जावंसंच वाटतं नाही बघ !

काळासोबत नियतीची चक्र फिरत होती. सारं गतकालात जमा होत होतं. दोन दिशांना जाणारी आमची दोन मनं वेगवेगळ्या ध्येयाकडे वाटचाल करू लागली.

आज दहा वर्षांनंतरची तिची भेट !

आणि तीही या अवस्थेत !

गतस्मृतींना आकारीत असतानाच मी तिच्या घरी पोचले.

क्षण एक तिच्याकडे आणि स्वत:कडे दृष्टिक्षेप टाकून मी एका फाटक्या चादरीवर बसले.

घाईघाईनं तिनं एका पितळी ग्लासात गार पाणी आणून माझ्यापुढ ठेवलं. त्या गार पाण्यानं किती शांत वाटलं !

क्षणोक्षणी तिच्यावर रोखणारी माझी नजर तिच्या दृष्टीतून सुटली नसावी.

'हे काय बाई ! तेव्हाच्या काय पाहता आमच्या गरिबाकडे ?' काहीशी संकोचून ती बोलली.

'छे ग ! तसं नाही. पण सांगू का ? तुला कुठेतरी पाहिल्यासारखं वाटतं.' मी तिचं समाधान केलं.

'इश्श ! आताशा तुम्ही आल्यात अन् माझी ओळख ?' ती हसली.

'हो राधा ! मला वाटतं दहा वर्षांपूर्वी. अन् मी जीभ चावली अचानकपणे तिचं नांव माझ्या ओठांवर...

'काय.. ' ती असहाय्यपणे उद्‌गारली.

छाया...! हो छायाच. ती स्वत:शीच पुटपुटली.

मी तिचं मनोगत जाणलं. हळुवारपणे मी तिचे हात हातात घेऊन हळुवार दाबले.

'हो राधा ! मी तुझी मैत्रीण छाया !'

छाया...? आनंदानं तिनं जवळजवळ मला मिठीच मारली.

'खूप खूप श्रीमंत झालीस छाया...होय ना ?' किती कौतुकानं तिनं माझ्याकडे पाहिलं. त्यात मत्सराचा लवलेशही नव्हता.

'चल ग ! कसली श्रीमंत !' तिला पटवतानाही हृदयात कुठेतरी कालवाकालव होत होती. या दिखाऊ श्रीमंतीतही खोलवर जाणवणाऱ्या व्यथा मी तिला सांगू शकत नव्हती. इतक्या आधुनिकतेन नटलेलं माझं निर्जीव सौंदर्य तिच्या सौंदर्यापुढे लीन झालं होतं.

सदैव नवनवीन चैनीसाठी भुकेलं मन कुठेच समाधानाच्या छायेखाली विसावणार नव्हतं.

अन राधा...

त्या क्षणीही तीच सुखी होती आणि आजही.

रखरखीत उन्हात कष्ट करणारे तिचे कणखर हात ! त्यावर चालणारं तिचं समाधानी जीवन. त्यात कशाची लालसा नव्हती. दिखावटीपणा नव्हता. कुठला संकोच नव्हता. दिवसभराच्या कष्टानं मिळणारं दोन वेळचं जेवण. ह्यातच तिच्या जीवनाचं सुख साठवलं होतं. आणि थकलेल्या तिच्या मुखकमलावर सदैव आनंदाचे भाव विलसत होते.

आग्रहानं तिनं एक भाकरी आणि बेसन माझ्यापुढे ठेवलं.

त्यात कुठला संकोच नव्हता. लाज नव्हती.

तितक्याच आपुलकीनं मी मनसोक्त जेवण केलं. अन् मी जायला निघाली...तोच तिनं माझा हात घट्ट धरला.

'जातेस छाया ? इतक्या वर्षानंतरची भेट आणि कमीत कमी आजचा दिवस तरी !

तिचं मन मोडण्याचं सामर्थ्य माझ्यात नव्हतं.

रात्री मोठ्या आनंदानं तिनं माझ्यासाठी गरम ज्वारीची भाकरी अन् सुगंधित चवळीची भाजी केली.

तोंड भरून तिची स्तुती करून जेवण आटोपलं.

बाहेरच्या खाटेवर तिनं मला आंथरूण दिलं.

'राधा, किती वर्षं झालीत ग ही कामं करतेस ?'

'किती म्हणजे बरेच दिवस झालेत. आता तर कामाची सवयच झाली बघ' ती सहजतेनं बोलत होती.

'पण अग लग्न... संसार वगैरे'..मी तुटक बोलले.

तिच्या भावना तर दुखावणार नाहीत ना ? क्षणभर शंका डोकावली पण ती निर्धास्त होती.

'लग्न संसार ह्या साऱ्या गोष्टींचा उपभोग तर सगळे घेतात पण ह्या जीवनाचा उपभोग कुणी घ्यायचा ?'

'राधा..!' माझ्या आवाजात कंप होता.

'चल ! वाईट वाटलं छाया ? बरं जाऊ दे.'

'पण, पण राधा ! आजचा नव्हे भावी जीवनाचा विचार !' तिच्या डोळ्यातलं पाणी माझ्या दृष्टीतून सुटलं नाही. मला जाणवलं. पोरीचे हात पिवळे करणारे आई बापच जगात नव्हते मग कोण होतं तिचं ?

'राधा ?' मी तिचे हात धरले.

'मी तुझ्यासाठी मुलगा बघू? आवडेल तुला ?'

तिनं माझ्याकडे रोखून पाहिलं.

'खरंच अगदी, खरं' मी हसले.

आणि मग तीही लाज लाजून झोपी गेली.

पण मला मात्र झोप येईना. मध्येच मी तिच्याकडे पाहिलं. तिच्या मिटलेल्या डोळ्यांवरही समाधानाचं तेज विलसत होतं. निष्काळजीपणानं ती झोपली होती. दिवसभर कष्ट करणाऱ्या तिच्या शरिराला तेवढाच विसावा होता. क्षणभर मलाच तिचा हेवा वाटू लागला. प्रतिष्ठेच्या दडपणाखाली सदैव चेंगरणाऱ्या समाजापेक्षा तिचं अस्तित्व कितीतरी अलौकिक होतं. दिवसभर कष्टणाऱ्या तिच्या शरिराला तो जगावेगळा विसावा मिळत होता.

* *

कविभूषण अण्णासाहेब खापर्ड्यांची ग्रंथसंपदा

१. काव्यकान्तार (पूर्व खंड) व इतर काही कविता १९१८.
२. गाणे अता कशाचे ! (कविता) १९१९.
३. लोकमान्यांच्या गोष्टी १९२०.
४. काव्यकान्तारातील फुले १९२५.
५. सर्वस्वाची गद्यगाणी (भाग पहिला) १९२५.
६. मौल्यवान वस्तूंचा मोडका बाजार : १९२९.
७. अफझुलवधाचा पोवाडा १९२९.
८. मराठीतील शीर्षबिंदू १९२९
९. विदर्भगीत : १९३०.
१०. अनन्ताची गाणी १९५३.
११. गोविंदाग्रज अर्थात राम गणेश गडकरी यांचे कविता, नाट्य आणि विचार : १९५४.
१२. काव्यकान्तार; उत्तर खंड : १९५५.
१३. योगी अरविंद व अंतर्ज्ञान १९५६.
१४. सर्वस्वाची गद्यगाणी (संकलित) १९५६.
१५. भगवद्गीतेचे अंतरंग (डॉ. ॲनी बेझंट ह्यांच्या 'हिण्ट्स ऑन द स्टडी ऑफ भगवद्गीता' या पुस्तकाचे भाषांतर) १९५६.
१६. साहित्याचा संसार : १९६२.
१७. रवीन्द्र साहित्य परिचय १९६३.
१८. कविता; स्वामी विवेकानन्दांच्या : चार भाषांतील संपूर्ण कवितांचे भाषांतर १९६३.
१९. मनाचा संसार १९७१.
२०. पथप्रदीप आणि कर्म (Light on Path) ह्या थिऑसॉफिकल पुस्तकाचे भाषांतर १९७५.

साभार पोच

मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, मुंबई – ४.

१. **गाज** : शरद साटम : (कविता) पृ. ११२ : रु. १०.
२. **गर्भालय आणि लंघनमूर्ती** : रत्नाकर पटवर्धन : (कथा) पृ. १२० : रु. १७.
३. **मानसी** : वसंत बापट : (कविता) पृ. ३६ : रु. ५.
४. **दशपदी** : अनिल : (कविता) पृ. ९५ : रु. १५.
५. **सेनापती** : श्रीपाद शंकर नवरे : (चरित्र) [सेनापती बापट स्मारक समिती, सेनापती बापट निवास, दादर, मुंबई] पृ. ४९८ : रु. ४०.
६. **कमाल आणि धमाल** वृन्दा लिमये : (बालगीते) मौज वितरण : पृ. २४ : रु. ४.५०.
७. **केसर** : सुशील (कविता) मौज वितरण : पृ. ८० : रु. ९.

जान्हवी प्रकाशन, वजिराबाद, नांदेड (मराठवाडा)

१. **डोंगर बिचारा दु:खी झाला** चन्दन आत्मा राजेन्द्र पृ. ३० : रु. १.५०.
२. **आम्ही मायेची मुकी पोरं** : चन्दन आत्मा राजेन्द्र : पृ. २० : रु. १.

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त (दि. १६ मे १९७७ ते ३० जून १९७७)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. सांस्कृतिक

१.१ वाङ्मयीन संस्था, व्यक्ति व कार्यकर्ते यांचा मेळावा :

विदर्भातील वाङ्मयीन चळवळ अधिक सक्रिय व अभिवृद्ध करण्याकरिता, वाङ्मयीन कार्य करणाऱ्या सर्व साहित्यविषयक संस्था, कार्यकर्ते व वाङ्मयप्रेमी ह्यांचा मेळावा दि. २९ मे रोजी सायं. ६.३० वा. आयोजित करण्यात आला. सर्वप्रथम संघाचे माजी चिटणीस श्री. य. गो. मालोदे यांच्या निधनाबद्दल दुखवटा व्यक्त केला. मेळाव्यात सर्वश्री वा. कृ. चोरघडे, नाना ढाकुलकर, शंकरराव कुळकर्णी, प्रभाकर चाफेकर, अनिल घवड, दिनकर देशपांडे, डॉ. सुरेश मेश्राम, सुहास धर्मट्टी, वसंत नानल, सौ. सुलभा हेर्लेकर, श्यामकांत कुळकर्णी, श्रीकृष्णचंद्र जोशी, भाऊ देवसंत, सौ. अनुराधा केणे या प्रभृतींनी आपले विचार मांडले. या मेळाव्याचे संयोजन सांस्कृतिक समितीचे आमंत्रक श्री. श्रीपाद जोशी यांनी केले.

१.२ संघाच्या सांस्कृतिक समितीचे (साहित्य /चित्रकला /संगीत) अस्थायी कार्यकर्ते सभासद म्हणून कार्य करण्यास आतापावेतो खालील साहित्यिक, साहित्य संस्थांचे कार्यकर्ते, चित्रकार व संगीत क्षेत्रातील नामवंतांनी सहकार्य देऊ केले आहे.

साहित्य –

अ] वाङ्मयचर्चा मंडळ – १. श्री. का. रा. वालदेकर, २. श्री. भाऊ पंचभाई

ब] परदेशी साहित्य परिचय – श्री. वसंत चिचाळकर

क] 'वाङ्मयधन 'व ग्रंथ समीक्षणमाला – सौ. सुलभा हेर्लेकर

ड] नियमित कार्यक्रम – १. श्री. सुभाष चांदुरकर, २. श्री. बळवंत लांबकाणे, ३. कु. अरुणा व. पवार

क] कथाविषयक कार्यक्रम – श्री. कमलाकर धारप

ड] महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धा – प्रदर्शन – १. कु. चित्रा पांढरकर, २. श्री. योगेश बऱ्हाणपुरे

इ बालसाहित्य विभाग – १. श्री. अंबादास देवळे

फ] साहित्य अकादमी पारितोषिक प्राप्त साहित्य परिचय – १. शामकांत कुळकर्णी

चित्रकला केंद्र – १. प्राचार्य वसंतराव परब, २. प्रा. प्रकाश कावळे, ३. प्रा. अरुण मेंदुले, ४. श्री. भाऊ देवसंत, ५. श्री. एन. बी. डिखोळे

संगीत केंद्र – १. श्री. वसंत अंधारे, २. श्री. पद्माकर बर्वे, ३. श्रीमती उषा धारप.

प्रसिद्धी विभाग :

साहित्य संघाच्या साहित्यविषयक कार्यांचा सुयोग्य प्रचारास्तव नव्यानेच सुरू करण्यात यावयाच्या या विभागाचे अस्थायी कार्यकर्ते सभासद म्हणून आतापावतो नमूद केलेल्या पत्रकारांनी सहकार्य देऊ केले आहे. १. श्री. युधिष्ठिर जोशी, २. श्री. अनंत बेदरकर, ३. श्री. विजय फणशीकर. या व्यतिरिक्त खालील साहित्यिक व वाङ्मयप्रेमी मंडळींनी आतापावतो या समितीसाठी काम करण्यास अनुमती दिलेली आहे. १. श्री. अनिलकुमार आदेवार, २. श्री. उल्हास मनोहर, ३. श्री. चंद्रकांत उदास, ४. प्रा. वामन पात्रीकर, ५. श्री. श्रीकृष्णचंद्र जोशी, ६. श्री. लोकनाथ रायपुरे, ७. श्री. शाम देशपांडे ८. सौ. मालती निमखेडकर, ९. श्री. विनोद पुराणिक.

१.३ **काव्यगायन** : जळगाव येथील कवी देवकीनंद सारस्वत यानी ३० मेला संघाला भेट दिली; त्याप्रसंगी त्यांचे काव्यगायन झाले.

१.४ **स्मृतिदिन** : दि. ११ जूनला मानवतेचे पुजारी साने गुरुजी यांचा स्मृतिदिन साजरा झाला. तसेच दि. १३ जूनला आचार्य अत्रे स्मृतिदिनानिमित्त सुप्रसिद्ध गायक श्री. वसंत अंधारे, सौ. कल्याणी देशमुख, सौ. विद्यावती केतकर यांनी अत्रे यांच्या 'झेंडूची फुले' या विडंबनात्मक काव्यग्रंथातील निवडक कवितांचे गायन केले. सौ. सुलभा हेर्लेकर यांनी निवेदन केले. गायनाचे संचालन श्री. वसंत अंधारे ह्यांचे होते. साथीला सर्वश्री गोपाळ वाडेगावकर, विष्णुपंत कावळे व कदम होते.

१.५ **कथा कथन** : यंदा बाल श्रोतृवृंदासाठी एक अभिनव विनोदी कथा कथनाचा कार्यक्रम दि. १२ जूनला आयोजित करण्यात आला. विषय होता 'माझी झालेली फजिती' आणि या कार्यक्रमात सर्वश्री दिनकर देशपांडे, प्रभाकर पुराणिक, सौ. मालती निमखेडकर व कर्नल भा. त्र्यं. परांजपे यांनी कथा कथन करून बालश्रोत्यांना रिझविले.

१.६ **शोकसभा** संघाच्या संस्थापकांपैकी एक व जुन्या पिढीतील सुप्रसिद्ध साहित्यिक कविभूषण श्री. ब. ग. उपाख्य अण्णासाहेब खापर्डे यांच्या निधनानिमित्त संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांचे अध्यक्षतेखाली प्रकट शोकसभा दि. ३० मेला आयोजित करण्यात आली. श्री. आ. रा. देशपांडे, प्रा. या. मु. पाठक, श्री. गो. स. देहाडराय, श्री. ज. रा. जोशी, श्री. ग. नी. भवाळकर, डॉ. आष्टीकर व कु. रेखा भिवगडे यांनी भावपूर्ण शब्दात श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी श्री. राजाभाऊ कानगो यानी अण्णासाहेब खापर्डे यांचे विदर्भगीत गायिले.

१.७ साहित्य अकादमी दिल्ली या संस्थेचे संचालक डॉ सुनीतिकुमार चॅटर्जी यांच्या दु:खद निधनाबद्दल संघाने दुखवट्याचा ठराव दि. ३० मे ७६ ला पारित केला व श्रद्धांजली अर्पण केली.

२. चित्रकला समिती

२.१ **बालचित्रकला शिबिर, चित्रकला प्रदर्शन** : या वर्षी साने गुरुजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त दि. २५ मे ते ८ जून पर्यंत आयोजित केलेल्या बालचित्र कला शिबिरात ४ ते १४ वर्षापर्यंतच्या १४२ मुलामुलींनी भाग घेतला. संयोजन व मार्गदर्शन प्रा. प्रकाश कावळे, श्री. चंद्रकांत चन्ने, श्री. धनंजय पाठक, श्री. विकास नक्षिणे व श्री. श्याम सोईदे या चित्रकला शिक्षकांनी केले.

२.२ बालचित्र कला प्रदर्शन दि. ११ जून ते १४ जूनपर्यंत भरविण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन 'मुलांचे मासिका'चे संपादक, श्री. वा. रा. मोडक यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संघाध्यक्ष, डॉ. आष्टीकर यांनी संघ 'बालवाचनालय' व 'बालचित्र छंद मंदिर' हे दोन उपक्रम हाती

घेईल असे आश्वासन दिले. चित्रकला शिबिराकरिता कॅमलीन कंपनी, पायलट पब्लिसिटी, नॉव्हेल्टी जनरल स्टोअर्स, अजित बेकरी आदि संस्थांचे सहकार्य लाभले. तसेच ललित कला भारती, बसोली ग्रुप, विजय प्रकाशन, साहित्य प्रसार केंद्र या संस्थांनी आणि सर्वश्री राजशेखर बालेकर, चंद्रकांत कुळकर्णी, सुरेश पांढरीपांडे, मंगलमूर्ती, सोईदे यांनी पाठविलेली वैयक्तिक पारितोषिके संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांचे हस्ते बालचित्रकलाकाराना प्रमाणपत्रासहित देण्यात आली.

३. नाटच समिती

३.१ नाटचसमितीचे आमंत्रक श्री. मनोहर म्हैसाळकर व सौ. कमल आंबेकर यानी दि. २२ मेला सकाळी ९ वा नागपुरातील मान्यवर नाटचसंस्थांच्या प्रतिनिधींना आमंत्रित करून नागपुरातील हौशी रंगभूमीची प्रतिनिधित्व करणारी समावेशक नाटचसमिती संघटित केली.

३.२ गतवर्षाप्रमाणे यंदाही दि. १३ व १४ जुलै रोजी 'महिला एकांकिका स्पर्धा' आयोजित करण्याचे ठरविले.

४. श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय :

४.१ ग्रंथालयातील नवीन अभ्यासकांचा वर्ग व मार्गदर्शन दि. ७ जून पासून सुरू झाले.

४.२ बालवाचक व बाललेखक यांच्या करिता संघाच्या विद्यमाने २७ जून ७७ पासून 'बालकक्ष' उघडण्यात आला. प्रवेश बालकाकरिता नि:शुल्क राहील. बालवाचन कक्षाचे कार्य ग्रंथालय समितीचे कार्यकर्ते श्री. राजशेखर बालेकर आणि सांस्कृतिक समितीचे आमंत्रक श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी पाहतील.

५, शाखा सभावृत्त :

५.१ वणी

दि. १८–५–७७ ला सुप्रसिद्ध समाजसुधारक व कथा लेखक श्री. हमीद दलवाई ह्यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकसभा आयोजित करण्यात आली.

५.२ भंडारा

वि. सा. संघाच्या भंडारा शाखा सभेची स्थापना करण्यासाठी अस्थायी समिती १९ जून ७७ ला नेमण्यात आली. ती अशी : अध्यक्ष – श्री. प्रल्हाद पांढारकर, उपाध्यक्ष – श्री. निळकंठ रणदिवे, चिटणीस – श्री. राम आस्वले, सहचिटणीस – कु. माधुरी सुतोने. सभासद –श्री. गोविंद लांजेवार, कु. वर्षा ढोंबरे, सौ. सुषमा केकरे, सौ. सुधा कापरे, श्री. राम नंदुरकर व श्री. संजय गुप्ते. या शाखेतर्फे दि. २७ जूनला कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांच्या निधनाबद्दल शोकसभा घेण्यात आली.

६. इतर शाखांचे कार्यवृत्त हाती आले नाही.

विदर्भ साहित्य संघ

चौपन्नाव्या वर्षाचा वृत्तांत

(१ एप्रिल १९७६ ते ३१ मार्च १९७७)

प्रास्ताविक

विदर्भ साहित्य संघाच्या चौपन्नाव्या (१९७६–७७) वर्षाचा वृत्तांत वार्षिक साधारण सभेपुढे सादर करतांना आनंद वाटतो. सद्य परिस्थितीत सभासदांची संख्या वाढली तशी कार्यकारिणीवरील जबाबदारी वाढली हे नाकबूल करता येणार नाही; त्यात पुन: सभासद संस्थेतील कार्यात रस घेत आहेत, संस्थेच्या कार्यप्रणालीविषयी जागरूक राहून उपयुक्त सूचना देत आहेत, ही देखील संस्थेच्या प्रगतीच्या दृष्टीने समाधानाची बाब होय. असेच सहकार्य ह्यापुढेही लाभावे ही अपेक्षा व्यक्त करून गतवर्षाचा वृत्तांत आपणापुढे ठेवीत आहोत.

१. **कार्यालय व्यवस्थापन** (सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय)

१.१ **सभासद संख्या** ३१–३–७७ पर्यंत : उपकर्ते ९, आश्रयदाते ४, सहाय्यक १, हितचिंतक २, आजीव सभासद २६७, साधारण सभासद १०८९, एकूण १३७२. केवळ 'युगवाणी' मासिकाचे वर्गणीदार सभासद १७०.

१.२ **शाखा** : अकोला, आकोट, उमरखेड, खामगाव, गोंदिया, चंद्रपूर, चिखली, तुमसर, दारव्हा, मुर्तिजापूर, यवतमाळ आणि वणी या ठिकाणी संघाच्या शाखासभा आहेत.

१.३ **संलग्न संस्था** : रंजन कला मंदिर, नागपूर.

१.४ **वार्षिक साधारण सभा** : वार्षिक साधारण सभा रविवार दि. २५ जुलै १९७६ ला दुपारी ४ वाजता गडकरी सभागृहात, संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेत १९७६–७७ चा अर्थसंकल्प मान्य करण्यात आला. सविस्तर प्रतिवृत्त संबंधित पुस्तकात लिहिण्यात आले आहे.

१.५ **कार्यकारी मंडळाच्या सभा** १८ एप्रिल ७६, १३ जून १९७६, २५ जुलै १९७६, ७ नोव्हेंबर १९७६, १९ डिसेंबर १९७६ व ८ जानेवारी १९७७ व २९ मार्च १९७७ अशा सात सभा आयोजित करण्यात आल्या. या सभात सर्वप्रथम त्या त्या कालातील दिवंगत साहित्यिक व मान्यवर व्यक्ती यांच्याविषयी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच पुरस्कार प्राप्त साहित्यिकांच्या गौरवपर ठराव मांडण्यात आला. नवीन शाखांना मान्यता देण्यात आली, संकल्पित योजनांवर व खर्चासंबंधी चर्चा करण्यात आली. आणि ७ नोव्हेंबर ७६ च्या सभेत निर्वाचन अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली.

१.६ **विश्वस्त मंडळाची सभा :** ८–४–१९७६ व ८–३–१९७७ या दोन दिवशी आयोजित केलेल्या सभेत धनवटे रंगमंदिरात केलेल्या दुरुस्त्यांची प्रत्यक्ष पहाणी केली व त्यात करावयाच्या इतर सुधारणांसंबंधी विचार विनिमय झाला.

२. आजीव सभासद

वृत्तांताच्या कालखंडात एकूण सात नवीन आजीव सभासद झाले. त्यांची नावे एप्रिल – मे ७६, आक्टों. नोव्हें. ७६, व डिसें. ७६ – जानेवारी ७७ च्या कार्यवृत्तात प्रसिद्ध झाली आहेत.

३. दिवंगतांना श्रद्धांजली :

३.१ श्री. चि. त्र्यं. खानोलकर 'आरती प्रभु' २८ मे १९७६ ला प्रकट शोकसभा.

३.२ श्री. व्यं. शं. वकील : लघुकथालेखक व नाटककार, २६, जून १९७६ ला शोकसभा.

३.३ सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर यांच्या निधनाबद्दल दि. ४ सप्टें. १९७६ ला प्रकट शोकसभा.

३.४ श्री. वा. वा. उपाख्य तात्यासाहेब भोळे यांना दि. २६ आक्टो. ७६ ला श्रद्धांजली.

३.५ सुप्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक व पत्रकार श्री. गजानन त्र्यंबक उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर यांच्या निधनानिमित्त दि. २८ नोव्हेंबर ७६ ला प्रकट शोकसभा.

३.६ सौ. उषा कोलते यांच्या दु:खद निधनानिमित्त दि. २ जानेवारी ७७ ला शोकसभा.

३.७ याशिवाय, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल व नागपूर विद्यापीठाचे कुलपति श्री. अलियावर जंग, विद्वान पंडित डॉ. ल. रा. कुळकर्णी, सुप्रसिद्ध साहित्यक श्री. द. चि. सोमण, आजीव सभासद श्री. रा. मा. हजरनवीस व गो. आ. भोसले यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

४. संघाचा वर्धापन दिन :

मकर संक्रान्तीच्या शुभदिनी दि. १४–१–७७ ला साजरा करण्यात आला. आरंभी सौ. जयश्री समुद्र यांनी शारदास्तवन म्हटले. अध्यक्षस्थानी म. म. डॉ. वा. वि. मिराशी होते. श्री. आ. रा. देशपांडे ह्यांनी प्रास्ताविक भाषण करून डॉ. भवानी शंकर नियोगी, डॉ. वा. वि. मिराशी, डॉ. श्री. भा. वर्णेकर, श्री. बा. रा. मोडक, श्री. आनंदराव जोशी ह्यांच्या कार्याचा गौरव केला. डॉ. मिराशी ह्यांच्या हस्ते डॉ. नियोगी ह्यांना शाल व श्रीफल अर्पण करून त्यांचा सत्कार करण्यात आला. संघाध्यक्षांनी डॉ. मिराशी, डॉ. वर्णेकर, श्री. बा. रा. मोडक ह्यांना शाल व श्रीफल देऊन गौरविले. श्री. आनंदराव जोशी उपस्थित राहू शकले नाहीत. याच प्रसंगी सर्वश्री वसंतराव वऱ्हाडपांडे, मधुकर रामदास जोशी, श्याम सोनारे ह्या पीएच्. डी. उपाधी प्राप्त प्राध्यापकांचा शाल व श्रीफल अर्पण करून गौरव केला. प्रा. चंद्रकांत धांडे उपस्थित राहू शकले नाही. डॉ. नियोगी व डॉ. मिराशी यांची आशीर्वादपर भाषणे झाली. रात्री ९ वा. सौ. कल्याणी देशमुख आणि गिरीश वझलवार यांच्या सुश्राव्य गायनाने व श्री. अरविंद गजेंद्रगडकर ह्यांच्या बासरीवादनाने समारंभाची सांगता झाली.

५. नैमित्तिक कार्यक्रम :

१५ ऑगस्ट ७६ ला ध्वजारोहरण समारंभ, २ आक्टोबर ७६ ला गांधी जयंती व २६ जानेवारी ७७ ला प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आले. या दिवशी वृक्षारोपण करण्यात आले.

६. मान्यवर व्यक्तींच्या भेटी व सन्मान

खालील माननीय व्यक्तींनी संघाला भेटी दिल्या. त्यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.

६.१ विदर्भ महाविद्यालयातील तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक श्री. दि. य. देशपांडे.

६.२ मुंबईचे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक मे. पुं रेगे व सौंदर्यशास्त्राचे लेखक प्रा. पाटणकर.

६.३ शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या विद्यमाने नागपूर येथे भरविलेल्या 'नव साक्षरांसाठी साहित्यनिर्मिती' या शिबिराचे संयोजक श्री मनोहर गंधे.

६.४ अमरावती विदर्भ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य सौ. मनूताई नातू.

६.५ वैदर्भीय लेखिका संमेलनाच्या उद्घाटक सौ. गिरिजा कीर.

६.६ ब्रह्मपुरी येथील आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य चिं. ग. करंदीकर.

६.७ दिल्ली येथील साहित्य अकादमीचे सहाय्यक सचिव कविवर्य श्री. हेमचंद्र 'सुमन'

६.८ मुंबई नगराचे भूतपूर्व शेरीफ श्री. जनार्दन गणपत बोबे. त्यांचे "माघे सन्ति त्रयोगुण:" या विषयावर व्याख्यान झाले.

६.९ सुप्रसिद्ध अमेरिकन कवी डॉ. विल्युयम्स यांची सपत्निक भेट. त्यांच्यासह कु. जोन डिके' असोसिएट डायरेक्टर यु. एस. आय्. एस्. ह्याही उपस्थित होत्या.

६.१० सत्कार सुप्रसिद्ध उद्योगपती व संत वाङ्मयाचे अभ्यासक श्री. बाबुराव पारखे यांचा सत्कार व त्यांचे 'भौक्तिक विज्ञान आणि वैदिक संस्कृती' या विषयावर व्याख्यान.

६.११ 'मनोहर' साप्ताहिकाचे संपादक दत्ता सराफ यांचा सत्कार.

६.१२ वणी येथील आयोजित वैदर्भीय लेखिका संमेलनाच्या अध्यक्ष सौ. यमुनाताई शेवडे, संमेलनातील परिसंवादाच्या अध्यक्ष डॉ. सौ. शकुंतलाबाई खोत, काव्यदर्शन कार्यक्रमाच्या अध्यक्ष सौ. उषा लिमये त्याचप्रमाणे सुप्रसिद्ध कथालेखिका श्रीमती योगिनी जोगळेकर, सौ. वसुंधरा पटवर्धन व संमेलनाच्या उद्घाटक सौ. गिरिजा कीर यांचा सत्कार.

६.१३ प्रा. मधुकर त्रिंबक सहस्त्रबुद्धे यांचा सत्कार व त्यांचे "मौलिक मानवी प्रेरणा व मेक्सिको येथील आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्या परिषदेतील अनुभव" या विषयावर व्याख्यान.

६.१४ महाराष्ट्राचे गृहउपमंत्री नामदार श्री. बाबुराव काळे यांचा व वयोवृद्ध स्वातंत्र्य सैनिक व आदर्श शिक्षक श्री. हरिभाऊ पत्तरकिने यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त सत्कार.

६.१५ प्रा. या. मु. पाठक यांनी वहात्तराव्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल त्यांचा गौरव.

६.१६ जादुगार के. लाल यांचा सत्कार. याप्रसंगी संघाला त्यांनी रु. २५१ ची देणगी जाहीर केली.

७. स्मृतिदिन :

नाना जोग (१–५–७६) सुभाष मंडळाने 'भूक अमर आहे' हा नाटचप्रयोग सादर केला. साने गुरुजी (११–६–७६), लोकमान्य टिळक (१–८–७६), तुलशी जयंती (२–८–७६). कृ. प्र. खाडिलकर (३०–८–७६), कविवर्य 'बी' ना. मु. गुप्ते (३०–८–७६) डॉ. सौ.आशा सावदेकर यांचे व्याख्यान, कविवर्य अण्णाजी बोबडे (१–१०–७६), य. खु. देशपांडे (२०–११–७६), वि. रा. हंबर्डे (१९–११–७६). हंबर्डे यांचे छायाचित्र त्यांचे चिरंजीव श्री. विजय हंबर्डे यांजकडून भेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर निर्वाणदिन (६–१२–७६), राम गणेश गडकरी (२३–१–१९७७) भोपाळचे गोविंदाग्रजानुयायी श्री. मुरलीधर आढाऊ यांचे भाषण.

८. **सांस्कृतिक कार्यक्रम :** (संयोजक श्री. वा. के. अत्रे).

८.१. **ज्ञानेश्वर जन्म सप्तशताब्दी :** श्री. ज्ञानेश्वर जन्म सप्तशताब्दी समिती व वि. सा. संघ यांच्या विद्यमाने ६–५–७६ ला 'ज्ञानेश्वरांचा चिद्विलास' या विषयावर परिचर्चा आयोजित करण्यात आली. अध्यक्षस्थानी संतवाङ्मयाचे अभ्यासक श्री. वि. स. पागे होते. परिचर्चेत डॉ. द. भि. कुळकर्णी, डॉ. श्री. भा. वर्णेकर, प्रा. म. रा. जोशी, श्री. आ. रा. देशपांडे, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. पिंपळापुरे, श्री. आष्टीकर वैद्य, डॉ. व. घ. देशमुख, अॅड. सदानंद पवनीकर, अॅड. ज. रा. कुळकर्णी व श्री. ज्ञानेश्वर साधु यांनी भाग घेतला.

८.२. **श्रीगणेश व्याख्यानमाला :** ही व्याख्यानमाला दि. १८ व १९ जुलै ७६ या दोन दिवशी सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. भगवंतराव देशमुख यांनी गुंफिली. (१) भारूड या रचनाप्रकाराची वैशिष्ट्ये – एकनाथ पूर्वकालीन भारूड (२) एकनाथी भारूड हे मालेचे विषय होते. तिसरे व्याख्यान भारूड या संदर्भात 'आधी कळस मग पाया' या विषयावर वणी येथील संघशाखा सभेत झाले.

८.३. **साहित्यिक कार्यक्रम :**

१. **'काव्यवर्षा'** हा कविसंमेलनाचा कार्यक्रम दि. १७ जुलै ७६ ला झाला. या कार्यक्रमात सौ. सुलभा हेर्लेकर, सौ. मृणाल चिचाळकर, सौ. शकुंतलाबाई खोत, सर्वश्री श्रीपाद जोशी, शिरीष, तनहा नागपूरे, उल्हास मनोहर, प्र. द. जोशी यांनी भाग घेतला.

२. **'हास्यकथन' :** विनोदी कथांचे कथन हा वैशिष्टयपूर्ण कार्यक्रम दि. १९ आगस्टला झाला. या कार्यक्रमात सर्वश्री वसंत निगवेकर, नाना ढाकुलकर, अरविंद गजेंद्रगडकर, वसंत चिचाळकर, वामन पात्रीकर आणि मनोहर तल्हार यांनी भाग घेतला. कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या मुंबईच्या सौ. मालिनी पंडित यांनी एक विनोदी कथा कथन केली.

३. **ग्रंथसमीक्षण :** हा तिसरा कार्यक्रम दि. ४–१०–७६ ला झाला. प्रा. शिरीष देशपांडे यांनी 'पहिली परंपरा' या पुस्तकावर, आणि सौ. सुलभा हेर्लेकर व डॉ. सुनील सुमेदार यानी 'मुंबई दिनांक' या कादंबरीवर आपली मते व्यक्त केली.

८.४. **न्या. मू. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा :** ही स्पर्धा वक्तृत्वोत्तेजक सभा, पुणे आणि वि. सा. संघ या संस्थांच्या विद्यमाने दि. १७, १८ व १९ सप्टेंबर ७६ ला आयोजित करण्यात आली. स्पर्धेचा विषय होता 'भारतीय चित्रपटसृष्टीची वाढ अनिष्ट दिशेने होत आहे.' साद्यंत वृत्तांत आगस्ट – सप्टें. ७६ च्या अंकातील कार्यवृत्तात प्रसिद्ध करण्यात आला.

८.५. **राष्ट्रीय लेखक संघाचे संमेलन** राष्ट्रीय लेखक संघाचे महाराष्ट्र संमेलन १६ व १७ आक्टोबर ७६ या दोन दिवशी आयोजित करण्यात आले. खासदार श्री. यशपाल कपूर अध्यक्ष होते. श्री. जेमिनी कडू यानी 'स्वातंत्र्योत्तर काळातील नव्या सामाजिक जाणीवा' हा स्वतःचा अभ्यासलेख वाचला. याप्रसंगी परिसंवाद, शिबिर आदि कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

८.६. **श्रीशिव छत्रपती शलाकाशिल्प** हे शलाकाशिल्प विदर्भ साहित्य संघाच्या श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या उभारणीचा आरंभ प. वा. पु. बा. आणि सौ. अनसूयाबाई काळे यांनी निर्माण केलेल्या 'काळे प्रतिष्ठान'च्या निधीतून मिळालेल्या भरीव आणि उदार देणगीने झाला. त्याच प्रतिष्ठानच्या रजत जयंती निमित्त काळे कुटुंबियांनी पुन: तीन हजार रुपयांची देणगी 'श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाला' दिली. त्या देणगीतून या शिल्पाची निर्मिती करण्यात

आली. हे शलाकाशिल्प नागपूरच्या अपंग सेवा उद्योगाच्या कार्यागारात बनविले. शलाकाशिल्पाचे उद्‌घाटन पंजाबचे मुख्यमंत्री श्री. सरदार ग्यानी झैलसिंग ह्यांचे हस्ते दि. १७ आक्टो-७६ ला झाले. मुख्यमंत्री सरदार ग्यानी झैलसिंग ह्यांनी अपंग कारागिरांना उत्तेजनार्थ पाचशे एक रुपयाची देणगी अपंग कारागीर श्री. श्रीराम मोतीराम राऊत ह्याच्या स्वाधीन केली. त्या कारागीराला सत्कारार्थ दिलेले घड्याळ श्री. यशपाल कपूर ह्यांनी त्याच्या मनगटाला बांधले.

८.७. **काव्यदर्शन** : सुप्रसिद्ध कवियत्री श्रीमती योगिनी जोगळेकर ह्यांचे दि. १२–११–७६ ला व कवी श्री. राजा बढे ह्यांचे दि. ८–१२–७६ ला काव्यगायन झाले.

८.८. **ज्ञानेश्वर जन्म सप्तशताब्दी सांगता समारंभ** : हा समारंभ दि. १७ व १८–१२–७६ या दोन दिवशी आयोजित करण्यात आला. याप्रसंगी विधान परिषदेचे सभापती माननीय श्री. वि. स. पागे व डॉ. अ. ना. देशपांडे यांची व्याख्याने झाली.

८.९. **प. वा. ग. त्र्यं. माडखोलकर** : प. वा. ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर यांच्या तेराव्या दिनानिमित्त दि. ९–१२–७६ ला स्मृतिदिन पाळण्यात आला.

८.१०. **कं. इंदिराबाई खरे – शालेय वक्तृत्वस्पर्धा** : दि. २३–१–७७ ला 'मला आवडलेले पुस्तक' या विषयावर शालेय वक्तृत्वस्पर्धा झाली. त्यात दहा शाळेतील एकोणवीस विद्यार्थ्यांनी भाग घेतला. यशस्वी झालेल्या स्पर्धकांची नावे युगवाणी फेब्रु.–मार्च ७७ कार्यवृत्तात देण्यात आली आहेत. पारितोषिक वितरण डॉ. कुसुमताई वांकर ह्यांचे हस्ते झाले.

८.११. **बेहेरे व्याख्यानमाला** : दि. २७ व २८–१–७७ पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाचे मराठीचे प्राध्यापक व सुप्रसिद्ध समीक्षक श्री. सदाशिव शिवराम भावे ह्यानी १. काव्य – तत्व आणि निर्मिती आणि २. आस्वाद आणि समीक्षा या विषयावर दोन व्याख्याने देवून ही व्याख्यानमाला गुंफिली. तिसरे व्याख्यान आकोल्यास याच संदर्भात तेथील शाखेतर्फे दि. २९–१–७७ ला झाले.

८.१२. **अमेरिकन कवी डॉ. विल्यम्स् यांचे काव्यवाचन** सुप्रसिद्ध अमेरिकन कवी डॉ. मिलर विल्ययम्स् यांनी आपल्या निवडक कविता प्रोजेक्टरच्या साहाय्याने पडद्यावर चित्रे पाडून त्या वाचून दाखविल्या. नागपूर विद्यापीठाचे इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. शास्त्री यांनी कवीची ओळख करून दिली.

९. संगीत केंद्र (स्वरमंडळ) (संयोजक श्री. आनंद जोग)

९.१. नागपुरातील सुपरिचित गायक श्री. मधुसूदन भावे नागपूर सोडून औरंगाबाद येथे कायमचे वास्तव्यासाठी गेले. त्या निमित्ताने दि. ८ मे ७६ ला त्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला. याप्रसंगी त्याचे गायनही झाले.

९.२. दि. २४–११–७६ ला डॉ. कुमार गंधर्व, सौ. वसुंधरा कोमकली व श्री. मुकुल कोमकली यांनी संघाला भेट दिली. त्याप्रसंगी सौ. वसुंधरा कोमकली यांचे सुश्राव्य गायन झाले.

९.३. दि. १५–१२–७६ ला श्री. मुकुल शिवपुत्र (डॉ. कुमार गंधर्व यांचे चिरंजीव) यांचे गायन झाले.

९.४. श्री. मा. ज. कानेटकर ह्यांचे ९–१–७७ ला 'संगीत आणि भजन' या विषयावर प्रात्यक्षिकासह व्याख्यान झाले.

१०. नाट्यसमिती (संयोजक श्री. अ. व्यं. जागीरदार)

१०.१. श्री. गजानन उपाख्य बाळ पांडे लिखित व श्री. देवाशिस दिग्दर्शित 'शतकावली' नाटकाचा प्रयोग दि. ४–६–७६ ला सादर करण्यात आला.

१०.२ महिला एकांकिका स्पर्धा या वर्षी महिला एकांकिका स्पर्धा हा अभिनव उपक्रम प्रथमच आयोजित करण्यात आला. या स्पर्धेतील एकांकिकांचे प्रयोग दि. ३ जुलै ते ७ जुलै १९७६ पर्यंत धनवटे रंगमंदिरात सादर करण्यात आले. स्पर्धेत एकूण दहा महिला नाट्यसंस्थांनी भाग घेतला. प्रयोगात ७८ स्त्री कलावंत होते. दि. ३ जुलैला सायकाळी ६ वाजता सुप्रसिद्ध अभिनेत्री सौ. सुधा करमरकर ह्यांनी महिला स्पर्धेचे उद्घाटन केले. यशस्वी स्पर्धक संस्था वैयक्तिक अभिनयाची पारितोषिके तसेच परीक्षा समितीने आयोजित केलेल्या मराठीतील विविध परीक्षेत गुणवत्ता प्राप्त परीक्षार्थीना पारितोषिके यांचा वितरण समारंभ समाजकल्याण, क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे राज्यमंत्री माननीय श्री सुशीलकुमार शिंदे ह्यांच्या हस्ते झाला. यशस्वी झालेल्या स्पर्धक संस्था व वैयक्तिक स्पर्धकांची नावे युगवाणी जून–जुलै ७६ च्या कार्यवृत्तात देण्यात आली आहेत.

१०.३ रंगभूमी दिन ५–११–७६ ला रंगभूमी दिनानिमित्त डॉ. सौ. शकुंतलाबाई खोत यांनी रंग-भूमीविषयक विचार प्रकट केले.

१०.४ इतर नाट्यस्पर्धा आयोजित करण्यात आल्या त्या अशा (१) आंतर महाविद्यालयीन खोल-कुटे नाट्यस्पर्धा (२) बालनाट्यस्पर्धा व (३) कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा. यशस्वी झालेल्या स्पर्धकांची आणि वैयक्तिक अभिनयात प्रशंसा प्राप्त कलावंतांची नावे युगवाणी फेब्रु.–मार्च ७७ च्या कार्यवृत्तात दिली आहेत.

११. परीक्षा समिती (संचालक : प्रा. माणिक के. वैतुले)

११.१ आगस्ट ७६ व जानेवारी ७७ या दोन सत्रात विद्यालयीन २४३५, महाविद्यालयीन ६६९, शासकीय ११४ असे एकूण ३२१८ परीक्षार्थी विविध परीक्षांना बसले. गतवर्षी ही संख्या २९४७ होती.

११.२ प्रस्तुत वर्षी रु १४,४६३ उत्पन्न झाले. गतवर्षी रु. १३,१९९ उत्पन्न झाले होते.

११.३ या वर्षी प्रतिसत्र प्रतिपरीक्षा सर्व प्रथम येणाऱ्यास पारितोषिके देण्यात आली. सर्वाधिक परीक्षा शुल्क देणाऱ्या केंद्र व्यवस्थापकासही पारितोषिक देण्यात आले.

११.४ या वर्षी एकूण ५० केंद्रात परीक्षा झाल्या.

११.५ वि. स. खांडेकर पारितोषिके १९७५ व १९७६ मध्ये घेतलेल्या कला स्नातक परीक्षात मराठी ऐच्छिक विषयात प्रथमांक मिळविणाऱ्या परीक्षार्थीना वि. स. खांडेकर पारितोषिके प्रदान करण्यात आली. १९७५ = ६ परीक्षार्थी प्रत्येकी रोख रु. १०० प्रमाणे, १९७६ = ६ परीक्षार्थी प्रत्येकी रोख रु. १०० प्रमाणे.

१२. श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालय (आमंत्रक श्री. ग. स. देशपांडे)

१२.१ ६ मे ७६ ला ज्ञानेश्वर जन्म सप्तशताब्दीनिमित्त ज्ञानेश्वर वाङमयाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. उद्घाटन विधान परिषदेचे सभापती श्री. वि. स. पागे यांनी केले.

१२.२ एम्. ए. पार्ट १ व २ वर्गाच्या अभ्यासकांना डॉ. मधुकर आष्टीकर, प्रा. अरुण वेलणकर, व प्रा. तारा सावंगीकर यांनी अभ्यासविषयक मार्गदर्शन केले.

१२.३ श्री. पु. य. देशपांडे ह्यांनी ग्रंथालयाला देणगी म्हणून त्यांच्या पुस्तक संग्रहातील ३३३ ग्रंथ दिले. तसेच ग्रंथालय संचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून जुनी संस्कृत विषयक २४ पुस्तके देणगी दाखल मिळाली.

१२.४ संदर्भ ग्रंथालयासाठी यावर्षी १९४ पुस्तके विकत घेण्यात आली. युगवाणीकडून ९८ पुस्तके मिळाली.

अनुक्रमणिका

१२.५ सध्या ग्रंथालयाच्या संग्रही एकूण ७१३१ पुस्तके आहेत.

१२.६ ग्रंथालयासाठी ६ खुर्च्या, ३ कपाटे, ३ टेबल व नोटीस बोर्ड एकूण रु. १३४८.५० ला खरेदी केले.

१२.७ महत्त्वाचे ग्रंथ विकत घेण्यासाठी प्रा. म. शं. वावगावकर, प्रा. म. रा. जोशी व डॉ. वि. बा. प्रभुदेसाई यांचे सहाय्य झाले. सर्व वर्षभर श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी विद्यार्थ्यांना संदर्भ-विषयक मार्गदर्शन केले. एवढेच नव्हे तर स्थानिक वृत्तपत्रांना व आकाशवाणी नागपूर या केंद्राला देखील संदर्भ ग्रंथ पुरविले. यंदा ग्रंथालयाचा उपयोग घेणारे विद्यार्थी व विद्यार्थीनी एम्. ए. पार्ट १ व पार्ट २ मध्ये शेकडा १०० टक्के उत्तीर्ण झाले हे ग्रंथालयाला भूषणावह आहे. संदर्भ ग्रंथालयाला राजाराम वाचनालय व नागपूर विद्यापीठ ग्रंथालयाचे बहुमोल सहाय्य लाभले.

१३. युगवाणी (संपादक – डॉ. मधुकर रघुनाथ आष्टीकर)

१३.१ या वर्षी युगवाणीचे सहा अंक प्रकाशित झाले. त्यात दीपावली विशेषांक महत्त्वाचा होता. युगवाणी मासिकाच्या दर्जेदार संपादनाबद्दल अनेक रसिक मित्रांकडून पत्रे आली, त्यातील निवडक पत्रे वेळोवेळी अंकात प्रसिद्ध केली.

१३.२ भेटीदाखल व परीक्षणार्थ आलेल्या ९८ ग्रंथाची युगवाणीमध्ये वेळोवेळी पोच देण्यात आली. पोच दिल्यानंतर ते ग्रंथ श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाला देण्यात आले.

१३.३ युगवाणीला परत भेटीदाखल खालील नियतकालिके येतात **दैनिके** तरुण भारत. नागपूर टाईम्स, राष्ट्रदूत, उद्घोष व महाराष्ट्र. **साप्ताहिक :** साधना, विवेक, माणूस, आर्वी टाइम्स, मराठवाडा, प्रज्ज्वलंत, सोबत, लोकराज्य, नागरिक जीवन. **पाक्षिके :** मासेस, रुद्रवाणी, सोव्हिएट देश. **मासिके :** लोकशिक्षण, वाचनालय, कुमार, मराठी विज्ञान परिषद, किर्लोस्कर, पुरुषार्थ, प्रतिष्ठान, प्रसाद, सत्यकथा, नवभारत, आलोचना, साहित्यसहकार, तत्त्वज्ञान, नवनीत, मागोवा, प्रज्ञालोक, कविता, जीवनविकास, स्पॅन, एकता, महानुभाव, ललित, मायमराठी.

द्वैमासिक : अस्मितादर्श.

त्रैमासिक : प्रेरणा, मराठी संशोधन पत्रिका, वैखरी, महाराष्ट्र साहित्य पत्रिका.

दैनिक महाराष्ट्र टाइम्स विकत घेतल्या जातो.

१४. चित्रकला समिती (आमंत्रक श्री. आनंद जोग)

१४.१ संघाच्या सहकार्याने दि. २२ आगस्ट ७६ ला सुप्रसिद्ध चित्रकार आठवले यांच्या स्कूल ऑफ आर्ट आणि आठवले आर्ट अकादमी या संस्थांतील विद्यार्थ्यांच्या चित्राचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

१४.२ उज्जैन येथील पाच चित्रकारांचे निरनिराळे आशय व्यक्त करणाऱ्या रेखाचित्राचे प्रदर्शन दि. २२ ते २५ डिसें. ७६ भरविण्यात आले. सुप्रसिद्ध चित्रकार श्री. भाऊ समर्थ यांनी या प्रदर्शनाचे उद्घाटन केले.

